
म.ग्रं.सं. ठाणे
विषय : भू-प्रवास
सं. क्र. : ७४२

# निळ्या नाईलचा एकांडा शिलेदार

[illegible] गोडबोले



REFBK-0026696

संदर्भ
भू-प्रवास
८४२
२६६९९
११।१९८२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.

15 DEC 1992
16 JAN 1993
27 JAN 1993
27 AUG 1993
12 MAY 1993
18 AUG 1993
22 SEP 1993
OCT 1993
29 JUN 1994
८।१०।९७
२५।११।९८
१६।१२।९८
(क्र. मा. पहा)
१६।१२।२०००१

# निळ्या नाईलचा एकांडा शिलेदार

**Alone On The Blue Nile**

या

Kuno Steuben

च्या साहस प्रवासाचा

सुरस अनुवाद

REFBK-0026696

जगदीश गोडबोले

रविराज प्रकाशन

प्रकाशक
रवि बेहेरे
रविराज प्रकाशन
४५८/२ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०

©
जगदीश गोडबोले

प्रथमावृत्ती
जुलै १९९२

मुखपृष्ठ
ल. म. कडू

मुद्रक
रवि बेहेरे
रविराज प्रिंटरी
६३४, बुधवार पेठ
पुणे ४११ ००२

मूल्य
पस्तीस रुपये

प्रिय अविनाश धर्म

यांस

—जगदीश गोडबोले

नाईल जवळ–जवळ २००० वर्षे जगभरच्या संशोधकांना आणि साहसी वीरांना आव्हान देणारी नदीं. हिमालयाची उत्तुंग गिरिशिखरं, दक्षिण ध्रुवाचा अथांग पसारा वा चंद्राचा आपल्याला न दिसणारा भाग यापेक्षाहीं नाईलच्या उगमाविषयीं जगभरच्या संशोधकांत प्रचंड कुतुहल होते. नाईल नदींचा उगम शोधून चाढण्यासाठी मनस्वी चढाओढ होती.

भयाण घनदाट जंगल, शेपटीं असलेलीं नरभक्षक खुजीं रानटीं माणसं; अक्राळ-विक्राळ प्राणीं, प्रचंड सरोवरं, उत्तुंग पर्वतशिखरे; पाताळाला भिडणाऱ्या दऱ्या आणि या सर्वांच्या जोडीला भयानक हिवताप–नाईलच्या उगमाच्या प्रदेशाविषयीं अनेक आख्यायिका होत्या.

कालौघात चीन–अमेरिका–ऑस्ट्रेलियाचा 'शोध' लागला, पण ब्ल्यू नाईलच्या उगमापाशीं पोहोचायला ( ब्ल्यू नाईल व व्हाईट नाईल मिळून नाईल नदीं बनते ) १७७० साल उजाडले. तरीहीं त्यानंतर अगदीं काही दशकांपूर्वीपर्यंत ब्ल्यू नाईलने आपली गुपिते कधीच सहजासहजीं उघडी केलीं नाहींत.

गूढरम्य घळ, तिच्या दोन्हीं अंगाला भिडणारे अभेद्य कडे, त्यामधून सुसाट वाहणारीं, क्षणाक्षणाला छोटया-मोठया धबधब्यांच्या रूपाने कडेलोट करणारी ब्ल्यू नाईल, तिच्यात जबडा वासून पसरलेल्या असंख्य मगरी, पाणघोडे, नदीकिनारी 'लग्नासाठी' माणसांची मुंडकीं मारणारे आदिवासी–

आणि आपल्या मोडक्या–तोडक्या तराफ्यातून या सर्वांशीं झुंजत निळया नाईलचीं अगदी एकटयाने सफर करणारा एक मनस्वी अवलिया

कनो स्टायबेन

# ब्ल्यू नाईलवरील सफरींचे सुरुवातीचे काही प्रयत्न

अप्पर ब्ल्यू नाईलमधून जल–सफर करण्याचा पहिला प्रयत्न ( किमान या शतकातील ) श्रीमंत अमेरिकन शिकारी मॅकमीलनने केला. लेक तानापासून तो निघाला पण पहिल्या तासाभरातच त्याच्या लोखंडी पत्र्याच्या बोटी उलटल्या आणि बुडाल्या पण जीवितहानी मात्र झाली नाही.

१९२० साली ब्रिटिश मुत्सद्दी कर्नल चीसमनने प्रयत्न केला. नाईलच्या मार्गाची त्याने परत-परत तपासणी केली होती. सपाट तळ असलेल्या आपल्या लाकडी बोटीतून तो निघाला आणि पहिल्याच दिवशी खडकावर त्याची बोट आदळली. ' लेकताना आणि दी ब्ल्यू नाईल ' हे त्याचे पुस्तक (मॅकमीलन् १९३६) महत्त्वपूर्ण मानले जाते.

चीसमननंतर आणखी एका ऑस्ट्रियन राजनैतिक अधिकाऱ्याने रबरी तराफ्यातून प्रयत्न केला. त्याने तराफा नदीत सोडला न् सोडला तोच मगरीने तराफ्यावर हल्ला केला. त्याची बायको व अनेक मजुरांच्यादेखत मगरीने तो तराफा उलटवला. परत त्याचे दर्शन झाले नाही.

१९५५ मधील हर्बर्ट रिटलिजरच्या मोहिमेने घमीतून बरेच अंतर काटले. रिटलिजर (याने जर्मन भाषेत बरीच प्रवासवर्णने लिहिली आहेत.) व त्याच्या बायकोने घडीच्या कयाक बोटी वापरल्या होत्या. त्यांच्या जोडीला पीटर फ्रँक व हेलन केसला हे स्वीस जोडपेही त्यांच्या घडीच्या कयाकसह होते. धबधब्यांचा त्यांना विशेष त्रास झाला नाही. पण सुमारे वीस मैल गेल्यावर, मगरीच्या तिसऱ्या हल्ल्यानंतर त्यांनी मोहीम आटोपती घेतली. स्वीस जोडप्याने ब्ल्यू नाईलला मिळणाऱ्या याबूझ उपनदीपासून ( सुदानी सरहद्दीलगत ) नंतर सुरुवात केली व ते खार्टूमला पोहोचण्यात यशस्वी झाले.

१९५९–६० साली कूनो स्टॉयबेनने ( या पुस्तकाचा लेखक ) लेक तानापासून पॅपीरसच्या जुड्यांपासून ( एक प्रकारची लव्हाळी ) तयारी केलेल्या होडक्यातून तीस इस्साट धबधब्यापर्यंत प्रवास केला. त्यानंतर गोदजॅम पुलाजवळ एक तराफा बनवून त्यातून सात आठवड्यात त्याने सुमारे १६० मैल अंतर पार केले.

१९६१ मध्ये एका इटालियन भूगर्भशास्त्रज्ञाने गोदजॅम पुलापासून सुरुवात केली म्हणतात, पण नंतर त्यासंबंधी काहीच समजले नाही.

१९६२ मध्ये सहाजणांच्या एका स्वीस–फ्रेंच पथकाने भक्कम तयारीनिशी गोदजॅम पुलांपासून दोन फायबर ग्लास कनूंतून सुरुवात केली. लुटारूंच्या हल्ल्यात मोहिमेतील दोन सभासद ( कयाक स्पर्धेतील जगज्जेता हेन्री कोड्राका व स्वीस

ऑलिंपिकपटू डॉ. स्टॅनले वॉल्टर ) मारले गेले. बाकीचे सभासद सर्व सामान माग सोडून अंधारात कसेबसे पळून आले.

१९६४ मध्ये एका ऑस्ट्रियन माणसाने पोर्तुगीज पुलापासून सुरुवात केली. पाचच दिवसात बोट व सर्व सामान गमावून अंगावरच्या पोहोण्याच्या चड्डीनिशीं त्याला आदिस आबाबाला परतावे लागले.

काही दिवसांनी डेनार्ट आणि क्रेग नावाच्या जर्मन माणसांनीं पोर्तुगीज पुलापासूनच सुरुवात केली आणि डिडिसा उपनदीच्या मुखापर्यंत येण्यात त्यांनीं यश मिळवले.

१९६५ मध्ये रुबिन नावाचा एक स्वीडीश साहसवीर गोदजॅम पुलापासून निघाला आणि घडीच्या बोटीतून सुदानच्या सरहद्दीपर्यंत पोहोचला.

१९६६ मध्ये रुबिन, फोर्समार्क या आपल्या सहकाऱ्याबरोबर पूर्वीच्याच बोटीतून पोर्तुगीज पुलापासून निघाला. ५० मैल गेल्यावर त्यांना प्रवास सोडून परतावे लागले.

१६ मार्च १९६८ ला एक ब्रिटिश पथक ( ५ पुरुष आणि १ मुलगी ) एका इथिओपियन माणसाबरोबर ब्ल्यू नाईलच्या मोहिमेवर निघाले. काही दिवसांतच आदिस आबाबाच्या पत्रकार परिषदेत त्यांनी सांगितले, 'लेक तानाच्या खालच्या बाजूच्या सात मीटर उंचीच्या धबधब्यांमुळे आम्हाला परतावे लागले.'

१९६८ मध्येच पण पावसाळ्यात ( ऑगस्ट–सप्टेंबर ) ७० जणांच्या ब्रिटिश–इथिओपियन 'ग्रेट अबाबी एक्सपिडिशन' ला संपूर्ण यश मिळाले, विमाने, वायरलेस व लष्करी मदत घेऊन त्यांनी ब्ल्यू नाईलचीं संपूर्ण घळ तीन टप्प्यात पार केली.

१९७० मध्ये दोन जर्मन वीरांनी बाथ-टबसारख्या फायबर ग्लास बोटीतून पोर्तुगीज पुलापासून गोदजॅम पुलापर्यंतचे अंतर काटले. मात्र तिथून पुढे त्यांची बोट एका अर्धवट बुडालेल्या झाडाखालीं फसली आणि त्यांना प्रयत्न सोडून द्यावा लागला.

ग्रंथालय ठाणे
प्रवास
दा. क्र. 682
26666
शाखा

# एक

हेन्री मॉर्टन स्टॅनले :

मध्य आफ्रिकेत शोध कामगिरीवर पाठविणारा हुकूमनामा वाचल्यावर मीं आश्चर्यचकित होऊन विचारले, ' या एवढ्याश्या वाटणाऱ्या प्रवासाला किती खर्च येईल याचा अंदाज आहे तुम्हाला ?'

' बर्टन आणि स्पेकच्या प्रवासाला सुमारे तीन ते पाच हजार पौंड (स्टर्लिंग) खर्च. आला आणि आता गेला बाजार अडीच हजार पौंडाच्या खाली खर्च येणं शक्यच नाही.

' तू काय कर सांगतो. तूर्तास हजार पौंड काढ. ते संपलें की आणखी हजार पौंड काढ. तेही संपले की आणखी हजार पौंड, मग आणखीं हजार—पण काहीहीं झालं तरी लिव्हिंग्स्टनला शोधून काढच.'

❑ ❑ ❑

माझी हालत फारच वेगळी होती. मीं लिव्हिंग्स्टन किंवा आणखी कोणाच्या शोधात निघालो नव्हतो, की बँकेत माझ्या खात्यात एक कवडी-दीडकी काय मुद्दलात माझं बँकेत खातेच नव्हते. कुठल्याही कामगिरीवर माझी कोणी रवानगी केली नव्हती जानी दोस्त सोडले तर मी कुठे आहे याची माहिती कुणालाच नव्हती. एका इटा-लियन बोटीतून मी प्रथम पोर्ट सैदहून मासुआला आलो होतो आणि तिथून अस-मारा मार्गे आदिस अबाबाचा किनारा गाठला होता. १९५९ च्या नोव्हेंबर अखेरची गोष्ट आहे ही. माझ्या या मोहिमेसाठी माझ्याकडे पट्ट्याच्या चोरकप्प्यात लपवलेले उदंड ५०० अमेरिकन डॉलर्स, खलाशाच्या पोतड्यात कोंबलेला तंबू, झोपण्याची पिशवी, कॅमेरा फिल्म वगैरे साहित्य, रोजनिशा आणि रेखाचित्रांची पुस्तके होतीं, शिवाय निळी पाटलोण-सदरा-जाकिट, बस्स् इतकेच !'

वयाच्या पंधराव्या वर्षापासूनच मीं आफ्रिकेतल्या मोहिमांची आणि सफरींची स्वप्नं बघत असे. गाढ्या संशोधकांनी किंवा बेडर मुशाफिरांनी काढलेल्या मोहिमांची रंगीली चित्रं असत ती. माझ्या स्वप्नातले हे गाढे संशोधक एखाद्या अनामिक आदि-वासी जमातीच्या वा जनावराच्या शोधात असत किंवा एखाद्या अज्ञात गिरिशिखरी

किंवा नदीच्या उगमापाशीं आपल्या देशाचा झेंडा फडकविण्यात दंग असत. सतत एखाद्या अद्‌भुत खजिन्याच्या शोधात तरी असत नाहीतर आफ्रिकेचे रेगीस्तान कमीत कमी वेळात, कठीणात कठीण मार्गाने पार करण्याच्या खटाटोपात असत.

मात्र, माझ्या स्वप्नातल्या या दोन्ही प्रकारच्या मोहिमांबरोबर दारूगोळा, बंदुका; अन्नधान्य, औषधं, मजूर, माणसं, तंबू आणि सरकार संशोधन संस्था यांचे आशीर्वाद असा भक्कम जामानिमा असे.

या सर्वांच्या तुलनेत माझी मोहीम अगदींच भुक्कड होतीं. केवळ दैवयोगाने माझ्या वाचनात एक पुस्तक आले होते आणि त्यात माझ्या ईप्सित स्थळाचे वर्णन केले होते. लेक तानापासून सुदानच्या सरहद्दीपर्यंतचा ब्लू नाईलचा अवखळ अनवट प्रदेश म्हणजे रिओ डेल ओरो वाळवंटाचे काहीं सैरभैर तुकडे आणि तिबेस्तींच्या इर्द-गिर्द असलेली खोरी सोडली तर आफ्रिकेतला न उलगडलेला अखेरचाच प्रदेश असेल.

आता तुम्ही जर मला विचारलं, या असल्या मुलखातून तराफ्यावरून जाण्याचा तुझा मूलभूत हेतू काय किंवा ह्यातून तुझा कोणता उद्देश साध्य होणार किंवा काय वाट्टेल ते–मीं काहीहीं सांगू शकणार नाही.अर्थात मी वाट्टेल तीं उदात्त पण अर्थहीन उत्तरं देऊ शकेन, उदा. प्रथम संशोधक, पायोनियर ( छान वाटलं ना ऐकून ? ); किंवा इथिओपियाच्या दुर्गम भागाबद्दल मनुष्यजातीच्या ज्ञानात भर घालण्याची दुर्दम्य जिज्ञासा अथवा पृथ्वीच्या नकाशावरील मोकळचा जागा भरण्याची जबरीं इच्छा वगैरे. त्याशिवाय साहसाची ओढ, अज्ञाताच्या शोधात, मरणाशी झुंज वगैरे दिलखेचक वाक्यं आहेतच. हे सगळं कानाला गोड लागेल, काही लोकांचा त्यावर प्रामाणिकपणे विश्वासही बसेल, पण खरं सांगतो, यात काही मतो नाही.

माझी ही सफर म्हणजे मी वयाच्या १९ व्या वर्षीपासून केलेल्या वेडझव्या मुशाफिरीचाच एक अविभाज्य भाग होता. मग त्याला सफर-सहल-मोहीम काय वाटेल ते म्हणा. उद्या तुम्ही एखाद्या गिरिशिखरावर चढतात, राष्ट्रीय उद्यानात भटकलात, सरोवरातल्या शिकाऱ्यात दोन-पाच आठवडे काढलेत तर देत बसाल स्पष्टीकरण ? तुमचा आणि माझा उद्देश एकच आहे. फरक इतकाच की मी जरा वेगळा मार्ग चोखाळला आणि माझ्याकडे अमर्याद वेळ होता. मला फक्त अशा प्रवाहात झोकून घ्यायचे होते की जिथे पूर्वी कुणी गेलं नव्हतं.

मी आदिस आबाबाला पोहोचेपर्यंत रात्र झाली होती. काहीं शहरात रात्रीं पोहो- चण्यातच मजा असते. आदिस आबांबा मात्र त्यातले नव्हते. मी एक टॅक्सी केलीं आणि मोडक्या तोडक्या भाषेत ड्रायव्हरला फर्मावलं,

'मला एखाद्या स्वस्त आणि स्वच्छ हॉटेलात घेऊन चल.'

'स्वस्त हॉटेल्स कधी स्वच्छ नसतात.' ड्रायव्हर साहेबांनी शांत सुरात जवाब दिला; आणि एखाद्या मध्यम दर्जाच्या हॉटेलात जायला सुचविले. शिवाय 'जर भर

पूर पैसे आणले नसतील तर आदिस आबाबाला यण्याच्या भानगडींत पडलातच कशाला ' असा बहुमोल सल्ला द्यायलाहीं साहेब मजकूर विसरले नाहींत. साला; मजबूत पैसे नसताना लोक इथें तडफडतातच कशाला, असे मनापासून मानणाऱ्या पंथातला तो असावा.

हॉटेलात पोहोचल्यावर त्याने मागितलेल्या भाड्याच्या पाव हिस्साच भाडे मी त्याच्या हातावर ठेवले. ज्याअर्थी त्याने काही टर्रबाजी केलीं नाहीं त्याअर्थी त्याला जास्तच भाडे मिळाले असावे. हॉटेलातून एक १२-१३ वर्षाचा पोरगा आला आणि काही न सांगता सवरता माझे सामान घेऊन हॉटेलच्या बोळकांडीतून पिछाडीच्या एका अरुंद खोलीत प्रवेश करता झाला. खोलीत एक पांढरा पलंग, पांढरीं खुर्ची; पडदा नसलेली छोटी खिडकी आणि फुटके वॉश बेसीन एवढा शाहीं सरंजाम होता. जोडीला फुटक्या बेसीनमधें साचलेल्या पाण्यात साबणाचा फेस, दाढीचे केस तरंगत होते, ते वेगळेच. पलंगावरील चादरीवरही जागोजाग ' निशाण्या ' होत्या. त्या पोराने न सांगताच स्वतःहून पहिल्या चादरी बदलल्या, दुसऱ्या घातल्या. त्याही पहिल्या चादरीं एवढ्याच ' निशाण्या ' राखून होत्या. मी पार थकलो होतो. खूप उशीरहीं झाला होता. आता दुसरे हॉटेल शोधण्यातही अर्थ नव्हता. मी त्या पोराला थोडीं चिरीमिरी दिली आणि स्वच्छ चारित्र्यवान चादरी हस्तगत केल्या. टेबलावर बागडणाऱ्या झुरळांकडे आणि पलिकडच्या खिडकीतून माझे ' वस्त्रांतर ' बघणाऱ्या वत्साकडे ढुंकूनही न बघता मी अंथरूणावर अंग टाकले. दरवाजाला कुलूपच नव्हते. दिवा विझवल्यावर मी गुपचूप पलंग दरवाजाला नेऊन भिडवला.

आदिस आबाबामधला हा माझा पहिला दिवस वा रात्र. झोपताना मी घनघोर निश्चय केला की तीन दिवसांच्या आत जंगलाचा रस्ता सुधारायचा. अर्थात पुढे काय वाढून ठेवलंय, याची तेव्हा मला अजिबात कल्पना नव्हती. पण आता मात्र हे लिहिताना आदिस आबाबा, आदिस आबाबातले आणि दूरवरच्या खेड्यातले काही लबाड तर काही तितकेच प्रमळ दोस्त, ब्लू नाईल, इथिओपिया या सगळ्यांचीच याद तुफान सतावत आहे. एखादं प्रवास वर्णन लिहिताना नेहमी एक गोची होते. लेखक स्वतःच्या वैयक्तिक अनुभवावरून सर्व अजमावतो. एकतर तो नुसते गोडवे तरीं गात सुटतो किंवा भरपूर शिव्या घालत बसतो. या गडबडीत वस्तुनिष्ठता त्याच्या ओंजळीतून निसटते. असं जरी असल आणि इथिओपियात माझ्यावर कसलेही प्रसंग गुदरले असले तरी लिहिताना माझ्या हातून पहिला अपराध घडण्याचाच जास्त संभव आहे.

इथिओपियाबद्दल मुळातच अगदी थोडं लिहिलं गेलं आहे आणि जे आहे ते बरंचसं चुकीचं आणि दिशाभूल करणारं आहे. इथिओपियाच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीबद्दल मी काही अधिकारवाणीने लिहू शकणार नाही. किंबहुना या पुस्तकात तुम्हाला इथिओपियातील जन्ममृत्यूची वा गुप्तरोग्यांची अधिकृत आकडे-

वारी मिळणार नाहीं. मीं फक्त मला आलेले अनुभव नमूद करणार आहे. माझी सफर जरा वेगळी असल्याने त्यातल्या माझ्या अनुभवावरून इथिओपियातील जीवना बद्दल सर्वसाधारण कल्पना करून घेणं चुकीचं होईल.

इथिओपिया आणि ब्लू नाईलला येण्याअगोदर मीं अनेक ग्रंथालयें पालथीं घालून संबंधित मजकूर वाचून काढला होता. कर्नल आय्. ई. चीसमन १९२५ साली इथिओपियात राजदूत म्हणून आला होता आणि आपल्या आठ वर्षांच्या वास्तव्यात कामाचा वेळ सोडून बाकीं सर्व काळ त्याने या प्रसिद्ध पण अगम्य नदींचा मार्ग मापण्यात खर्ची घातला होता. चीसमन हा खऱ्या अर्थाने निळचा नाईलचा पहिला भूगोलज्ञ. खेचरावर बसून त्याने जवळ जवळ ५००० मैल प्रवास केला आणि शक्य झालं तिथे तिथे सर्व ठिकाणीं नाईलच्या पाताळदरीत उतरला. ताना सरोवराला संपूर्ण प्रदक्षिणा घालणारा युरोपियन तोच. मॅकमिलन कंपनीने १९३६ सालीं प्रसिद्ध केलेले त्याचे 'लेक ताना ॲन्ड दीं नाईल' हे पुस्तक अजूनहीं या प्रदेशावरील माहितींचे अतिशय महत्त्वपूर्ण पुस्तक मानले जाते.

नाईलवरचीं दुसरी अधिकारीं व्यक्तीं म्हणजे प्रसिद्ध जर्मन प्रवासी हर्बर्ट रिटलिंगर. त्याच्या पुस्तकात (Schwarzes Abenteuer इंग्रजीं अनु. Ethiopean Adventure) त्याने कयाकमधून तांबडा समुद्र व निळचा नाईलवर केलेल्या मोहिमांचीं माहिती दिली आहे. हीं माहितीं मला खूपच महत्त्वपूर्ण वाटली.

याशिवाय याविषयावर इतरहीं अनेक पुस्तके होती. उदा. ॲबिसिनियन वॉर, आर्टस् ॲन्डलॅग्वेजेस् इ. जर्मन भाषेतील एक पुस्तक ( Athriopiens Engel sinp Schwarz ) तर अप्रतिम होते.

या पुस्तकाचा लेखक वेलो स्कार्निसेल अशा अवलिया भटक्यांपैकी होता, की जे नेहमी सर्वात खतरनाक जागी जायलाच तडफडतात. हा प्राणी इथिओपियात पोहोचण्यापूर्वी जिबौटीला एका प्रचंड तुफानात सापडला. त्याच्याच शब्दात सांगायचे तर, 'तुफानाने माझ्या खोलीत एकाएकी मुसंडी मारली. मी खिडकीपासून दूर पळून भिंतीतली एक खुंटी जिवाच्या आकांताने पकडून ठेवली. पण वाऱ्याचा जोरच असा होता कीं कोणत्याही क्षणी माझ्या चिध्या चिध्या होतील असं वाटत होतं.' जिबौटी ते आदिसआबाबा रेल्वे प्रवासात त्यांच्यावर डानाकिल आदिवासींनी हल्ला चढवला आणि एका थांब्यावर अचानक आलेल्या पुरात त्याच्या आसपासचे बहुतांश पब्लिक बुडून मेले. इथिओपियाच्या राजधानीत पोहोचल्या–पोहोचल्या त्याला कोणा एकाच्या शिरच्छेदाची शिक्षा बघावी लागली आणि संध्याकाळी त्याचा आणि त्याच्या दोस्तांचा रांडांनी पार राडा केला.

असल्या एकाहून एक अफलातून प्रसंगातून गल्यावर एकदाचा तो नाईलच्या घळीत पोहोचला. तेव्हाचे वर्णन 'नदी किनारीचे दृश्य भयंकर होते. आमच्या तंबू जवळच्याच झाडा-झुडपांत मानवी सांगाडे पसरले होते. तळपत्या सूर्य प्रकाशात

कवटया दात विचकून भेसूर हास्य करींत होत्या. शेजारींच जनावरांचे सांगाडे आणि त्यांची सडलेली खोगिरे लगाम पसरले होते. याचा अर्थ एकच होता. भयानक उन्हात बेसॉल्ट खडकातून बाहेर पडलेल्या विषारी वायूच्या तडाख्यात सापडून हा सर्व काफिला बरबाद झाला होता.

दुसऱ्या दिवशी सकाळीं मीं किंग जॉर्ज बार गाठला. न्याहारीं वगैरे आटपून निघायला उशीर झाला तरी दुपारपर्यंत अनेक जणांची जानपहचान झाली आणि अनेक मजेशीर गोष्टीं कळल्या.

१. नाईलच्या अंतर्गत भागात जाण्यापूर्वी मला गृहखात्याकडून ' प्रवास परवाना ' घ्यावा लागेल.

२. बारचीं खजांचीं मूळची पॅरिसचीं आहे. तिचीं ड्यूटीं रात्रीं साडेनऊला संपते.

३. इथिओपियात दारूगोळयाचे भाव अव्वाच्या सवा आहेत.

४. परदेशी प्रवाशांकडे अगोदरच बंदुकीं वगैरे नसतील; तर त्यांना त्याचे परवाने मिळत नाहींत.

५. फलाण्या–फलाण्या ठिकाणीं काळया बाजारात पण वाजवीं भावात बंदुका मिळतील.

६. अमुक–अमुक जागी काळया बाजारात डॉलरला चांगला भाव मिळेल.

इथिओपियन डॉलर संबंधींहीं मूल्यवान माहितीं समजलीं. बऱ्यापैकीं स्वस्त आणि मस्त हॉटेल किमान १० डॉलर्स, बऱ्यापैकी युरोपियन जवण कमीत कमीं ५ डॉलर्स. याचा अर्थ बऱ्यापैकी जगायला दरदिवशी सुमारे २० ते ३० डॉलर्स लागणार. ( स्थानिक माणसाची रोजी सुमारे २ ते ५ डॉलर्स त्यामानाने हे खूपच झाले ! ) मात्र आदिस आबाबातल्या सस्त्या ' गोष्टीं म्हणजे भारतीय शिंपीं, बूटपॉलिश करणारी पोरं, खचाखच भरलेल्या टॅक्सीज्, मांस, मच्छीं, अंडीं–फळं आणि–

किंग जॉर्ज बारनंतर मी रास हॉटेलचा बार गाठला. मी रांडा धरसोडज्ञा आहे म्हणून नव्हे तर एखाद्या शहराचा कमींत कमीं श्रमात आणि पैशात खराखुरा अंदाजा घ्यायचा असेल तर असेच बारवाले, टॅक्सीं ड्रायव्हर्स, हमाल, बूटपालिशवाली चॅप्टर पोरं, उगाच भटकणारे पंटर, वेश्या यांना गाठावे. खडा न् खडा माहिती समजते.

उदाहरणार्थ मार्टिनीं मॅन–हे त्याचं खरं नाव नसावंच. कारण त्याला कोणीं कॉन्स्टंटाइन म्हणून हाक मारत होतं. तर कुणी रेने म्हणून पुकारत होतं. म्हणून मग मीच त्याचं नाव ठेवलं मार्टिनीं. हा मॅन बरींच वर्षे केनियात राहिला होता आणि काहीतरी भानगड झालीं म्हणून तिथून सटकला होता. त्याने मला अमूल्य माहितीं पुरवली. मोकाट रानटी गुरांपासून सांभाळ, आदिवासींना जवळच्या बंदुका–बिंदुका दाखवू नकोस, कारण ते त्यासाठी पागल होतात, रांडा स्वस्त असल्या तरीं गुप्तरोगा-पासून सांभाळ, पाण्यापेक्षा दारू जास्त पीं. गावठीं साहेबाचा मान राखत जा वगैरे.

तुला नाईलची काय माहितीं ? असं विचारल्यावर त्याने माकडासारखा चेहरा

वेडावाकडा करत ( जरा ' जास्त ' झाल्याचा परिणाम ! ) मलाच उलट विचारलं, ' तुझं वय काय ?' पंचवीस ? ' नाही बावीस ' मी

मग त्याने अजून दोन-तीन ग्लास मारले आणि सुरुवात केली. ' मी नाईलची पहिली सफर केली, तेव्हा फक्त १० वर्षांचा बच्चा होतो. त्यावेळी माझ्याकडे फक्त एक शॉटगन, तीन काडतुसं, एक ब्लँकेट, खिशातला चाकू, माचीस आणि थोडं मीठ होतं. माझ्या बापाने मला फक्त एक आठवडा बाहेर रहाण्याची परवानगी दिली होती. त्याप्रमाणे मी एकच आठवडा बाहेर घालवला. नंतर वयाच्या तेराव्या वर्षी पहिला हत्ती मारला, तेव्हापासून आतापर्यंत मी जंगल झाडा-झुडपातच भटकत आहे, पण, पोरा, माझं ऐक, त्या नाईलचा नाद सोड.' असं सांगणारा हा एकटाच नव्हता. मी निळ्या नाईलचा विषय काढला रे काढला की प्रत्येकजण नापसंतीने मुंडी हालवत, मला माझ्या बेतापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करत.' प्रत्येकाकडे दर्दभऱ्या नाट्यमय कहाण्यांचा साठा असे–

मला नाईलच्या ज्या भागात जायचे होते त्या भागाबद्दल रिटलिंगरने आपल्या पुस्तकात लिहिले होते. ' आदिस आबाबामध्ये आम्हाला आणखी खतरनाक गोष्टी ऐकायला मिळाल्या. सर्वदूर मगरीच मगरी, साप–लुटारू–महारोग–गुप्तरोग विषारी वायू आणखी काय काय ! एका माणसाला तर त्याच्या बायकोच्या डोळ्यादेखत मगरीने पाण्याखाली फरफटत नेला. या शेवटच्या दर्दभऱ्या कहाणीच्या तर सत्तावीस आवृत्त्या आम्हाला ऐकायला मिळाल्या.'

या सगळ्या ऐकीव गोष्टी वारंवार ऐकून आता नाईलच्या ' तोंडी ' जायची माझी अगदी पूर्ण मानसिक शारीरिक तयारी झाली होती. पण इथे आदिस आबाबा-मध्ये काय पुढे वाढून ठेवले होते, त्याला तोंड द्यायची माझी तयारी नव्हती. युरोपात मला इथिओपियाचा व्हिसा दोन महिन्यात मिळाला, पण खुद्द इथिओपियात काहीच्या बाहीच वेळ लागू लागला. खरं म्हणजे माझीच चूक झाली. मी सरकारी फी वगैरे भरून इनामदारीत मायबाप सरकारला माझी संपूर्ण योजना सांगितली. हप्त्याभरा-नंतर मला गृहखात्याने कळविले की मुख्य पोलिस ठाण्यात जाऊन भेटा. परत एकवार डझनभर फॉमर्स, सह्या, स्टॅम्पस्, पासपोर्ट–फोटो–

' ठीक आहे, उद्या भेटा.' इथिओपियात हाच सर्वत्र परवलीचा शब्द असावा. प्रत्यक्षात आणखी काही फी वसूल केल्यानंतर आठवड्याभराने मला असं सांगण्यात आलं की पोलिसांना बहुतेक असा परवाना देण्याचा अधिकार नाही. त्याऐवजी मी प्रवास परवाना व व्हिसाची मुदत वाढ करून घ्यावी. मात्र त्याशिवाय मी नाईलच्या अंतर्भागात जाण्याच्या फंदात पडलो तर लेक ताना वा पुलाजवळचे पोलिस मला धरून आणतील व थेट इथिओपियाबाहेर माझी रवानगी होईल. मधल्या काळात मी एक शॉटगन खरेदी केली आणि रीतसर परवान्यासाठी अर्ज केला.

' तुम्हाला बंदूक कशासाठी पाहिजे ?'

'शिकारीसाठी ' मी.

'शिकारीचा परवाना आहे ? नसेल तर निमूटपणे शिकारीचा परवाना काढा.'

खात्यात आणखी अमूल्य माहिती समजली. पहिल्यांदा शिकारीचा सर्वसाधारण परवाना घ्यावा लागतो. ( त्याची फी भरपूर असते ) मग जिथे जायचे आहे त्या भागासाठी आणखी एक परवाना. ( त्याचीही फी मजबूत असते ) नंतर तुम्हाला तुम्ही मारलेल्या 'तोहफ्यांची ' निर्यात करायची असो वा नसो 'निर्यात परवाना ' घ्यावा लागतो. आणि सर्वात शेवटी तुम्ही मारणार असलेल्या ( किंवा नसलेल्या ) संभाव्य प्राण्यांची नेमकी संख्या सांगून सर्वात जबरीं फी भरायची. एवढं सगळं रामायण सांगून झाल्यावर मला सांगण्यात आलं, 'महाराजांच्या आज्ञेवरून यावर्षी कोणालाच शिकारीचा परवाना देण्यात आला नाहीं. पुढच्या वर्षी या.' 'नक्की काहीं तरीं खटपट करू.'

केवळ नशिबानेच मला ऑफिसच्या दारात वन्यजीवन वन व मत्स्य विभागाचा प्रमुख भेटला. तो जर्मन आणि त्याचा नेटिव्ह सहाय्यक अधिकारीं जर्मनींत शिकले होते. ते कनवाळू निघाले. त्यांनी सगळी मदत देण्याचे कबूल केले. जर्मन आणि अमेरिकन सचीवही भली माणसं निघाली. त्यांनी मला जेवू घातलंच, वर डुक्कर-माकड-साळूसारखे उपद्रवी प्राणी मारायचा परवानाहीं मोफत दिला. शिवाय त्या दयाळू प्रमुखाने एक अधिकृत ओळखपत्रही बहाल केले. (नंतर चोरून-मारून इतर प्राणी मारताना मला भयंकर संकोच वाटत होता, पण नाविलाज को क्या विलाज! )

मधल्या काळात मी केनियाच्या सरहद्दीवर फेरफटका मारून आलो. तिथे आणखीं एक परवाना फटका बसला. मीं एका बाजारात गुमानपणे फोटो काढत होतो. एवढ्यात एक हवालदार भडकून आला. 'फोटो परवाना ?' माझ्याकडे नव्हताच. त्याने मारक्या बैलासारखे माझ्याकडे रोखून बघितले आणि जोर-जोरात शिटीं फुंकलीं. आणखी चार जमादार अवतरले. एकाने माझा कॅमेरा हिसकावला तर एकाने कॅमेऱ्याची बॅग. तिसऱ्याने मला निमूटपणे त्यांच्या मागून यायला फर्मावले. माझ्या मागे तमाम गावकरी आणि बाजारकरी. आतापर्यंत त्यांचे फोटो घेताना त्यांनी ढीम मनावर घेतले नव्हते, पण आता त्यांचाही संताप ऊतू जायला लागला. जणू मी कोणावर बलात्कार केला होता. नशीब माझी धुलाई झाली नाही. मला चौकीत नेलं. तिथे दुभाष्यामार्फत मला सांगण्यात आलं की; मीं विना-परवाना फोटो काढल्याबद्दल मला वीस डॉलर्सचा दंड ठोठावण्यात आला आहे. मी कधीं बापजन्मात या फोटो परवान्याबद्दल ऐकले नव्हते. शिवाय वीस डॉलर्स म्हणजे अतीच झाले. मी सांगितले 'देत नाही !' 'मग तुमचा कॅमेरा जप्त होईल.'

आता आली आफत. मीं सगळ्यांना चहा-पाणी देण्याची लालूच दाखविली. गंभीर परिस्थितीचा सर्वांगाने विचार केला. खिडकीतून चोरून आमचा 'खटला ' ऐकणाऱ्या पोराला चहा आणायलाहीं पाठविले. पण हवालदार चहा-पाण्याचे पैसे

घेईनात. आणखी दोन तास वाटाघाटीं. मग निकाल लागला. दंड व परवाना फी धरून दहा डॉलर्स. आणखीं एका तासाने गोष्टी पाच डॉलर्सवर आल्या. हवालदाराला घरी जेवायला जायचे होते. मीं आमंत्रण दिले,' माझ्याबरोबरच हॉटेलमध्ये जेवायला चला.' पण हवालदार भलताच खानदानी निघाला. उलट तोच सन्मानपूर्वक मला त्याच्या घरी घेऊन गेला. तो दुभष्याही आला. पण हुशारीने त्याने परवान्याचा विषयच काढला नाहीं !

राजधानीत परतल्यावर मी फोटो परवान्याची चौकशी केली. मला उत्तर मिळालं इथिओपियात प्रवासी यावेत म्हणून सरकार प्रयत्नशील आहे. अशा परवान्यांचीं काहीही आवश्यकता नाहीं. गेल्या कित्येक वर्षांत अशा परवान्यांची गरजच भासली नाही.' पण तिथे मात्र काही तासातच मला परत धरले. स्टेशनसमोर दोन हमालांची सामानावरून जुंपली होती. अगदी लाठ्या–काठ्या घेऊन. पण पोलिसांनी त्यांना धरण्याऐवजी त्यांचे फोटो काढणाऱ्या मलाच पकडले. परत एकवार पोलीस चौकी. कॅमेरा-फिल्म द्या वगैरे. मी त्या मारामारीचा एकही फोटो घेतला नव्हता व आधी घेतलेले महत्त्वाचे फोटो मला वाया घालवायचे नव्हते. मी सांगितले मला जर्मन वकिलातीत अथवा मुख्य पोलिस ठाण्यात घेऊन चला. मग एका उघड्या जीपमधन दोन सशस्त्र चौकीदारांच्या पहाऱ्यात आमचीं वरात पोलीस ठाण्याकडे आली. मी ज्याच्याकडे प्रवास परवान्यासाठी अर्ज केला होता, तोच अधिकारी सुदैवाने समोर आला. त्याला इंग्रजी व फ्रेंच भाषा उत्तम येत होती. मी त्याला माझी दर्दभरी कहाणी सुनावली. त्याने त्या हवालदारांना सज्जड दम भरून माझी निर्दोष सुटका केलीं. एवढेच नाही तर ' मी इथिओपियाचा सन्माननीय अतिथी आहे आणि गरज पडेल त्या पोलिस स्टेशनवरून मी मदत. मार्गदर्शन घ्यावे. अशा मजकुराचे पत्रही दिले. लालफितीविरुद्धच्या माझ्या लढातईला हा निर्णायक क्षण होता.

पण माझ्या कामात जास्तीत जास्त रस घेतला तो इथिओपियात काम करणाऱ्या पॉइंट IVप्रोग्रॅमसाठी आलेल्या अमेरिकन लोकांनीं. त्यांचीं मला खूप मदत झाली. केवळ सुदैवाने त्यांच्यातल्या रोनाल्ड वूड नावाच्या माणसाशी माझी प्रथम भेट झालीं.

एका इथिओपियन विद्यार्थ्याने दिलेल्या पार्टीत मी आणि रोनाल्ड दोघेच गोरे होतो. आमचा यजमान चोर–दरोडेखोर होता हे नंतर समजलं. पण ती बात अलाहिदा. आमची दोस्ती पक्की झाली. दुसऱ्याच दिवशी वूडी मला त्यांच्य- ' अमेरिकन वॉटर स्टडीज ग्रुप्स 'मध्ये घेऊन गेला. आणि धडाधड त्याच्या सहा काऱ्यांच्या ओळखी करून दिल्या. एखाद्या सरकारी यंत्रणेतल्या लोकांनी एवढ्या आपुलकीने माझ्यासारख्या नफ्फट माणसाची चौकशी करावी निःस्वार्थीपणे मदत करावी हा सर्वच विलक्षण अनुभव होता. माझ्या सफरीच्या समर्थनार्थ मला काहीही सांगावे लागलें नाही.

' ब्ल्यू नाईल ? ती पार करणारा तू पहिलाच असशील ?'

'मीं फिल्म घेणार आहे– पशु-पक्ष्यांचा अभ्यास करणार आहे. धरणासाठी जागा शोधणार आहे.' वगैरे उत्तरे मी मनातल्या मनात तयार ठेवली होती. पण मला नाईलवर भटकंती करायची आहे, एवढंच कारण त्यांना पुरेसे असावे. लगेच त्यांनी मला नाईल प्रदेशाचे नकाशें, हवाई छायाचित्रे वगैरे दाखविली. त्याबरहुकूम मीं नाईळचा लेक तानापासून सुदानी सरहद्दीपर्यंतचा १ : ५००,००० मापाचा नकाशा तयार करून घेतला. तसाच लेक तानाच्या मुखापासून तिसइस्सात धबधब्यापर्यंतचा नकाशाहीं १ : ५५००० च्या मापात तयार केला.

पुढच्या आठवड्यात माझा प्रवास-परवाना नक्की मिळेल असं मला सांगण्यात आलं होत. तोपर्यंत माशा मारत बसण्याऐवजी इथिओपियन एअर लाईन्सची लेक तानाची ५० टक्के सवलतीची सफर करून यायचं ठरवलं. एका पिशवीत माझा कॅमेरा, शॉटगन व तंबू घेऊन मी निघालो. बहारदारला मी ५ इथिओपियन डॉलर्स देऊन एक तानुका बोट व रस्सी घेतली. पॅपीरसच्या जाड काठ्यांपासून तयार केलेल्या 'तानुका'ला बोटीपेक्षा निमुळता डोंगा म्हणणं जास्त योग्य होईल. पॅपीरसच्या लव्हाळ्याच्या जुड्यांनी तयार केलेला हा डोंगा जेमतेम महिनाभर पाण्यात राहू शकतो, नंतर सडून पाण्यात बुडायला लागतो मात्र तो तरंगायला फार हलका असतो त्यामुळे वल्हवायला फार सोपे जाते.

बहार–दारच्या पोलीस अंमलदाराने मला विचारले, 'याचं तू काय करणार?'

'मी हा वल्हवत नव्या पुलापर्यंत जाणार. त्यासाठी मला जेमतेम तास लागेल. मग तिथं दोन-चार दिवस राहून मी परतेन.'

तो पोलीस जरा काळजीत पडलेला दिसला. पण त्याने काहीं आडकाठी मात्र केली नाही. मी लगेच भाजी, ब्रेड, अंडी, चहा, साखर वगैरे खरेदी केली आणि काढता पाय घेतला.

लेक तानाच्या मुखापर्यंतचे अंतर सुमारे अडीच किलोमीटर्स होते. तिथुन लव्हाळ्यांच्या बेटातून नवीन बांधकाम चालू असलेल्या पुलापर्यंतचे अंतर आणखीं ३ कि.मी. होते. पुढचा सहा कि. मी. चा प्रवाह अरुंद, खोल व संथ होता. फक्त मधून मधून झाडा-झुडपांची, गवतांची अगणित बेटे होती. या बेटांमध्ये रंगी-बेरंगी पक्षी होते, हरिणं होती. डुकरं होती. एका जागी तर मला आख्खे पाणघोडा कुटुंब भेटले. मगरीचा मात्र मागमूस नव्हता. खरोखर स्वर्ग होता हा. तेवढे धबधबे सोडून! साला त्यांना सुमारच नव्हता. छोटे छोटे धबधबे आले की मी डोंग्याला दोर बांधून त्याला किनाऱ्यावर ओढून घेत असे. पण कित्येक धबधबे असे खतरनाक होते कीं दोर बांधण्यात अर्थच नसायचा. मी निमुटपण माझे सामानसुमान किनाऱ्यावर उतरवायचो. डोंगा प्रवाहात लोटायचो, परत धावत पळत ठेचकाळत जाऊन तो खालच्या बाजूला जाऊन पकडायचो. अनेकदा डोंगा पार दृष्टीआड व्हायचा, पण काही अंतरावर हमखास गवसायचाच. एकदा मात्र तो नदीपल्याड गेला आणि झक मारत

पोहत जाऊन मला तो काठावर आणावा लागला. पण असा धोका पत्करण्यात जास्त अर्थ नव्हता. कारण डोंगा गेला तरी माझे सामान माझ्याकडेच होते. बहार दार ला मी पायी परतू शकलो असतो. मात्र एका अर्थाने ही कसोटीच होती. जर माझा हा अफलातून डोंगा तिस इस्साटपर्यंतचे ३० कि.मी. अंतर कापू शकला असता तर मग मला आणखी नवा डोंगा बनवून बाकी अंतर पार करता आले असते. पण हाय ! डोंग्याने पाणी कापण्याऐवजी डोंग्यालाच नदीच्या पात्रातील अणकुचीदार दगडाधोंडयांनी कापून काय सोलून काढला ! तिस इस्साटला पोहोचेपर्यंत त्याच्या पार चिधडया झाल्या.

तिस इस्साट हा ' आगडोंब ' (Smoke of fire) या अम्हारिक शब्दाचा अपभ्रंश आहे. घनदाट जंगलातून जाणारी ऐसपैस नदी अचानक दीडशे फूट कडयावरून खाली खोल खोल दरीत झेपावते. सर्व आसमंत हादरवून सोडते. फवारणाऱ्या तुषारातून इंद्रधनुष्य विहरत राहतात. सुदानपर्यन्तचे पुढचे ५०० मैल मग नदी डोंगरकपारीतून नागमोडी वहात रहाते.

तिस-इस्साटच्या पुढचे काही मैल नदी बसाल्ट खडकांच्या अरुंद फटीतून फिस्कारत जाते. तिथे बोट घालणं शक्यच नाही. तिथून खाली काही अंतरावर पोर्तुगीज पुलाजवळ नदी जरा शांत होते. पण तिथेही ' तानुका ' घालणं अशक्यच होतं. मी निमूटपणे बहार-दार मार्गे आदिस आबाबाला परत आलो आणि तिथून गॉंदजॅम ब्रिजला जायच्या तयारीला लागलो.

सर्वजण इमानदारीत मला मदत करत होते. पण मजप्रती काय होणार याची चिंता सर्वांनाच लागून राहिली होती. माझ्याजवळ ती व्यक्त करण्याची सगळयांच्यात जणू चढाओढ लागली होती. ' काय सांगायचं, तसे तसे माशा, धबधबे, सुसरी--मगरी, पाणघोडे आ वासून उभे असतील ! एका डॉक्टरबाबाने मात्र इंजेक्शने – औषधे देऊन भरीव मदत केली तर दुसऱ्या भल्या माणसाने काडतुसाची खोकी दिली मात्र ' काही धोकादायक दिसलं तर तू आधी गोळी घाल. अजून काही गोळया घाल आणि मग जाऊन पहा, त्याची गरज होती का ?' असा मौलिक सल्ला द्यायलाही तो विसरला नाही.

तब्बल पाच आठवडयानंतर आवश्यक कागदपत्र पूर्ण झाले, निदान माझी तशी समजूत झाली ! पण नाहीच. गॉंदजॅम, शोआ आणि वेलेगा या सरहद्दीवरच्या प्रांतात जाण्यासाठी आणखी काही शिफारसपत्रे लागणार होती. त्यात एक आठवडा गेला. त्यानंतर पुढे कुणी या चिठोऱ्याकडे ढुंकूनही बघणार नव्हते. पण काय करणार आदिस आबाबाचे सहा आठवडे भलतेच महागात पडले. शॉटगन, काडतुसं आणि हवाबंद अन्न सोडून मी काहीच विकत घेऊ शकलो नव्हतो आणि आता तर खिसा साफ ! पुढे मी मगरीची कातडी विकून थोडी फार कमाई करेन अशी मला आशा होती. पण ती झाली पुढची गोष्ट. पण आता काय बोंब !

पण आपले तकदीर फळफळले ! आदिस आबाबाच्या एका अतिविशाल महिला-मंडळाचे वार्षिक स्नेहसंमेलन होते आणि त्यानिमित्त त्यांनी लोकनृत्य, संगीत स्पर्धा वगैरे वगैरे कार्यक्रम ठेवले होते. सोबतीला साहेबांसाठी जुगारही होता. माझ्याकडे तब्बल तीस डॉलर्स होते.

मी हिशोब केला. पुढच्या दोन-तीन महिन्यांसाठी दाणा–पाणी घ्यायचे तर किमान २० डॉलर्स हवेत. शिकार आणि मासेमारीवरच गुजराण केली तरी तांदूळ–आटा–साखरेसाठी फक्त दहा डॉलर्स लागतील. शिवाय नदीपर्यंतच्या प्रवासाला पाच डॉलर्स लागणार.

याचा अर्थ पंधरा डॉलर्स बाकी उरतात. मी पट्ट्याच्या चोरकप्प्यातून पंधरा डॉलर्स काढले आणि रुबाबात जुगार अड्डयात शिरलो. हरलो तर उद्या सकाळीं टाकोटाक निघायचे. पण आपल्याला पैशांची मरणातून गरज आहे. कसंही करून जिंकलं पाहिजे, जिंकलंच पाहिजे. जिंकेनच !

तिथं रौलेट आणि बॅकॅरॅट नावाचे जुगार होते. रौलेट मला आवडत नाही. बॅकॅरॅटची तीन टेबलं होती आणि प्रत्येकाभोवती दहा-दहा जुगारी होते. पन्नासएकजण त्यांच्यामागून डोकावून कसलीतरी वाट पहात होते. कसली देव जाणे. तीं सगळी जवान इथिओपियन पोरं होती. त्यांच्याकडे जुगारालाच काय दारूला पण पैसे नव्हते. कसलातरी चमत्कार घडण्याची ते वाट पहात होते. पण तो घडणार नाही हेहीं त्यांना माहीत असावे. गोऱ्या, अर्धगोऱ्या आणि तद्दन देशी साहेबांच्या हातातून चाळविणाऱ्या ५०–१०० च्या नोटांकडे ते आशाळभूतपणें पहात होते. सगळं वातावरण कोंदट होतं. कुठून झक मारून इथं आलो असं झालं. मला त्या पोरांची दया आली. वैतागून मी बाहेरच पडणार होतो एवढ्यात एक दोस्त भेटला. त्याने खेळाचे बदललेले नियम सांगून जरा भूल घातली म्हणून मी एका जुगाऱ्यावर पाच डॉलर्स लावले. तो हरला, आम्ही हरलो. परत पाच डॉलर्स लावले. परत तेच. आता फक्त पाच डॉलर्स उरले. आयला ! या जुगाराचं काहीं खरं नाही–

शेजारच्या टेबलावर एक उदास डोळ्यांचा पण खानदानी अम्हारा जुगारी बसला होता. मी त्याच्याकडे गेलो आणि त्याच्या उदास डोळ्यांकडे बघून उरले-सुरले पाच डॉलर्स लावले. आमचा पंटर जिंकला. अर्थात मीपण. पुढल्या डावाला दुप्पट. परत जीत. परत डाव, परत जीत. आता चाळीसपैकी वीस लावले. परत जीत. दोन तासांनी बाहेर पडलो तेव्हा माझ्या मूळ भांडवलाच्या सोळापट पैसे खिशात खुळखुळत होते !

दुसऱ्या दिवशी आणखी दारूगोळा (एकूण १५० काडतुसे) आणि पुढील माल–मसाला खरेदी केला. प्रत्येकी दहा पौंड आटा, तांदूळ, साखर, डॅनिश बियर, मीठ (निव्वळ खाण्यासाठी नाही तर मगरीचे कातडं कमाबण्यासाठी पण) दुधाची भुकटी फळं, मटार, लिंबू, सरबताचे सहा डबे, १ पौंड चहा-कॉफी, दीड गॅलन तेल, कांदा,

लसूण–मसाले, काड्यापेटयांची वीस खोकीं. किटली–पातेली, चाकू–रस्सीं, सिगारेटी आणि स्कॉचच्या पाच बाटल्या ! आणखी काय पाहिजे ?

दुपारी निघालो–

◆

## दोन

नाईलच्या खोऱ्यात स्थानिक आदिवासी हत्तींच्या मागावर इथे तिथ भटकले असले तरी हे खोरे तसे निर्मनुष्य आहे. काठावर वाढलेल्या झाडाझुडपांतून माकडपक्षी रहात असतील तेवढेच–

या भयंकर घळीपासून स्थानिक आदिवासीही दूर रहातात. इथपर्यंत जेमतेम पोहोचलेल्या संशोधकांनी एखाद दुसऱ्या ठिकाणीं मुसंडी मारून मोकळ्या नकाशावर काही तुटक-तुकट रेषा मारल्या असतील. पण त्या पलीकडे काही नाही. या प्रयत्नात त्यांचे हमाल मात्र तापाला बळी पडले.

नाईलच्या खोऱ्यातील वाघ-सिंह-पाणघोडे-मगरी यांना भाला–बंदुकीची काहीं माहितीच नसल्याने ते स्वर्गीय आनंदाने तुडुंब असतात. आफ्रिकेतल्या कुठल्याहीं जंगलात त्यांना मनुष्यप्राण्यापासून इतकी शांतता मिळत नसेल.

एमिल लुडविग.

□ □ □

विषुववृत्ताच्या उत्तरेकडे १० व्या अक्षांशावर नदीच्या बाजूला, मला वाटलं होतं त्यामानाने रक्तपिपासू डास आणि त्से त्से माशा फारच कमीं होत्या. भल्या पहाटे मी नाईलच्या घळीच्या तोंडाशीं आलो, पण खरं सांगू जरा निराशच झालो. माशा डास नव्हते म्हणून नाहीं तर घळीचे भगदाड एवढे काही रौद्र नव्हते म्हणून. घळ काहीं काही जागीं ५–६०००० फूट खोल होतीं. घळींच्या कडेने जाणारा बाकदार रस्ता जीवघेणी वळणे घेत लेळताना आणि सुदानपर्यंतचा नाईलवरचा एकुलता एक पूल पार करतो, त्याच्या बाजूच्या डोंगरावर टप्प्याटप्प्यांनीं खाचरं पडलीं होतीं.

दरींच्या दोन्ही टोकात काहीं ठिकाणीं तर पाच सहा मैलांचे अंतर होते. निम्म्यावर उतरल्यावर आणि तेही काहीं थोड्या जागीच पाताळातून वाहणारी नदीं दिसायचीं.

४ जानेवारी १९६०. मीं आणि माझे सामानसुमान घेऊन येणारीं लॉरीं पुलाजवळ थांबलीं आणि मीं पटकन उडीं मारून उतरलो. आजूबाजूच्या पोरांनीं लगेंचच मीं आणलेल्या दहा-बारा निलगिरींच्या ओंडक्यांचा ताबा घेतला. तेलाची रिकामीं पिंपेही मीं त्यांच्या सुपूर्द केली. कोणी काही आडकाठीं करू नयें म्हणूनच मी ही व्यवस्था केली होतीं.

पुलाच्या तीरावरील पहारेकरी लगेंचच बंदूक रोखून धावत आले. ट्रक ड्रायव्हरने वेग वाढविला आणि बघता बघता पूल पार करून गोदजॅमच्या घाटरस्त्याला लागला सुद्धा. आता उरलो मीं. पहारेकरी तर चाटच पडले होते. त्यांचा साहेब मला अम्हारिक मध्ये काहीतरी विचारत होता. मला एक शब्द समजेल तर शप्पथ !

'कृपया तुमचा पासपोर्ट दाखवा.' त्याने इंग्रजीत विचारले. त्याला इंग्लीश येते य कल्पनेनेच माझा ताण हलका झाला. मी लगबगीने पासपोर्ट काढून दिला. त्याने अगदी काळजीपूर्वक सर्व पाने उलटून स्टॅम्पस्, व्हिसा नोंदी वगैरे बघितल्या. मात्र मुंडी हालवत परत मागणी केलीं, 'कृपया तुमचा पासपोर्ट द्या.'

मी माझा प्रवास परवाना, मुख्य पोलिस ठाण्याचे पत्र त्याच्या हवालीं केले. त्याने मान हलवली आणि परत एकवार सगळ्या सहीशिक्क्यांची स्वतः पहाणी केली, गोदजॅमच्या बाजूकडील पहारेकऱ्यांनाही ते सगळं दाखवलं आणि परत कागदपत्रांकडे पहात मोठ्याने मागणी केलीं, 'कृपया तुमचा पासपोर्ट'

त्याला काय पाहिजे आहे तेच कळेना. मी माझ्याकडे असतील नसतील तेवढी कागदपत्रे, शिकार परवाना, बंदुकीचा परवाना, ओळखपत्र सगळं त्यांच्या हवालीं केले. आता तो साहेब आणि त्याचे शिपुर्डे कोंडाळें करून बसले आणि कागदपत्रांची छाननीं करू लागले. पण ज्या पद्धतीने ते उलटे-सुलटे करत होते, त्यावरून माझ्या लक्षात आले की केवळ ते शिपाईच नाहीतर त्यांचा साहेबही अनपढ असावा. आणि त्याला 'युवर पासपोर्ट प्लीज' एवढेच इंग्रजी येत असावे. 'युवर पासपोर्ट'

आता मात्र माझा संताप अनावर झाला. साला या भिकारचोट कागदपत्रांसाठी माझे सहा आठवडे बरबाद झाले आणि तुम्हाला ते वाचताही येत नाही ! माझा आवाज टीपेला पोहोचला होता. नाटक न करताही मी त्यांना जर्मन भाषेत आई–माई वरून शिव्या घातल्या आणि शेवटी आम्हरिक मध्ये सुनावले 'आता ताबडतोब फुटा–'

सोजिर बिचारे एवढे गोंधळले की त्यांनी ताबडतोब बंदुका खांद्यावर टाकल्या आणि जायला वळले. मी त्यांना थांबवले, माझी सर्व कागदपत्रे ताब्यात घेतली आणि हुकूम सोडला. 'माझं सामान उचला आणि निमूटपणे नदीकाठी नेऊन पोहोचवा !'

मी काय बोललो, त्यातल्या त्यांना एक शब्दही समजला नसेल, पण माझ्या रुद्रा-

वताराचा परिणाम झाला होता. माझे सामान घेऊन ते चालू लागले. त्यांच्या साहेबाची गोची झाली. कागदपत्रातला ओ का ठो न कळूनही कागदपत्रात अनेकदा भयानक महत्त्वाच्या गोष्टी असतात हे त्याला माहीत असावे. त्यामुळे पुलाचे रक्षण आणि माझी सेवा या दोन्ही गोष्टी एकाच वेळी पार पाडण्यासाठी त्याने एका हातात पिप पकडले तर दुसऱ्या हातात भरलेली बंदूक !

कशासाठी कोण जाणे, पण त्या पुलाची भलतीच काळजी घेतली जात होती. मला नाही वाटत कोणी घातपात करेल. तरीही तिन्हीसांजेला पूल बंद व्हायचा तो दुसऱ्या दिवशी सूर्योदयापर्यंत. त्या पुलावर क्षणभरही रेंगाळायला मज्जाव होता. पुलाचे फोटो घेतलेले चालायचे नाहीत किंवा खाली किनाऱ्याकडून पुलावर आलेले खपायचे नाही. अशा परिस्थितीत मी तिथे पुलालगतच खाली नदी किनाऱ्यावर तंबू ठोकला. लाकडाचे औडके, पिपे वगैरे टाकून. विचित्र नजरेने पहात शिपाई आपल्या राहुटयांकडे परतले. माझ्या अगोदरच्या रिटलिंगटच्या मोहिमेला इथे फार झगझग झाली होती, त्यामानाने मी नशीबवान होतो. तंबूत थोडा आराम करून मी बाहेर पडलो. खूप गरम होत होतं. सकाळचे दहा वाजले असतील. कदाचित अकराही. घळीच्या थोराड भिंतीमुळे काहीच अंदाज येत नव्हता.

सप्टेंबर अखेर कोरडया मोसमाला सुरवात होते. त्यामुळे आसमंतातला हिरवा रंग मिटून शुष्क तपकिरी रंग चढायला सुरुवात झाली होती. नदीचे पाणी उतरले होते आणि झाडीआडून डाव्या किनाऱ्यापर्यंतची वाळू उघडी पडली होती. अनेक ठिकाणी काटेरी झुडूपांचे अभेद्य रान माजले होते. मो ज्या झाडांखाली तंबू ठोकला होता. ती मात्र प्रचंड होती. त्याची सावलीही घनदाट होती.

नदीपल्याड एका कडयावर माकडं उडया मारत होती. इथिओपियाच्या उत्तर प्रांतात मी अशा माकडांच्या टोळयाच्या टोळया बघितल्या होत्या. इथेही त्यांना उंडारताना बघून मजा वाटत होती. झू मध्ये त्यांना पहाताना आपण त्यांच्या अशा मुक्त जीवनाची कल्पनाही करू शकत न-ही. एक गर्द निळा पक्षी मला बघून उगीचच इकडे तिकडे उडत होता का कोण जाणे पण फुलपाखरं किंवा नाकतोडे मात्र दिसले नाहीत. संबंध घळीवर काचेचे आवरण घालावे तशी घळ तापली होती.

'नदीचे पात्र शांत होते. पुलाखाली त्याची रुंदी ३० यार्ड असावी. मध्यभागी मुख्य प्रवाह होता आणि अगदी आर-पार दिसत नसले तरी पाणी स्वच्छ होते. पोहोण्याचा मोह होत होता. मी नदी काठाने असाच खाली भटकत भटकत गेलो. एका हिरवट रंगाच्या धबधब्याखाली वीस माकडांची जलक्रीडा चालली होती. मी जवळ पोहोचताच त्यांनी स्विमिंगपूल सोडला. तिथे जेमतेम छातीएवढे पाणी होते. आतापर्यंत मला मगरी दिसल्या नसल्या तरी काठावरच्या गाळात त्यांच्या निशाण्या स्पष्ट दिसल्या होत्या. म्हणून मी हाताशीच माझी बंदूक ठेवली होती. पाणी इतके मस्त गार आणि अफलातून होते की क्या बताऊँ--एखाद्या कुँवारभूमीत एकल्यानेच रहा-

ण्याचे माझे स्वप्न साकारत होते. मीं परमानंदात होतो.

एकाएकी बंदुकीच्या बाराचा आवाज उठला. सर्वदूर निनादला. माझ्यापासून केवळ २० यार्डावर गोळीने पाण्याचे कारंजे उडवले होते.

पुलावरील सैनिकांचा हा प्रताप होता. साहेब पुढे आणि ते मागे माझ्या दिशेने धावत येत होते. एका महाकाय खडकावर चढता चढता परत त्याने बार काढला आणि रागाने तो ओरडला, आयो ऽ आयो. ( मगर ऽ मगर ) बहुधा त्याने पुढच्या पोलिस ठाण्यावर माझी खबर देऊन पुढच्या सूचनांची वाट पहात असावा. वरिष्ठ अधिकाऱ्याला माझ्याबद्दल काहीच माहिती नसल्याने मला हजर करण्याचा हुकूम झाला होता. आता या आलंम दुनियेत त्याला कोणीच थोपवू शकत नव्हते. मी त्याचा, त्याच्या सोजिरांचा कचरा केला होता आणि वर जीव धोक्यात घालायला निघालो होतो. माझा खरपूस समाचार घेतल्याशिवाय मला असं मगरीच्या तोंडी जाऊ देणं, इष्ट नव्हतं.

मी कपडे चढवले आणि कैदीं बनून कुंवार मुलूखातून निघालो. साहेबाला आपली जागा सोडणें शक्य नव्हते, पण त्याने तीन पहारेकरी माझ्यावर नेमले. एक पुढे, दोन मागे. निघाली आमची वरात. रस्ता खूप निमुळता आणि चढणीचा होता. पण त्या शिपायांनी बंदुका क्षणभरही खांद्यावर विसावल्या नव्हत्या. जणू काही एखादे आक्रीत घडणार आहे असा भाव त्यांच्या चेहऱ्यांवर होता. कुठेही धडपडणार नाही याची मी काळजी घेत होतो, नाहीतर फट् म्हणता ब्रह्महत्या ! तासा दीड तासाने आम्ही एका खेडयात पोहोचलो. गवती झोपडयांच्यामध्ये एक दगडी इमारत होती. समोर झेंडा होता. नक्कीच लष्करी ठाणे असणार. वरिष्ठ अधिकारी माझी वाटच पहात होता.

मी त्याचीं परवानगी न घेता तसाच परस्पर पुढे गेल्याने तो भयंकर उचकला होता. मघाशी शिपुर्डे विचारीत होते तो पासपोर्ट म्हणजे याचेच परवानगी पत्र असावे ! मी नवखा आहे म्हणून चूक झाली वगैरे सांगून मी त्याची माफी मागितली. त्या वरिष्ठ अधिकाऱ्याला 'अम्हरिक सोडून कोणतीच भाषा येत नव्हती. मग त्याने दुभाषाला बोलावले. हा दुभाषा म्हणजे पंचक्रोशीतला एकमेव डॉक्टर होता. आणि त्याला इंग्रजी फ्रेंचची दोन-चार तोडकी–मोडकी वाक्यं येत होती इतकंच ! पण आता त्याच्या इज्जत का सवाल ' होता, म्हणून त्यानै ही कामगिरी पत्करली. नंतर समजले तो डॉक्टर नव्हताच, तर त्याने वैद्यकीय महाविद्यालयात १–२ वर्षं काढली होती. आता उमेदवारीच्या काळात आसपासच्या खेडयात हिवताप आणि हगवणीच्या गोळया वाटायची महान कामगिरी करत होता. मदतीला मात्र तो तत्पर होता. मी काय म्हणतोय याचं त्याला भाषांतर करता येत नव्हतं, पण त्याने एकंदर गोष्ट भलतीच मनावर घेतली होती मी माझे सर्व कागदपत्रं साहेबापुढे पसरली आणि माझ्या खटल्याला सुरवात झाली. प्रत्येक कागदपत्र तपासता तपासता अर्धा—

एक तास गेला.

मग दुभाषा कम् वकील प्रश्न बिचारू लागला. 'तुम्हीं कुठले राहणारे ? कुठे जायचे आहे ? तुम्हाला आई-बाप, भाऊ बहिणीं आहेत का ?' मी काय उत्तर देतो याच्याशीं त्याला अजिबात कर्तव्य नव्हते, पण सर्वांसमोर खटला चालविणे महत्त्वाचे होते.

आपलं काम त्याने चोख बजावलं, तासा दीड तासाने माझी निर्दोष सुटका झाली आणि वरिष्ठ अधिकाऱ्याने एक तोडकं मोडकं इटालियन येणारा सोजीर सोबतीला देऊन मला पुलाकडे परतण्याची परवानगी दिली. अगदी निघताना परत त्या साहेबाने दुभाषामार्फत विचारले, 'माघारी केव्हा फिरणार ?'

'माघारी ?'

'पुलाकडे –' साहेब.

'मी माघारी पुलाकडे येणार नाही. नदीच्या पात्रातूनच सुदानकडे जाणार आहे.' मी.

सुरुवातीला सगळयांना वाटलं, मी मजाच करतो आहे. डॉक्टर तर म्हणाला, 'या नदीला अंतच नाही. खालच्या बाजूला रस्ते पूल, गावं काही म्हणजे काही नाही.' नदी सुदानपर्यंत जाते याचीही त्याला खात्री नव्हती. खार्टूमला सरळ विमानाने जायचे सोडून कोणी शहाणा माणूस असा यडपटपणा करणार नाही. मग परत तो म्हणाला, 'नदीत तुला मगरी आणि लुटारूशिवाय कुणीही भेटणार नाहीं. मगरी नाहीतर ते' लुटारू नक्कींच तुझा बळी घेतील.'

अजून काही पनवती यायच्या आत मी काढता पाय घेतला !

गेला महिनाभर मी हे लुटारू आणि त्यांच्या भयंकर रीतिरिवाजाबद्दल ऐकत होतो. झाडीतल्या या लुटारू लोकांना लग्नाच्या वेळी एका विचित्र समस्येला तोंड द्यावं लागत होतं. मुलीच्या बापाला हुंडा म्हणून पैसा अडका तर द्यावा लागेच, पण आपला पुरुषार्थ सिद्ध करायला माणसांची दोन मुंडकीही नजर करावी लागत ! खालच्या ओठापासून ते लिंगापर्यंत तीन इंच रुंदीचे चामडेंही या नजराण्यात असणे महत्त्वाचे होते. मग ही कातडी उभी कापून घोड्याच्या मानेवर कॉलर म्हणून मिरावली जायची. गेली काही वर्षे मात्र असा 'तोहफा' मिळणे दुरापास्त झाले होते. कारण अशा भेटीच्या शोधात शेजारच्या टोळीवाल्यांचा आपणच नजराणा व्हायचधोका वाढला होता. किंवा अशा प्रकारांना आळा घालणाऱ्या सैनिकांच्या गोळयांना बळी पडायचा संभव वाढला होता. त्यामुळे जवान वीरांना अशा नजराण्याच्या शोधात ब्लू नाईलचा दूरवरचा हा घळीचा भाग, किंवा वयग्रे वा बोलो प्रांत धुंडाळावा लागे.

मी इथिओपियात यायच्या आधी साठ जणांच्या मोहिमेची दर्दभरी कहाणी सर्व दूर पसरली होती. थोडक्यात कहाणी अशी: दहा इटालियन आणि फ्रेंच शास्त्रज्ञ

पन्नास सैनिक आणि हमालांचा काफिला घेऊन सोमाली लॅन्डजवळील पूर्व इथिओपियाच्या वाळवंटात गेले. पुढे काय झालं काहीच कळलं नाही. स्थानिक लोकांनी त्यांच्यावर धाड टाकली असावी. त्यांच्याकडे आधुनिक शस्त्रात्रे होती, पण लुटारूंनी एकच नव्हे तर वारंरार धाडी घातल्या. इतक्या की काय झाले ते सांगायला एकही माणूस परत आला नाही. स्थानिक लोकांच्या लग्नाच्या मेजवान्या कित्येक दिवस झडत असतील पण शोधपथक जेव्हा आलं तेव्हा वाळवंटाखेरीज काहीही हाती लागलं नाही. खरं-खोटं देव जाणे. आंतरराष्ट्रीय बातमीपत्रात किंवा सरकारकडून काही समजलं नाही, पण मला वाटतं, काहीतरी नक्कीच घडलं असावं !

रस्ता अडवून वाटमारी तर इथिओपियात सर्रास होती आणि अपघाताच्या सहजतेने वृत्तपत्रे त्यांच्या बातम्या द्यायची. बसेस सोबतही दिवसा ढवळ्या सशस्त्र सैनिक असायचे किंवा खुद्द ड्रायव्हरसाहेब आपल्या प्यासिजरांच्या रक्षणार्थ एक भरलेली बंदूक राखून असत. एकदम स्टाईलमध्ये !

हे लुटारू एकेकटे नसत तर २०-२० च्या टोळ्यांनी वावरत. एखाद्या आडवळणावर झाडं-दगडं वा वायरी टाकून रस्ता बंद करायचा. काहीजण प्रत्यक्ष वाहन लुटायचे तर बाकीचे आजूबाला दबा धरून बसायचे. त्यांच्याकडे इटलीच्या अॅबिसिनीयन मोहिमेची हत्यारे अजूनही होती. लुटीनंतर ते जवळच्याच टेकड्यात लापता व्हायचे. लुटारूंच्या टोळ्या इतक्या होत्या की सतत कुठे ना कुठेतरी वाटमारी चालू असायचीच.

मी इथिओपियात असताना या लुटारूंनी दोन अमेरिकन प्रवाशांना गोळ्या घालून मारले. ते गोरे वा अमेरिकन होते, किंवा त्यांनी प्रतिकार केला म्हणून नाही तर बहुतेक गोऱ्या प्रवाशांकडे स्वसंरक्षणार्थ पिस्तुले असतात म्हणून त्यांनी ही खबरदारी घेतली होती !

एकदा तर एका ट्रक लुटणाऱ्या लुटारू टोळीची अमेरिकन शिकारी पार्टीशी अचानक गाठ पडली. अमेरिकनांनी आपल्या अत्याधुनिक स्फोटक शस्त्रास्त्रांनी चार लुटारूंचा फडशा पाडला आणि कित्येकांना जखमी केले. राजधानीत मग त्यांचा शाही सन्मान झाला. इथिओपियात लुटारूंना मारल्यावर मोठे बक्षीस मिळायचे आदिस आबाबात तर एकाने लुटारूंना मारायचा धंदा करणारी कंपनीच खोलली होती, त्यासाठी तो आणखी भागीदारांच्या शोधात होता !

हे लुटारू जर हाती लागले तर शहरात आणून त्यांना फाशी देत किंवा गोळ्या घालत. गाववाल्यांच्या हाती पडले तर मात्र त्यांची खैर नसते. कारण हे लुटारू गुरं-ढोरं-धान्य वगैरेही लुटत. साहजिकच ही महामारी तावडीत घावली की लोक त्यांना बदडून काढत किंवा दगडाने ठेचत. पूर्ण नाही तर अर्धमेला करत. मग बाजारात एका झाडाखाली त्याला नेत, एक हात व एक पाय एकमेकाला बांधून गळ्याभोवती दोराचा फास टाकून त्याला वरच्या फांदीला लटकवायचे. मग फास आवळ-

ण्यात येई. फास लागून श्वास कोंडून मरू नये म्हणून तो उरलेल्या मोकळ्या हाता-पायाने तडफडायचा, धडपडायचा. खूप थकला की त्याला थोडा दम खाऊ द्यायचा आणि पुन्हा खेळ सुरू ! ही सर्कस बघायला गावातील पोरं-टोरं, म्हातारे-कोतारे झाडून सगळे येत. आनंदाने आरोळ्या ठोकत असत, साधारणतः हे लुटारू चांगले तगडे असत. त्यांचा जीव जाईपर्यंत तास दीड तास लोकांची चांगली 'करमणूक' होत. असे.

असमाराहून आदिसआबाबाला येताना वाटेत इरिटोरियातल्या एका खेड्यात गावाच्या मधोमध एका झाडाला टांगून फाशी दिलेला एक लुटारू मी बघितला होता. गावच्या पोलिसांनी मला काय झालं त्याचं रसभरित वर्णन ऐकवलं, पण फोटो मात्र काढू दिला नाही.

अगदी कालपरवापर्यंत इथले लोक याहूनही भयंकर अशा मध्ययुगीन प्रथा पाळा-यचे. आपल्या अंगावर शहारे येतील, पण कैदी पळून जाऊ नये म्हणून त्याचा अर्धा पाय तोडून ठेवायचा, बदनामी करणाऱ्याची जीभ हासडायची, चोराचा हात तोडा-यचा एवढेच नाही तर परत चोरी करताना सापडला तर दुसराही हात तोडायचा या प्रथा सर्रास होत्या.

इथिओपियाच्या पाश्चात्त्यीकरणाबरोबरच या शिक्षांचे प्रकारही बदलले, मात्र गुन्ह्यांचे प्रमाण सतत वाढतेच आहे. ब्लू नाईलच्या घळीतील दुष्ट लुटारूंच्या वाग-णुकीतही काही फरक पडलेला नाही. ते घुसखोरांचा फडशाच पाडतात. तरीही मला या लुटारूंपेक्षा मगरी आणि धबधब्यांचीच जास्त धास्ती वाटायची.

पुलाजवळ परतल्यावर मी तराफा बांधायला सुरवात केली. या घळीत तराफ्या-साठी एकही योग्य आकाराचे झाड नाही हे मागच्या वेळीच माझ्या लक्षात आलं होतं. म्हणून मग मी येताना जवळच्याच एका वस्तीवरून निलगिरीचे वाळलेले बारा ओंडके, तेलाची ५० लिटरची दोन रिकामी पिंपे, २० लिटरची चार रिकामी डबडी वगैरे सामान आणले होते. तराफा नीट तरंगण्यासाठी, तसेच माझे सामानसुमान पाण्यापासून सुरक्षित रहावे म्हणून या सगळ्याचा उपयोग होणार होता.

दोर काचू नये म्हणून सर्व ओंडक्यांची टोके मी तासून टाकली. मग आठही ओंडके एकमेकाला घट्ट बांधून टाकले. मग काही नुकतेच कापलेले ओंडके घेऊन ते आधीच्या ओंडक्यावर आडवे बांधले. उरलेले चार ओंडके वरच्या बाजूने चारही बाजूवर लावले आणि तराफ्याला छोटासा कठडा तयार केला. मग रिकामी डबडी त्यावर छोट्या लाकडी खांबाच्या सहाय्याने बांधून दुसरा छोटा कट्टा तयार केला. शेवटी मध्यभागी खालच्या बाजूने रिकामी पिंपे बांधली. माझ्या तराफ्याची मोज-मापे अशी होती :

लांबी १७ फूट, पुढची बाजू ४ फूट रुंद, मागची बाजू ६ फूट रुंद, पाण्याखालची उंची १० ते १२ इंच मुख्य तराफा पाण्याच्या वर एक फूट.

मला वाटलं मी उत्तम कामगिरीं केली. तीं किमान चांगली कामगिरीं तरी असेल असं मी समजत होतो. कारण बापजन्मात मी कधी तराफ्यांच्या भानगडीत पडलो. नव्हतो. एखादी खूप हलकी अल्युमिनियमचीं अथवा फायबर ग्लासची बोट मिळालीं असती तर फारच बहार आली असती, पण आपली तर कडकी. तराफ्यावरच निभावून न्यायला हवे. तराफा वल्हवायचा कसा हा प्रश्न होताच. तो बांबूने वल्हवत न्यायचा असे मी ठरवले होते, पण हा तराफा इतका बोजड आणि बेढब झाला होता की तो बांबूने वल्हवत नेणं शक्यच नव्हतं. मात्र एक समाधान होतं की छोट्या मोठ्या धबधब्यात वा पाणघोड्याच्या धडकीने तो उलटणार नव्हता किंवा खडकांना आपटून त्याच्या चिरफळ्या उडणार नव्हत्या. शिवाय वेळ आलीं तर संथ पाण्यात कसातरी वल्हवताही आला असता. काहीं बदल करावे लागले तर नंतर बघू. आता लवकरात लौकर सटकायचे होते.

आता सैनिकांनाही जरा खात्री वाटू लागली असावी, कारण ते मीं काय करतोय ते उत्सुकतेने बघायला यायचे. कोंडाळं करून गुडघ्यात बंदुका घेऊन बसायचे आणि मी बघितलं की तोंड भरून हसायचे. बिचाऱ्या कोणाचाही गणवेष धड नव्हता. आणि साहेब सोडला तर बाकी सगळे अनवाणीच होते. शिवाय त्या साहेबाकडे न्यूझीलंडचे सैनिक घालतात तशी जुनी पुराणी हॅट होती. माझ्याकडे तशीच पण नवीन हॅट असल्यामुळे तो माझ्याशी दबून वागायचा, ते सैनिकही आळशीं नव्हते. पण मी माझे काम करायला सांगताच ते काहीसे अवघडले, पण लगेच मदतीला आले. कदाचित आपण या पाहुण्याच्या कामात ढवळाढवळ तर करत नाहीना याची भीती त्यांच्या मनात असावी. माझा सारा जन्मच जणू काहीं तराफे बनविण्यात गेला अशा भक्तिभावाने ते मी सांगेन ते करत. किंवा या येड्याला सांगून काय उपयोग असेही त्यांना वाटत असावे. काय असेल ते असो, माझ्या रक्षणाचीं जबाबदारी त्यांनी फारच मनावर घेतली होती.

मला ते नेमाने न्याहरीला, जेवायला बोलावायचे. कुठल्या तरी जाणाऱ्या येणाऱ्या वाहनातून पडलेल्या डबड्यात कॉफी उकळलेली असायची. सकाळी न्याहारीला दोन तीन कप कॉफी. दुपारी ११ वाजता आणि सांजवेळी इंजेरा आणि वोटचे ठराविक जेवण. इथिओपियन गावाकडे हाच आहार असावा. मी पुलाजवळ चार दिवस काढले पण या जेंवणात काही फरक पडला नाहीं.

इंजेरा म्हणजे एक प्रकारच्या तृणधान्याचा बनविलेला रोटला. त्यात खूप जीवनसत्त्वे आणि खनिजे असतात. इंजेरा साधारण दोन फूट व्यासाची सपाट आणि स्पाँजी तपकिरी रोटी असते. वरणातून तिखट मसालेदार वोट मध्ये बुडवून तो खायचा. एका मासुआ खानावळीत मी पहिल्यांदा हा प्रकार खाल्ला तेव्हा तर भट्टीत फेकल्यागत माझी हालत झाली. ओठ–जीभ–तोंड जाळत जाळत तो पोटात शिरला. आतड्यातील प्रत्येक वळण न् वळण मला जाणवले, पण मजा म्हणजे हा खाना

लौकरच माझ्या पचनी पडला, एवढेच नाही तर मला चक्क आवडू लागला.

मग जवळपासच्या गावाहून पाठविलेले इंजेरा खाण्याचा एक विधीच बनला. आणि एक दोन इंजेरा ठेवायचे त्यावर बोट किंवा मासांचे तुकडे पसरायचे. मग आणखी इंजेरा त्यावर भाजीचा लगदा, मग आणखी इंजेरा...सरतेशेवटी एका फडक्यात ही चळत गुंडाळून ती एखाद्या टोपल्यात झाकून ठेवायची. जेवायची वेळ झाली की कसलाही जामानिमा न करता मध्ये ही टोपली ठेवायची आणि प्रत्येकाने पाहिजे तेवढे इंजेऱ्याचे तुकडे मोडून खायचे !

दुसऱ्या दिवशी मी दोन कॅट फिश मारून त्या साहेबाच्या स्वाधीन केले. म्हटलं तेवढाच रुचीपालट. मला वाटलं, खास त्या साहेबाच्या देखरेखीखाली मासे पकतील. पण त्याला नीट जमलं नाही की समजलं नाही. देव जाणे. पण जेवताना माशाचे शेपूटसुद्धा नजरेस पडलं नाही. मग मी एक दिवशी कबुतर मारून त्यांच्या हवाली केली, एक दोन नाही तर चांगली आठ. खूप खाणाखुणा करून ती कशी भाजायची वगैरेही सांगितले. त्यानेही मान डोलवली. पण जेवताना परत आपले इंजिराच ! कमाल झाली. कबुतरांचे काय झाले म्हणून मी विचारले तर एका शिपुरड्याने हाताने इंजिरा विस्कटून आत बारीक शिजवून पिसून घातलेले कबुतराचे मास दाखविले. कल्पना करा, शिजलेली कबुतरे रोटल्यात ! हाय देवा ! माझ्या माशांचीही अशीच हालत झाली असणार !

मी माझ्या प्रत्यक्ष प्रयाणाची सूचना त्या सैनिकांना आधीच का दिली नाही देव जाणे, मला तयारीला अजून आठवडा तरी लागेल असे मी भासवत होतो. मात्र चौथ्या दिवशीच मी गुपचुपपणे सर्व तयारी पुरी केली. तेलाच्या रिकाम्या पिंपात माझे सगळे सामान ठेवले आणि पिंप तराफ्याला बांधून टाकले. दुपारी सैनिकांना तो तराफा पाण्यात लोटायला मदत करायला बोलावले म्हटलं, 'मला जरा चाचणी घ्यायचीच –'

तो तराफा पाण्यात लोटणं म्हणजे महा कर्मकठीण होतं. एकदाचा तो पाण्यात पडला. पण आता बुडतो की काय अशी भीती वाटायला लागली. ते निलगिरीचे ओंडके पाण्यात पूर्ण बुडाले मात्र थोड्या वेळाने ज ऽ रा वर आले. मग किनाऱ्यावर बांधलेल्या दोरखंडाच्या जोरावर तो तराफा प्रवाहाबरोबर हेलकावे खात राहिला.

मी लगबगीने जाऊन माझे सामान आणले. सोजिरांशी हस्तांदोलन केले आणि तराफ्यावर चढलो. काय होतंय हे त्या साहेबाला समजलंच नाही. मी तराफा प्रवाहाच्या मध्याला घेतला आणि धारेला लागलो. सोजीर मोठमोठ्याने ओरडत तीरावरून धावू लागले. साहेब मोठ्यांदा ओरडला. मी त्याच्यावरही 'रास हेली, रास हेली सेलेसी ! म्हणून आवाज काढला. मला दुसरं काही सुचलंच नाही.

साहेबाने हात हलविला. मीही हात हलविला, प्रवाहाचा जोर वाढत होता. मी पहिल्या धबधब्यात सापडलो. क्षणाक्षणाला सैनिक आणि माझ्यातले अंतर वाढत

होते. मला भीती वाटत होती. ते गोळ्या-बिळ्या घालतात की काय ? पण नशिबाने तसे काही झाले नाही.

(पुढे मी युरोपला परतल्यावर आदिस आबाबातल्या एका मित्राकडून समजलं कीं मी सटकलो त्याच्या दुसऱ्या दिवशीच माझा परवाना रद्द करण्यात आला होता. आणि पुलावरच्या सैनिकांना सूचना रवाना झाल्या होत्या की मला आदिस आबा-बाला परत धाडावे ! )

पण मी सुरुवात तर केली होती !

सुरुवातीला सगळं सुरळीत होतं. पाणघोड्यांनी माझा तराफा उलथवला नाही, (किंबहुना पहिल्या दोन दिवसांत मला त्यांचे दर्शनही झाले नाहीं) कीं भयानक मगरींनी माझा घास घेतला नाही. (मात्र सतत त्यांची संख्या वाढत होती.) ताशी साधारण पाच मैल वेग पडायचा. मीही रमत-गमत जात होतो. उसळते पाणी पार करायला माझा तराफा फारच फायद्याचा होता. एरवीच्या बोटी असत्या तर उसळ-णारे पाणी आत येऊन बोट बुडायचा धोका होता. मात्र तराफ्याच्या फटीतून सर्व पाणी वाहून जायचे. तराफ्याची उंची जास्त नव्हती, तरी उथळ पाण्यात तो वारंवार जमिनीत अडकायचा. मग पाण्यात उतरून धक्का मारून मला तो परत ढकलावा लागायचा. ओंडके गुळगुळीत असल्याने ढकलायला फारसा त्रास पडायचा नाही. मी पडावाची जागा निवडली. जेवणासाठी काही कॅट-फिश पकडले आणि घळीतली माझी पहिली रात्र घालवली.

नंतरच्या काही दिवसात मी ताशी ५-१० मैल आरामात जायचो. पाण्याची पातळी जास्त नव्हती त्यामुळ जागोजाग रेतीची नाहीतर दगडगोट्यांचीं छोटी मोठी बेटे तयार झाली होती. पावसाळ्यात ती पाण्याखाली जात असणार, पण आता पडावाला मस्त जागा होती. थोडे धबधबे सोडले तर नदीचा प्रवाहही संथ होता. आतापर्यंत तरी फेसाळत्या प्राण्याचा प्रताप काही अनुभवायला मिळाला नाही.

नदीचे खोरे चांगले रुंद होते आणि प्रवाह कधी या बाजूला तर कधी त्या बाजूला झोकात वहात होता. नदीला मिळणाऱ्या छोट्या-मोठ्या नद्या-नाल्यांच्या किनारी झाडा-झुडपांची दाटी होती. सुरुवातीचे तीस एक मैल खोऱ्याचा चढ सर्वसाधारणच होता. पुराच्या लोंढ्यांच्या खुणा जागोजाग दिसत होत्या. गुडेर उपनदीच्या मुखा-पर्यंतच्या चिंचोळ्या चढ्या घाटीपर्यंत हा लोंढा असाच वहात जात असावा. मगरीहीं आपल्या कीर्तीशी फटकून होत्या. थोडक्यात काय तर एखाद्या खतरनाक अनोळख्या प्रदेशातील पहिल्या-वहिल्या सफरीपेक्षा, ही राष्ट्रीय उद्यानातली हलकी-फुलकी सहल वाटत होती.

स्थानिक आदिवासीचा मागमूस नव्हता. एका संध्याकाळी खोऱ्यातून धुराचे भेंडोळ उठताना बघितले वा दुसऱ्या एका दिवशी ढोलाचे आवाज ऐकले तेवढेच-नाही म्हणायला आणखी एका ठिकाणी ओंडके आणि दगड रचून बिबट्या पकडण्या.

साठी केलेला सापळा बघितला. पण त्याचेही दगड ढासळले होते आणि लाकूड सडले होते.

आदिवासींची आमने–सामने गाठ मात्र पडली नाही. पण पंधरवड्यानंतर त्यांचे अस्तित्व जाणवू लागले. फक्त ' जाणवू ' लागले पण त्यांचे दर्शन मात्र झाले नाही. एकदा मी किनाऱ्यापासून जेमतेम तीस यार्डावर मुक्काम ठोकून होतो. रात्री हे लोक आले आणि तराफ्यावरून, पिपातून उचलून नेता येण्यासारखं जे काही होतं, ते घेऊन पसार झाले. चिखलात त्यांच्या पावलाचे ठसे उमटले होते, तेवढेच. बाकी काही नाही. माझी व्हिस्की, बियर, कपडे, औषधे, दोरखंड सर्वकाही गेलं, फक्त निम्मा दारुगोळा, फिल्मस् तेवढ्या बचावल्या.

सर्वात जास्त दुऽख झालं व्हिस्की गेल्याच. मग बियरच ! आदिवासींना त्याची काय चव ! मी घडीभर निवांत बसून विचार केला. मी नशिबवान होतो. माझं सगळं सामान–सुमान लुटलं असलं तरी मी आणि माझा तरफा तर शाबूत होता. मी पुढे जावे की नाही विचार केला, पण आता तावडतोब पुढे जाण्यावाचून गत्यंतर नव्हते. घळीतून बाहेर पडण्याचा एकुलता एक मार्ग म्हणजे घळीतून तरंगत जाणे किंवा नदी किनाऱ्याने वा बाजूचे उभे कडे चढून जाऊन उलटे फिरणे. तसे करायचे तर जेमतेम पंचवीस पौंड सामान बरोबर घेता आले असते. बाकी सर्व तसेच सोडून यावे लागले असते.

एकाएकी मला वाटायला लागलं की मी तराफा सोडून पळून जाण्याची वाट बघत लुटारू आजुबाजूला दबा धरून बसले असावेत. किंवा कुठल्याही क्षणी ते हल्ला चढवतील. मी बंदूक सज्ज केली. तंबू उचकटून काढला. तसाच तराफ्यावर घेऊन गेलो. आता केव्हाही झुडपातून हमला होणार ! मी किनाऱ्यावरच्या दगडांना दोरखंडाच्या सहाय्याने तराफा बांधला होता. तो दोर कापला आणि तराफा वल्हवत भर प्रवाहात आणला. मी काल आलो तेव्हासारखीच आताही ही जागा सुनसान वाटत होती. मात्र मी आलो तेव्हापासून माझ्यावर नजर होती ही जाणीवच भयंकर होती. सूर्यास्तापूर्वी चांगले दोन–तीन तास आधी मी पडाव ठोकला होता. मजेत शीळ घालत भटकलो होतो. निसर्गदृश्यांचे फोटो काढत होतो आणि सगळं करताना त्या नजरा माझा पाठलाग करत होत्या.

कदाचित माझ्याजवळच्या बंदुकीमुळे माझ्यावर हल्ला न करता नुसती लूटमार करण्यातच त्यांनी समाधान मानले असावे. अंधार पडता पडता मी एका बारातच एक कबूतर पाडले होते, त्याचाही परिणाम असेल. मी पुन्हा डोळे फाडफाडून झाडीकडे बघत होतो. पण काहीही संशयास्पद दिसत नव्हतं. नाही म्हणायला एका डौलदार करकोच्याने थोडा वेळ मान वळवून माझ्याकडे बघितलं. आणि तोही त्याच्या खाण्यात मग्न झाला. गेल्या रात्रीच माझ्या सफरीचा शेवट झाला असता. दैव की केवळ तकदीर ?

मला अजून खूप पल्ला गाठायचा होता. महिना–दीड महिना, दोन महिने ? सुदानच्या सरहद्दीवर पोहोचेपर्यंत काही खरं नव्हतं. सामान चढवा–उतरवा, पडाव टाका–पडाव आवरा, पशु–पक्षी मारा, सोला, शिजवा–गिळा तेच ते रहाटगाडगे. मी अशा भागातून जाणार होतो की जिथे आतापर्यंत एकाही गोऱ्या माणसाने पाय ठेवला नव्हता, आणि खरं तर पाऊन ठेवायचं कारणही नव्हतं. मात्र मला आता या आदिवासींना टाळलं पाहिजे.

रातोरात माझ्या सफरीचा रंग पालटला !

◆

## तीन

' संध्याकाळी तंबू ठोकायचा. झक्कपैकी शिकार करून आणायची. शेकोटीं पेटवायचीं, शेकोटीच्या प्रकाशात खाना पकवायचा आणि जेऊन ताणून द्यायची.' सफरीला निघताना मी अशी सुखस्वप्ने रंगवली होती. पण सुखस्वप्नांचीही ' चाकोरी ' होईल याची कल्पना नव्हती. दररोज केवळ पोट भरण्यासाठी शिकार वा मासेमारी करायला लागली तसा सगळा मझा गेला. पोटासाठी धडपड हाच पूर्ण वेळ उद्योग होऊन बसला.

□ □ □

खरं म्हणजे सुरुवातीला काळजीचं काही कारण नव्हतं. ' त्या ' रात्रीं मी तंबूमधे माझ्या जेवणाच्या खोक्यात थोडी कॉफी, दूध, डबा, मीठ–मसाला, तीन पौंड तांदूळ, गोड्या बटाट्याचा डबा, औषधे, पुस्तकं, माचिस, गळ, पन्नास, सिगरेटी अर्धी बाटली व्हिस्की आदि जिन्नस आणले होते. ते दीड-दोन महिने पुरले असते. शिवाय कॅमेरा, शॉटगन, साठ काडतुसे इत्यादी साहित्यही होतेच. दैवयोगाने काडतुसेही वेगवेगळ्या प्रकारची लहान मोठी होती. मला सापळेही लावता येत होते आणि या घळीमधे तर जनावरांना काही तोटा नव्हता. दोन महिने आणि साठ काडतुसे म्हणजे दिवसाला एक काडतूस. उपासमारीची काय बिशाद !

मी सारखा मनाला धीर देत होतो.

दुसऱ्या दिवशी अजिबात दम न खाता सूर्यास्तापर्यंत मी रेकॉर्ड १६ मैल पार

केलें. संध्याकाळीं पटकन तंबू उभारला. सुकवलेल्या मासांचे तुकडे हाणले आणि तंबूत घुसलो. दुसऱ्या दिवशीं पहाटेच चंबूगबाळे आवरलें आणि मार्गी लागलो. सुदैवाने प्रवाहात अजूनही जीवघेणे भोवरे–धबधबे काही म्हणजे काही नव्हते. आदिस आबाबाला मला किती घाबरवून सोडले होते. नाही म्हणायला दोन-तीन केवळ दोराच्या भरवशावर मला तराफा प्रवाहात सोडायला लागला. ते अंतर फार नव्हतं. मात्र धबधब्याचा आवाज ऐकू आला कीं मीं तराफा किनाऱ्याला आणुन झाडाला बांधून ठेवत असे. जागेची प्रत्यक्ष पहाणी करून मनातल्या मनात आखणी करत असे मगच तराफा पुढे नेत असे, कारण बेभरवसा पुढे जाण्यात काहीच अर्थ नव्हता. पण एवढे सगळे आन्हिक उरकून थोडे पुढे जाताच आणखी एखादा धबधबा पुढे उभा ठाकत असे ! कारण जवळचा नकाशाही फार तपशीलवार नव्हता. अशा परिस्थितीत तराफा थांबविणेही फार मुष्कील.

आता घळ आणखी–आणखी चिंचोळी बनत चालली होती आणि घळीच्या भिंतीं पार आकाशाला भिडल्या होत्या. घळीचे रंगही मजेदार होते. वरच्या १५००-१८०० फुटाला तांबडी-पिवळी माती, मग राखाडी आणि खाली काळा कुळकुळीत अजस्र बसाल्टचा खडक ! कडेला नुस्ती काटेरी झुडपं. नदीच्या वरच्या अंगाला मुक्कामासाठी मऊशार रेतीची बेटं असायची, आता तीही नव्हती. काही वेळा तर नदीच्या पात्रात आणि किनाऱ्यावरही अणकुचीदार खडक जबडा वासून असायचे आणि तराफ्याला त्यांचा चांगला प्रसाद मिळायचा.

दुसऱ्या दिवशी मी एका दगडाळ खोऱ्याच्या तोंडाशीच मुक्काम करायचे ठरवले. आदिवासींनी माझे सामान-सुमान लुटल्यापासून मी दोन दिवसात २५ मैल अंतर काटले होते. आता काही अक्रित घडणार नाही, याचा मला भरवसा होता. कारण घनदाट जंगलातून काटे–कुटे, दगड–धोंडे, कडेकपारी पार करून हे अंतर दोन-तीन दिवसांत पार करणे आदिवासींना अगदीच अशक्य नसले, तरी खूप कठीण होते. मला काय नुस्ता तराफा सोडला कीं झालं–काहींका असेना. मी भयंकर थकलो होतो आणि मला विश्रांतीची फार गरजच होतो.

या सुंदर जागेला मी ' पॅराडाईज कॅम्प ' असे नाव दिले. दुसरे दिवशी ती जागा सोडताना त्याऐवजीं त्याचे नाव बदलून ' भेसूर खिदळणाऱ्या तरसांचा कॅम्प ' असे केले.

ही जागा खरोखरच अफलातून होती. सर्वदूर खडकांच्या राशी, आसमंत भरून राहिलेला धबधब्याचा गाज. काळ्याकभिन्न खडकावरून परावर्तित होणारे सूर्यकिरण. मी तंबू ठोकला होता, त्या जागेपासून खाली नदीकिनारी चिखलात २०-२२ मगरीं आरामात पसरल्या होत्या. येताना एकच दिसली असली तरी चिखलात बऱ्याच खाणाखुणा आढळल्या होत्या. म्हणूनच मी माझा तंबू चांगला उंचवट्यावर लावला होता.

सर्व दुपार एका धबधब्याजवळ घालवुन, संध्याकाळीं हवेत गारवा आला तसा मी तंबूकडे परतलो. कॉफीबरोबर दोन-चार घास खाल्ले आणि सूर्यास्तानंतर थोडे तीर्थ-पान करून तंबूत शिरलो. दहा मिनिटं झाली असतील, माकडांचे एक टोळके उनाडत आले. या वळीत ही हिरवट माकडं पुष्कळ होती, पण त्याचं नक्की नाव मला कधीच समजलं नाही. मी त्यांनाही ' लुटारू ' च म्हणत असे. जवळच्याच झाडावर त्याची परिषद भरली. झाडाच्या खालच्या फांद्या छोटया डहाळया मोडून ते माझ्या तंबूवर टाकू लागले. मग झाडाच्या खालच्या फांदीवर उतरून त्यांनीं माझी टिंगल-टवाळी करायला सुरवात केली. त्यांच्यातला एक डेरिंगबाज तर खाली उतरला आणि तंबूच्या अगदी जवळ आला. मी तंबूच्या जाळीतून सगळी गंमत बघत होतो, तरीही गुपचूप बसलो. अचानक त्यांच्यातला आणखी एक जण पुढे आला आणि तंबूच्या दारात ठेवलली किटली त्याने लंपास केली. मी तंबूची चेन उघडून बाहेर येईपर्यंत तो झाडावर चढलासुद्धा. मग काय बाकीच्या माकडांनी आनंदाने गदारोळ केला. मी खाली वाकून दगड उचलेपर्यंत तो हरामखोर नचल्या अदृश्य झाला होता. पुढच्या काही वेळ शिव्या घालत, मी माकडांचा सैरभैर पाठलाग करीत होतो; पण अंधार दाटल्यावर झक मारत माघार घ्यावी लागली. दुःख किटली गेल्याचे नव्हते, पण भडव्यांनीं माझ्या डोळयादेखत डाका घालावा ?

मी बदला घेण्याचा निश्चय केला. पण आता तरी इज्जत का फालुदा मान्य करण्याशिवाय गत्यंतर नव्हते.

मी झोपण्याच्या पिशवीत जेमतेम घुसलो असेन, तेवढयात जवळून बिबटयाचा आवाज आला. मी बंदूक उचलली आणि घोडा खेचून ठेवला. काही वेळानंतर तंबूच्या उजव्या आणि मागच्या बाजूच्या झुडपात काहीतरी खसफस झाली. एखादा म्हातारा बिबटया खाकत-खोकत असल्याचा आवाज आला. एका हातात बंदूक घेऊन दुसऱ्या हाताने तंबूतले एक रिकामे डबडे बडवायला सुरुवात केली. कसलातरी चित्कार उठला आणि आणि आजूबाजूच्या झाडात परत खसफस झाली. बिबटयाचा चित्कार मी कधीच ऐकला नव्हता, म्हणून मग तंबूतून हळूच बाहेर डोकावून बघितलं तर माकडं दाही दिशांना पळाली.

मी परत एकवार झोपायचा प्रयत्न केला. दिवसभर किडयांची किरकिर चालली होतीच. आता त्यात रातकिडयांनी आपला तार–स्वर लावला. जोडीला बेडकांचा खर्ज होताच. तरीही परत डोळा लागणार इतक्यात बिबटयाची डरकाळी आली. या खेपेला हुक्कर निघाले. दूर नदीत पाणघोडयांना उत आला. नेमक्या माझ्या तंबू-मागच्या झाडावरून एका पक्ष्याने आर्त स्वरात दुसऱ्याची आळवणी सुरू केली. मग कसलातरी गुरगुरण्याचा आवाज आला आणि झाडा-झुडपात धसफस होऊन तंबूवर धपकन काहीतरीं पडले.

तेवढयात जवळूनच कुठूनतरी यडपट हसण्याचा आवाज आला. हसणं कसलं

भेसूर खिकाळणच होते ते ! अंगावर सरकन काटा आला.

मग सन्नाटा, परत एकवार भेसूर, विकट हास्य. माझी घाबरगुंडी उडाली. तो जवळून-लांबून नेमका किती अंतरावरून येतोय समजेना. काही वेळाने दुरून मोठ्यांदा गळा काढल्यासारखी आरोळी आली. अगदी तीक्ष्ण. तिसऱ्या-चौथ्या वेळी तर त्याचे पडसाद घुमले. आता पक्षी-बेडूक-रातकिड्यांचा आवाजही दबला होता. ते तरस असावेत ? हो नक्की तरसच.

मी ताडलं की सहा ते सात तरस असावेत आणि वेगवेगळ्या ठिकाणांहून एका मागोमाग ते कागाळ्या करत असावेत. प्रत्येकाचा सूर वेगळा, बाज वेगळा. ते कधीही एकदम ओरडायचे नाहीत तर थांबून-थांबून प्रतिसाद द्यायचे. हे मध्यंतर कमी जास्त असायचे, पण प्रतिसाद कोणी द्यायचा हे मात्र अगदी ठरवलेले असायचे. सिंहाच्या गर्जनेने टेबलावरची भांडी पण थरथरतात; पण या तरसांच्या खिकाळण्याने माणूस वेडापिसा होतो. काही वेळाने बेडकं गप्पगार झाली आणि एका अनामिक भीतीने मला घेरून टाकलं.

एवढे तरस एकदम ओरडताना मी कधी ऐकले नव्हते. मला वाटू लागलं आता ते मला घेरून टाकताहेत. ‘ छे, छे, तरस असं काही करत नाहीत.’ मी मनाची समजूत काढत होतो. एवढ्यात तंबूच्या अगदी जवळच पागल माणसाच्या खोकल्याची उबळ यावी तसा आवाज आला. मी कान झाकून घेण्याचा प्रयत्न केला. पण माझ्या तोंडाला कोरड पडली. सर्वांगातून शिरशिरी गेली. मी धास्तावून बंदुकीची फैर झाडणार इतक्यात माझ्या मनात विचार आला, की हे तरस नसावेत, तर आदिवासीच असावेत, माझा शोध घेत असतील, तंबू शोधत असतील.

मला बाहेर हुसकायचा प्रयत्न करत असतील. पण लगेच मी ही कल्पना मनातून काढून टाकली. मघाच्या आरोळ्या, खिकाळणे कोणत्याही मनुष्यप्राण्याचे असणे शक्यच नव्हते. दोन तास ते भयानक आवाज ऐकत मी पडून राहिलो आणि मग पिसाटल्यासारखा बाहेर येऊन माझ्या दुनळी बंदुकीतून अंधारात गोळ्या झाडल्या. दुनियेतल्या यच्चयावत शिव्या घालत, समोर येतील ती झुडपे बंदुकीने झोडत सुटलो. शेवटी प्रचंड थकल्याने मी आडवा झालो. तेव्हा तरसांचा आवाज थांबला होता, पण आता पक्ष्यांनी गदारोळ माजवला होता. एकच कोलाहल. नदीत पाणघोड्यांची तारांबळ उडाली होती. दूर कपारीतून कुठल्यातरी प्राण्यानेही तक्रारीचा सूर लावला होता. नक्की बिबट्याच असावा तो. आता कुठे मला जरा भान आले आणि शरमून निराशेने मी तंबूत सटकलो.

सकाळी परत माझी झोपमोड करायला माकडं आलीच. मी बंदूक घेऊनच बाहेर पडलो. काही झालं तरी किटली मिळवायचीच ! मी हळूहळू चाल केली. तेही हळू-हळू मागे सटकले. मी जोरात की ते जोरात. मी हळू की तेही हळू. जवळ जवळ तासभर हा उभा खोखो चालला होता. पण त्यांच्यापैकी कुणाकडे किटली आहे की

नाहीं समजत नव्हतं. माझ्या संतापाचे खुन्नसमध्ये रुपांतर झाले. साले, खोडी काढत नाहीत की संशयाने पहात नाहीत. नुसतेच उल्लू बनवतात. बंदुकीची गोळीही कधी त्यांनी चाखली नसेल. एक मात्र त्यांना नक्की जाणवलंय, की मी अगदी सुस्त, धीमा आहे. आणि त्याचा ते फायदा उठवताहेत. थांबा, आता त्यांनाच चुत्या बनवायला हवं ! झाडावरून त्यांना मोकळ्या मैदानात आणता आलं तर...

मी एक पातेलं घासून पुसून लखलखीत केलं आणि तंबूजवळच्या मोकळ्या जागेत एका झाडाला बांधून ठेवलं. मग मुद्दामच मोठा आवाज करत मी तंबूपासून लांब वरच्या अंगाला गेलो. माझी खात्री होती, ते तीस दुणे साठ डोळे माझ्यावर नजर ठेवून असणार. मी आणखी लांब गेलो आणि तंबूच्या दृष्टीक्षेपातून दूर झाल्याची खात्री पटल्यावर झपकन माघारी फिरलो. दबकत दबकत मी तंबूकडे सरकत होतो. साधारणतः १५० यार्डांवर मला माकडांचा आवाज ऐकू यायला लागला. आता तर मी सरपटत पुढे जायला लागलो. आणखी जवळ जाऊन हळूच झुडपात बघितलं तर पातेलं उलथलं होतं, पण माकडांचा पत्ता नव्हता. मी तसाच मुकाट मागे वळलो आणि जवळपासच्या झाडोऱ्यात माकड दिसतात का ते बघू लागलो. पण रातकिड्यांच्या तारस्वराशिवाय कसलाच आवाज नाही. पण कोणीतरी माझ्यावर लक्ष ठेवून आहे ही विचित्र जाणीव होत होती. गर्रकन वळून बघतो, तो काय ती माकड कुतुहलाने माझ्याकडेच बघत होती. ती मारे दबकत दबकत झोपत, सरपटत हुशारी दाखवत होतो आणि हे पठ्ठे गुपचुपणे माझ्या मागे येऊन 'माणूस–चेष्टा' बघत होते !

अर्ध्या तासाने मीं परत अवसान आणले. चेहऱ्यावर प्रचंड बेपर्वाई दाखवत मी माकडांच्या दिशेने गेलो. त्यांना माझा संशयबिशंय आला नाही. पण ती अंतर राखून होती. माझ्या प्रत्येक युक्तीवर ती काहीतरी आयडियेची कल्पना लढवायचीच. माझी किटली मिळाली नाही ते नाहीच, शेवटी दिला नाद सोडून.

पुढे माझा दारूगोळा संपत आल्यावर ही माकडेंच माझं मुख्य भक्ष्य बनली. त्यांचं मास तसं निबर असतं, पण भलं मोठं यकृत, लाजवाब ! आजही हंसाच्या यकृताच्या बदल्यात मी हे यकृत आनंदाने घेईन !

हळहळू मी शिकारीचं यशस्वी तंत्र बनवलं. माकडांचं टोळकं दिसलं की मी बिनधास्त त्यांच्या दिशेने जायचो. उगाच लपून–छपून जाण्यात अर्थ नसे. कारण त्यांनी बघितलेलं असायचं. तरी मी जवळ गेलो की माकड अदृश्य व्हायची. इतकी की जागेवर एकही माकड उरायचं नाही. की ती कुठल्या दिशेला गेलीत हेही समजायचं नाही. पण ती प्रत्यक्षात गेलेली नसायची. मी जायची वाट पहात झुडपात लपलेली असायची. ती प्रथम दिसली त्या जागेवर जाऊन मी जमिनीवरच उगाच काहीतरी खरवडायचो आणि १०–१५ यार्ड मागे जायचो. मग झटक्यात वळून मागे बघायचो. अजूनही ती दडून असली तरी त्यांच्यातील काही उत्साही भिडूंचं कुतूहल

अनावर झाले असणार याची मला खात्री असायची. मीं असा गरकन वळलो की त्यांची खात्री पटायची मी त्यांना नक्कीच हेरले असणार. मग काय पळून आणण्या-साठी त्यांची एकच तारांबळ उडायची. पुढे काम सोपे होते. ५ नंबरच्या काडतुसाने अनेकदा मी एका वेळी २–४ माकडे टिपली आहेत.

अजून एक खाद्य सापडले, मगरीचे मास ! फक्त एकदाच मीं मगरीचे यकृत खाल्यावर आजारी पडलो होतो. माझी सफर सुरू झाल्यावर आठवड्याभरानंतरची गोष्ट. माझा तराफा मीं उथळ पाण्यात खेचून आणत होतो तर ही मगरबाई कसली तर स्वप्नं बघत पसरली होती. माझ्या बंदुकीचे सहा छर्रे डोक्यात घुसले आणि नक्की कुठल्या दिशेला पळावे हे ठरवायच्या आतच ती उलथली. लगेच मी तिला ओढून काठावर आणली आणि साफ करून कातडी सोलायला सुरुवात केली. आचके थांबण्याची वाट बघत बसण्यापेक्षा आताच हे काम सोपे जाईल म्हणून मी मगरीचे पोट चिरायला सुरुवात केली. नाकपुडीपासून ते शेपटीच्या टोकापर्यंत अगदी चारही पाय नखांसकट मला संपूर्ण कातडे हवे होते. म्युनिकच्या सेनकेनबर्ग विद्यापीठात मीं ही कारागिरी शिकलो होतो. खालच्या जबड्यापासून शेपटीपर्यंत मला सरळ छेद घ्यायचा होता. पण सुमारे दोन फूट कापल्यावर दरवेळी मला माझ्या चाकूला धार करावी लागायची. मधून मधून ती मगर आचकेही द्यायची. अर्धा भाग चिरल्यावर तर तिने अचानक जबड्याला हिसका दिला, शेवटी मला तो जबडा दोराने आवळून बांधावा लागला. पोट–आतडी फाडल्यावर तर त्या धूडाने चक्क हवेत उछल खाल्ली आणि मला शेपटाचा फटकारा बसला. पोटात मला दोन अर्धवट पचलेले मासे आणि हरणाचा खूर मिळाला. ती मगर पालथी पडून विस्फारलेल्या डोळ्यांनी जणू काही माझ्यांकडे तिरस्काराने बघत होती. मी तिचे हृदय कापून हातात धरले. अजूनही त्याची धडधड थांबली नव्हती. रक्त ठिबकत होते. मी आळीपाळीने हृदय व डोळ्यांकडे बघत होतो. का कोण जाणे, पण ते अजून थिजले नव्हते, उलट डोळ्यां-तील तिरस्कार वाढत होता. मी टरकलो. गरीब बिचाऱ्या देवभोळ्या मगरीचा मी जीव घ्यावा !

पण ती मगर प्राण सोडण्याचे लक्षण दिसेना. झटका देऊन ती परत पोटावर वळायची. शेवटी मी ते दळिंदर हृदय टिच्चून तिच्या नाकावर ठेवलं आणि जरा दूर जाऊन बघत बसलो. कदाचित मला भास झाला असावा. पण सारखं वाटायचं, ती मगर गरगरत्या नजरेने नाकाडावर ठेवलेले आपलेच हृदय बघतेय. छे ! किळस आली. मी दूर सटकलो. तासाभराने मी तंबू ठोकला आणि तराफ्यावरचे सामान आणू लागलो तरी ते धूड धडधडतच होते. डोळ्याच्या पापण्या हळूहळू उघडझाप करत होत्या. मी पुन्हा नेटाने कातडं सोलायला सुरुवात केली. तर तिच्या डोळ्यांची फडफड झाली, शेपटी थरथरली आणि पंजे हवेत ओरखाडे काढू लागले. ढुंगणापासून शेपटीपर्यंत छेद घेतला तर ती परत उलथी झाली. आपली कातडी बचावण्यासाठी

तिने शरीराचा कण न् कण पणाला लावला होता आणि त्यात तीं यशस्वीही झाली होती.

अंधार पडायला लागला, तसं कातडयाचं काम मीं तसंच अर्धवट टाकलं आणि जेवणासाठी मगरीचे ताजे यकृत घेऊन आलो. खरं मला भूक नव्हती, पण यकृताचीं चव चाखायची होतीं. मगरीच्या शेपटाकडचं मांस मी पूर्वी खाल्लं होतं. (आणि नंतरहीं खाल्लं) ते मस्त कोवळ चवदार होतं. मग यकृत खाल्लं आणि मळमळायलाच लागलं. पोटात कळा सुरू झाल्या आणि भडभडून ओकारी झाली. माझ्याकडे होत नव्हतं तेवढं एरंडेल तेल मीं ढोसलं आणि सुदैवाने दुसऱ्या दिवशी सगळं ठीकठाक झालं.

तुमचा गैरसमज होऊ नये म्हणून मी इमानदारींत सांगतो, की पुस्तकात नाहींतर सिनेमात रंगवतात तसा मीं शूर आफ्रिकन शिकारी नाही. गोऱ्या शिकाऱ्यांचे अद्भुत गुणही माझ्याकडे नाहीत. एका बारात काडेपेटीची एक काडी मला उडवता यायची नाही. इतकेच काय टेलिस्कोप नसेल तर चांगल्या बंदुकीनेही अगदीं काळजीं घेऊनसुद्धा मला १०० यार्डापलिकडचे जनावर टिपता यायचे नाहीं. गवताच्या दुमडलेल्या पात्यावरून हरीण गेले की चितळ, हे मला सांगता यायचे नाही, की नुसत्या लेंडकावरून जनावर ओळखता यायचे नाही. शिवाय त्या शूरवीर शिकाऱ्यासारखा गंमत म्हणून गेंडयाला शेपटाने धरून ओढणारा कीं अकाळ-विकाळ आदिवासींशीं दोन हात करणारा मी नाहीं. वस्तुत: सर्वस्वीं शिकारीवरच अवलंबून राहून जंगलात एकटयाने राहण्याचा हा माझा पहिलाच अनुभव होता- पश्चिम आफ्रिका आणि उत्तर स्कॅंडीनेव्हियामध्ये मी काही शिकारी केल्या होत्या. पण तेव्हा माझे दोस्त साथीला होते. आता मात्र जगण्यासाठी मला एकटयाने शिकार करणं भाग होतं.

मी निव्वळ शिकार आणि मासेमारीवर जगलो. सुरुवातीच्या दिवसांत तर माझ्याकडं भरपूर दारूगोळा होता आणि जंगलात चिल्लर पशु-पक्षी, मनपसंद असेल ते टिपायचे.

अनेकदा वॉटर-बकस् अनायासे गवसायचे. मात्र एकदा त्यांचे मांस चाखल्यावर मी त्यांच्या भानगडीत पडलो नाहीं. हे प्रचंड पक्षीं मारायला सोपे असले तरी त्यांचे मास अगदी निबर, गुळमट असायचे. कातडीही खरूज आणि पिसवांनी वखवखलेली असायचीं.

डुक्करपण खायला बेकार. पिलू सोडून. कदाचित माझ्या पकवण्याचा तो परिणाम असेल. ताजे मास आणि चरबीं चांगली लागायची. काही वेळा तर एका जेवणात मी दहा पौंड मांस फस्त करायचो. यकृत आणि कलेजा मस्त तळायचा आणि मासाचे तुकडे शेकोटीवर भाजायचे. पुठ्ठयाच्या मांसाच्या चकत्या करायच्या आणि उन्हात वाळवायच्या. पण हरीणाच्या पुठ्ठयाच्या मांसाशी याची तुलना नाही. कारण अनेक दिवस उन्हात ठेवूनही डुकराचे मांस नुसते सुकायचे पण कडकडीत वाळायचे नाही.

खायला सगळ्यात वेस गोष्ट सापडली म्हणजे एक प्रकारच्या रानकोंबड्या (Spur Fowls) .त्यांच्यासारखे मठ्ठ पक्षी दुनियेत सापडणार नाहीत. लहान-मोठे तांबड्या नाहीतर पिवळ्या मानेचे (त्यांच्या सुमारे २० जाती आहेत.) हे पक्षी धरायला अगदी सोपे आणि खायला फार रुचकर. कोंबडीच्या आकाराचे हे पक्षी अक्षरशः खुराड्यात जाऊन कोंबडी पकडावी तसे पकडता यायचे. ध्रुव प्रदेशातील कोंबड्याही मठ्ठपणात त्यांच्यापुढे मान खाली घालतील, शॉटगनने त्यांना मारण्यात काही गंमत नाही, पण तेवढाच दारूगोळा वाचायचा. लपाय–छपायचे काम नाही. त्या डझनवारी फिरत असतात. आपण गेलो की त्या तुरू तुरू एक कतारसे दूर जायला लागतात. मुंडक्यांच्या रोखाने एक बार टाकायचा. दुसऱ्याने उरली सुरली साफ करायची.

मोठं जनावर मी मुख्यतः किनाऱ्याजवळ मारायचो. म्हणणे मग जवळच मुक्काम ठोकता यायचा. एकदा मी एक इंपाला हरीण दूर दरीत मारलं. उत्साहाच्या भरात ते ओझं उचलून आणणार कसं याचा विचारच केला नाही. मीं ते उचलून नाहीतर खेचून आणायचा निष्फळ प्रयत्न केला. शेवटी चांगले चांगले भाग कापून आणावे लागले. उरलेले भाग आणायला परत गेलो तर घारी–ससाण्यांनीं त्याचा फडशा पाडला होता.

जसजसा मी नदीच्या खालच्या अंगाला लागलो, तसे पशु–पक्षी कमी होऊ लागले. माझा दारूगोळाही संपत आला. जेवणात जास्तीत जास्त बदल करायचा मी प्रयत्न करत होतो. माकडं नुसती भाजून खा, कॅटफिश आधी राखेत भाजायचे आणि मग अर्ध्या तासाने सोलून खायचे, मोठ्या जनावरांच्या डोक्याचे आणि हड्डयांचे पहिल्यांदा सूप बनवायचे आणि मग यकृत तळायचे. एक ना दोन. नाना प्रकार !

खाऊन खाऊन पोटाला तडस लागायची पण तरीही फळभाजी, मिठाईसाठी पोट भुकेलेच रहायचे. माझा असमतोल आहार मसाल्याविना आणखीनच बेचव झाला होता. मी सर्व मसाला तराफ्यावरच्या रिकाम्या पिंपात ठेवला होता आणि एका फटक्यात तो लुटला गेला होता. मिरचीच्या भुकटीचा आणि मिठाचा एकेक डबा काय तो वाचले आणि मोठ्या मुश्किलीने मी ते तीन आठवडे पुरवले. नंतर बोंबभरोस भर म्हणून माझ्या निष्काळजीपणाने माचीसचे आख्खे बंडल पाण्यात पडले आणि भिजले. मी सहा आठवड्यातच 'सुसंस्कृत' जगात पोहोचेन असा मला फाजील भरवसा होता ! वेळ पडली तर असावं म्हणुन आणलेलं भिंग सफरीच्या सुरुवातीलाच कुठंतरी गहाळ झालं. परिणामी आता माझ्याकडे एक अखंड माचीस आणि त्यातल्या ५६ काड्या उरल्या होत्या. मग त्यातली अर्धी माचीस आणि दहा काड्या प्लॅस्टिकच्या कागदात गुंडाळून रबराच्या बॅगेत 'रिझर्व्ह' म्हणून ठेवल्या, बाकीच्या काड्यांच्या चार-पाच जुड्या करून उरलेल्या अर्ध्या माचीस बरोबर पत्र्याच्या डब्यात ठेवल्या. काय ही हुशारी !

परिणाम म्हणजे विस्तव पेटवायला दर दिवशीं एकच काडी वापरायला लागणार होती. माझं 'अग्निदिव्य' सुरू झाले पण विस्तव पेटायचा नाही असं व्हायचं नाही आणि एकदा तो पेटला की मी दुसरी काडी वाया घालवायचो नाही.

शेकोटीच्या नाचऱ्या जाळाकडं बघत मी तासन् तास घालवायचो. कधी शेकोटीं डोसून मंद करायचो तर कधी निखारे फुंकून चेतवायचो. शोधून शोधून चांगले वाळके लाकूड आणून तिला चांगली फुलवायचो. अशा अनवट रानात तुम्ही एकटे असताना शेकोटीच तुमचे घर-दार-सखी सोबती असते. दिवसभर तुम्हीं शेकोटींचीं वाट पहाता आणि संध्याकाळी तिच्या कुशींत गेलं की घरी आल्यासारखं वाटतं. शेकोटीजवळ विसावून तुम्ही दूर अंधारात, भूतकाळात बघितलंत की मागचे दिवस-भराचे सर्व श्रम विसरायला होतात. तर्कापेक्षा भावना बोलू लागते.

अग्नी एखाद्या सुनसान मंदिरासारखा असतो. नाहीतर आरक्त सूर्यबिंबाकडे हाकारलेल्या नौकेसारखा. जाळाकडं बघताना मला नदीचा खळखळाट, पानांचीं सळसळ, दूरवरून येणारा घुत्कार, जनावरांची हालचाल-मनाला काही म्हणता काहीं स्पर्शत नव्हतं. जगाच्या अगदीं एकाकी कोपऱ्यात, अगदी एकटा रहाण्याचं धुंद स्वप्न मी जगत होतो. काही वेळा वाटायचं की मी हे दिवास्वप्न बघतोय की काय – एकाएकी वाटायचं मी ब्ल्यू नाईलवर नाही तर माझ्या ऑफिसच्या टेबलावर वा विद्यापीठात आहे. एकीकडे मी या सगळ्या वातावरणाशी, निसर्गाशी किती सहज एकरूप झालो याचा आनंद व्हायचा तर ! हे सगळं किती लवकर घडलं या विचाराने अवघडलेपण यायला लागलं.

उन्हात झोपा काढणाऱ्या मगरी, झाडीत उच्छाद मांडणारी माकडं, रात्री-बेरात्री यणारे कसले कसले विचित्र आवाज हे इतके झटपट अंगवळणी पडलं कीं माझाच विश्वास बसत नव्हता. खरंच मी या निळ्या नाईलच्या घळीत काय करतोय ?

मी भीतीचीच परीक्षा घेतो आहे का ? की मी आपण किती शारीरिक व मान-सिक ताण सहन करू शकतो हे अजमावून बघतो आहे ? सहनशक्ती तपासून पाहतोय की आंधळेपणाने दैवाशी झुंज घेतोय ? की माझ्याच मनातल्या द्वंद्वाशीं झुंजायला या एकाकी वातावरणाला सामोरा जातोय – की हा चंद्राचा कवडसा पकडण्याचा खटाटोप ? मी आहे तरी कोण आणि हे आयुष्य म्हणजे तरी काय ? माझं मला तरीं नीट समजतय का – नाही, पूर्ण तर नक्कीच नाही.

मला समाजात राहणं नामंजूर होतं म्हणून मी नाईलवर निघून आलो का ? सुसंस्कृत जगाचे नीति-नियम मला मंजूर नव्हते. कदाचित – पण हेही मुख्य कारण नव्हतं. प्रत्येकाने आपला हेतू, हेतूमागचा कार्यकारणभाव, घडणारी कृती स्वतः प्रथम समजून घेतले पाहिजे. प्रत्येकालाच आपल्या जीवनापेक्षा दुसऱ्या एखाद्या आदर्श जीवनाचे स्वप्न मोहवत असते. मग ही सगळी स्वप्ने कुठे उडून जातात ? आपण त्यांच्याबरोबर का जात नाही ? मनात एखादी गोष्ट करताना विशिष्ट भावना

असते. मला अशा लोकांबद्दल नेहमीच आदर वाटतो. कदाचित् हे प्रचंड निर्धाराचे आणि समतोल बुद्धीचे लक्षण असेल. पण अनेकांच्या मनात आता मी जे करतोय तसेच एखादे स्वप्न तरळत असते. आयुष्यात कधीतरी स्वच्छंद–निबंध जगावं असं प्रत्येकालाच वाटत असतं. तुमच्या जवानीचा, मोठे होण्याचा वा बुढाप्याला लाग-ण्याचा भाग असतो तो. मी मात्र माझं स्वप्न जगत होतो–

माझं स्वप्न प्रत्यक्ष जगत होतो !

## चार

मोठ्या मगरीने एकदा का तुम्हाला कुठेही धरलं, की तुम्ही मेलात म्हणूनच समजा. पृथ्वीतलावरील इतर कोणत्याही प्राण्यापेक्षा मगरी सर्वात जास्त माणसं मारतात !

मी आतापर्यंत पाहिलेले सगळ्यात भयंकर छायाचित्र म्हणजे अंड्यातून अर्धवट बाहेर पडलेल्या मगरीच्या पिल्लाचं ! त्याचा अर्धा भाग अंड्यातच होता. पण त्याही अवस्थेत नाकासमोर धरलेल्या बोटाचा फडशा पाडण्याची त्याची धडपड चालली होती.

□ □ □

नाईलमध्ये मगर महाभयंकर संकट जरी नसली तरी, महामगजमारी नक्कीच होती.

एवढ्या दूरच्या प्रदेशात आदिवासी मगरींची शिकार करत नसत. (आणि लेक तानापासून पुलापर्यंत आणि तिथून पुढे सुदानपर्यंत या घळीसारखा अनवट प्रदेश दुसरा कोणताच नसेल) कारण पुढची मनुष्यवस्ती खूपच दूर होती. आणि मगरीची अवजड कातडी वाहून नेणं फारच कठीण होतं. व्यापारीदृष्ट्या पुलाजवळच मगरी मारणं सोयीचं होतं, पण पुलावरचे सैनिक मगरींना चार हात दूरच ठेवीत असत.

गेल्या शंभर दोनशे वर्षांत अनेक लढायांतून तावून सुलाखून निघालेल्या मगरीचे जिथे अनेक जनावरे पाणी पिण्यासाठी येत तिथे स्वतःचे असे साम्राज्य असे. या दोन–तीनशे वर्षं जगणाऱ्या प्राण्यांची लांबी चांगली तीस फूट होते, असं म्हणतात.

मीं मात्र आतापर्यंत जास्तीत जास्त वीस फुटी मगर बघितली आहे. तरी मला खात्रीं आहे, निळ्या नाईलमधल्या मगरीच जगात सगळ्यात लांब असाव्यात. अपवाद फक्त दक्षिण–पूर्व आशियातल्या समुद्री मगरींचा !

कितीही प्रयत्न केला तरी मगरींची एक सवय मात्र माझ्या कधीही अंगवळणीं पडली नाही. त्यांच्या साम्राज्यातून जाताना एखाद्या पाणवुडीसारखा त्या माझ्या तराफ्याचा पाठलाग करायचा. शेपटीमुळे उठणारे तरंग आणि पुढे डोकावणारे नाकाड. बाकी काही दिसायचंच नाही. काही वेळा पाण्यातून मुडकं वर यायचं आणि ते हिरवे काचेरी डोळे आरपार वेध घ्यायचे. मग हळूच मुंडकं अदृश्य व्हायचं आणि जणू काही घडलंच नाही. असं पाणी संथ वहात रहायचं. हे सगळं प्रत्यक्ष दिसण्यापेक्षा जाणवत रहाणं म्हणजे महाभयानक अनुभव होता. आणि अनेकदा दिवसातून दहा–वीस वेळा नाही तर पन्नास वेळा तरी असं व्हायचं.

मगरीचा हल्ला अगदी प्रत्यक्ष हल्ला मी सुरुवात केल्यापासून चौथ्या दिवशी झाला. मी मासेमारीला निघालो होतो. नदीपासून सुमारे दहा फूट उंचीवर एका भरदार झाडाखाली मी तंबू ठोकला होता. पतझडीमुळे झाडाची पानं गळून पडलीं असली तरी फांद्याचीच दाटी एवढी होती की त्यांची बऱ्यापैकी सावली पडत होती. एका जागी एक निमुळतं पण खोल डबकं होतं आणि तिथून पाणी बाहेर पडायला एकच जागा होती. दगड–वाळूच्या पट्ट्यामुळे नदीचं पात्र दुभंगल्यासारखं वाटत होतं. मासेमारीला ही उत्तम जागा होती. मी गळाचा दोरा घेतला आणि फाद्यांच्या बेचक्यावरून हुक पाण्यात टाकून, दुसरं टोक झाडाच्या बुंध्याला बांधून ठेवले. फांद्यांमुळे दोराला जास्त ताण बसला नसता शिवाय हालचालींवरून मासा गळाला लागला की नाहीं हे मला दुरूनहीं समजलं असतं. मी पकडलेले बेडूक हुकाला अडकवले आणि वाट पहात बसलो.

दुसरा गळ पाण्यात जेमतेम बुडाला असेल एवढ्यात पहिल्या गळाला झटका बसला. मासा जसजसा खेचला जाईल तसा मी हळुहळू थांबून थांबून दोरी ओढू लागलो. माझा अंदाज होता. साधारण मध्यम आकाराचा मासा असेल, पण एकाएकी त्याला जोर चढला आणि एका झटक्यातच त्याने हूक–दोरी तोडून टाकली. मी पहिल्या गळाची दोरी लपेटतो आहे, तो दुसरा गळही सर्रकन् गेला. दुसऱ्या वेळीही तीच गत. गळ गिळल्यानंतर मासा जिवाच्या कराराने १०–१५ यार्ड गेला. मग दोन–पाच मिनिट थकवा–नक्कीच कॅटफिशची लक्षणे ! मी हळूहळू त्याला जवळ खेचत आणला. एवढ्यात जाणवलं की मासा तळात कशात तरी अडकला असावा त्याने अचानक धडपड चालू केली. एक झटका बसला आणि हुक–दोरी परत हलकी–हलकी ! मी गळ वर ओढून बघितला तर हुक एकदम सरळ झाला कोणता मासा मला चुत्या बनवतो आहे. म्हणून खुन्नसमध्ये मी नवीन बळकट हूक दोर वगैरे घेऊन आलो. परत तशीच कॅटफिश सारखीच झुंज. पण कॅटफिश सुरुवा-

मी मात्र आतापर्यंत जास्तीत जास्त वीस फुटी मगर बघितली आहे. तरी मला खात्री आहे, निळ्या नाईलमधल्या मगरीच जगात सगळ्यात लांब असाव्यात. अपवाद फक्त दक्षिण–पूर्व आशियातल्या समुद्री मगरींचा !

कितीही प्रयत्न केला तरी मगरींची एक सवय मात्र माझ्या कधीही अंगवळणीं पडली नाही. त्यांच्या साम्राज्यातून जाताना एखाद्या पाणबुडीसारखा त्या माझ्या तराफ्याचा पाठलाग करायचा. शेपटीमुळे उठणारे तरंग आणि पुढे डोकावणारे नाकाड. बाकी काही दिसायचंच नाही. काही वेळा पाण्यातून मुडकं वर यायचं आणि ते हिरवे काचेरी डोळे आरपार वेध घ्यायचे. मग हळूच मुंडकं अदृश्य व्हायचं आणि जणू काही घडलंच नाही. असं पाणी संथ वहात रहायचं. हे सगळं प्रत्यक्ष दिसण्यापेक्षा जाणवत रहाणं म्हणजे महाभयानक अनुभव होता. आणि अनेकदा दिवसातून दहा–वीस वेळा नाही तर पन्नास वेळा तरी असं व्हायचं.

मगरीचा हल्ला अगदी प्रत्यक्ष हल्ला मी सुरुवात केल्यापासून चौथ्या दिवशी झाला. मी मासेमारीला निघालो होतो. नदीपासून सुमारे दहा फूट उंचीवर एका भरदार झाडाखाली मी तंबू ठोकला होता. पतझडीमुळे झाडाची पानं गळून पडली असली तरी फांद्याचीच दाटी एवढी होती की त्यांची बऱ्यापैकी सावली पडत होती. एका जागी एक निमुळतं पण खोल डबकं होतं आणि तिथून पाणी बाहेर पडायला एकच जागा होती. दगड–वाळूच्या पट्टयामुळे नदीचं पात्र दुभंगल्यासारखं वाटत होतं. मासेमारीला ही उत्तम जागा होती. मी गळाचा दोरा घेतला आणि फांद्यांच्या बेचक्यावरून हुक पाण्यात टाकून, दुसरं टोक झाडाच्या बुंध्याला बांधून ठेवले. फांद्यांमुळे दोराला जास्त ताण बसला नसता शिवाय हालचालींवरून मासा गळाला लागला की नाही हे मला दुरूनहीं समजलं असतं. मी पकडलेले बेडूक हुकाला अडकवले आणि वाट पहात बसलो.

दुसरा गळ पाण्यात जेमतेम बुडाला असेल एवढयात पहिल्या गळाला झटका बसला. मासा जसजसा खेचला जाईल तसा मी हळुहळू थांबून थांबून दोरी ओढू लागलो. माझा अंदाज होता. साधारण मध्यम आकाराचा मासा असेल, पण एकाएकी त्याला जोर चढला आणि एका झटक्यातच त्याने हूक–दोरी तोडून टाकली. मी पहिल्या गळाची दोरी लपेटतो आहे, तो दुसरा गळही सर्रकन् गेला. दुसऱ्या वेळीही तीच गत. गळ गिळल्यानंतर मासा जिवाच्या कराराने १०–१५ यार्ड गेला. मग दोन–पाच मिनिट थकवा–नक्कीच कॅटफिशची लक्षणे ! मी हळूहळू त्याला जवळ खेचत आणला. एवढयात जाणवलं की मासा तळात कशात तरी अडकला असावा त्याने अचानक धडपड चालू केली. एक झटका बसला आणि हुक–दोरी परत हलकी–हलकी ! मी गळ वर ओढून बघितला तर हुक एकदम सरळ झाला कोणता मासा मला चुत्या बनवतो आहे. म्हणून खुन्नसमध्ये मी नवीन बळकट हूक दोर वगैरे घेऊन आलो. परत तशीच कॅटफिश सारखीच झुंज. पण कॅटफिश सुरुवा-

तीला काहीं वेळच झुंजतात, अशी परत परत लढत देत नाहीत. अजून एक प्रयत्न केला आणि परत मासा गळाला लागला. ' नक्कीच दहा पौंडी कॅटफिश असणार–'

आता गळाचा दोर मजबूत होता. त्यामुळे विशेष झुंज न होता मासा जवळ खेचता येत होता. जेमतेम घोटाभर पाणी होतं, मी चार–दोन पावलं पाण्यात गेलो आणि कल्ले पकडून माशाला वर घेतला बघतो तो मासा रक्तबंबाळ शरीराच्या मध्यापासून ताजे खोल ओरखडे उमटलेले.

मासा गळाला लागला तेव्हाच त्याच्यावर हल्ला झाला असणार. बाकींच्याचंहीं तसंच झालं असेल. पण पाण्यात दहा पौंडी माशावर दुसरं कोण हल्ला करणार ? मगर. नक्की मगरीचंच काम हे !

एकाएकी मला हालचाल जाणवली. प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने हलकीशीं लाट तरंगत गेली. माझ्या पावलापासून जेमतेम दोन फुटांवरून एक अस्पष्टशी लांबसर आकृती सरपटत गेली. हालचाल थांबली. मी भानावर येऊन पटकन उडी मारून पाण्याबाहेर आलो आणि बंदूक उचलली. मगरीच्या शेपटाचे एक टोक आणि आकाराची मुख्य प्रवाहाकडे सरकणारी आकृती सर्व काही क्षणा दोन क्षणांतच !

मी एवढा हादरलो होतो की या मगरीचा बदला घ्यायचाच असा मीं निश्चय केला. वेडापिसा होऊन मी किनारा पालथा घातला पण नदीत इतक्या मगरी दिसल्या की नेमकी मघाची कुठली समजेना, शेवटी दिला नाद सोडून !

असं म्हणतात की मगरीला टिपण फारसं कठीण नाही. खरं आहे, पण फक्त मारायचंच असेल तर. कातडं हवं असेल तर बात अलग आहे. डझनभर जरी गोळ्या लागल्या तरी त्यासकट मगर पाण्यात नष्ट होते. आणि जाण्यापूर्वीही इतका धुमाकूळ घालते की बस ! पण प्रत्येक नामी आफ्रिकन शिकाऱ्याची स्वतःची अशी एक खसियत असते. काही म्हणतात तुम्ही नेमका मेन्दूचा वेध घेतला पाहिजे (हा मेंदू तर कोंबडीच्या अंड्यापेक्षा लहान असतो) काही म्हणतात, मानेवर पाठीच्या कण्यात गोळी घातलीत तर मगर जागच्या जागी लुळी पडते. किंवा समोरून नेमकी डोक्यात गोळी मारायची वा सर्वात बेस्ट म्हणजे बरोबर कलिजाचाच वेध घ्यायचा.

पण या ब्ल्यू नाईलमधल्या मगरीनी हे जालीम उपाय ऐकले नसावेत. त्यामुळे केव्हा मान टाकायची, केव्हा लुळे पडायचे हे त्यांना माहीत नव्हते. एखादी जबरदस्त रायफलच हे काम करू शकली असती. माझ्या शॉटगनके बसकी ये बात नही थी!

मी लौकरच एक गोष्ट शिकलो. ती म्हणजे मोठ्या मगरीला मारायच्या भानगडीत पडायचे नाही. तिच्या त्या जबरी कातड्यात शिशाचे काही तुकडे घुसले तरीं तिला ढीम काही होत नाही. अनेकदा निष्फळ प्रयत्न केल्यावर एका १५ फुटी मगरीला लोळवायची सुरसुरी मला आलीच. किनाऱ्यापासून सुमारे पाच फुटावर चिखलात ही मगर आरामात सूर्यस्नान करत पडली होती. वारा मला अनुकूल होता. मी खालच्या बाजूने मगरीकडे सरकायला लागलो. मगरीला मस्त झोप लागली होती

आणि तिला सावध करायला आसपास एकही पाखरू नव्हतं. माझ्या बंदुकीच्या एका नळीमध्ये छोटचा ००बक्शॉट गोळचा होत्या. तर दुसऱ्यात सिंगल स्लींग बुलेट होती. माझी ही दुसरी गोळी इतक्या जवळच्या अंतरावरची ही कामगिरी नक्कीच पार पाडणार याची मला खात्री होती. एका झुडपाआड बसून दोन्ही कोपरे गुडघ्यावर टेकवून मगरीच्या हृदयाच्या नेमक्या दिशेने मी नळी रोखली. मगर पाण्यात अगदी भेदी आणि कावेबाज वाटते. पण जमिनीवर मात्र तिच्यासारखी घाण आणि भिकार गोष्ट कुठली नसेल. ते दणकट पण आखूड पाय, सुजवट निश्चल डोळे, ओठ नामक लोंबणारे मांस, त्यातून विचकलेले अणकुचीदार दात आणि सगळचात लिमिट म्हणजे भयानक दुर्गंधी. एक मेलेले तरस सोडून बाकी दुनियेतल्या कोणत्याही गोष्टीला एवढी मरणातून दुर्गंधी येत नसेल ! भीतिदायक आणि किळसवाणा प्रकार. अशी मगर समोर असल्यावर शिकार कसली ? कत्तलच. फक्त एक घाण नाहीशी करण्यासाठी केलेली—

मी चाप ओढला आणि बंदुकीचा आवाज वा दणका जाणवायच्या ऐवजी गोळी नुसती रुतल्याचा भास झाला. क्षणभर मी गोळी मारली तिथे चांगले भोक पडल्याचा मला भास झाला. मगरीने जबरदस्त आवाज केला आणि ती गर्रकन फिरली. आता तिची फक्त शेपटी नाही तर पूर्ण शरीरच फट्कारत होते. ती एका बाजूला कलंडली मी पाहिलं तर गोळी दुसऱ्या बाजूने बाहेर पडून चांगले मुठीएवढे भोक पडले होते. मी उडी मारून तिच्या पल्ल्याच्या बाहेर आलो. मगर कोलमडली तेव्हा मी दुसरा बार घातला, डोळच्यांच्या मागे अगदी डोक्याच्या मध्यावर छऱ्यांना पसरायला वावच नव्हता. शिशाच्या एखाद्या गोळचासारख्या त्या घुसल्या असतीलच. मगरीची आतापर्यंत मरणाशी झुंज चालू होती, पण एकाएकी तिच्या अंगात बळ संचारले. एका झटक्यात करवादत वेडीवाकडी वळणे घेत माझ्या अगदी जवळून तिने नदीत झेप घेतली. मी अवाक होऊन वेडचासारखा एकदा माझ्या बंदुकीकडे, तर एकदा मगर गेलेल्या जागेकडे पहातच राह्यलो. इतक्या मरणोन्मुख अवस्थेतही नेमके तिने पाणी गाठावे याचे मला आश्चर्य वाटत होते. मी आपोआपच बंदुकीत नवे बार भरले आणि काठावर ओणावून वैतागून अशा वेळेला जे मंत्र म्हणायचे असतात तेही म्हणून घेतले. काही वेळातच इतर मगरींच्या नाकपुडचा पाण्यावर तरंगताना दिसल्या आणि त्या धीरगंभीरपणे मृतात्म्याच्या 'समाचारा' साठी गेल्या. भुकेले सगे-सोयरेही समाचाराला जमले असणार. तळाशी मेजवानी रंगात होती. पण वर मात्र काही घडलेच नाही, अशी नदी संथ वहात होती.

क्रूर-खुनशी मगरीच्या अंगावर काटा आणणाऱ्या अनेक कथा मी ऐकल्या होत्या. मला नेहमी प्रश्न पडायचा की या मगरी एकाहून एक वरचढ असतात की ही कथा लिहिणाऱ्यांची अदाकरी असायची ? सफरीच्या पहिल्या दिवशी पहिल्या वळणावर जी मगर दिसली, तेव्हा मी टरकलो जरूर होतो, पण ती शिकारी, खुनशी वगैरे

अजिबात वाटली नाही. मगरी पाण्यातून नुसते मुंडके उचलून माझ्याकडे आणि तराफ्याकडे बघायच्या, मी जवळ येताच पाण्याखाली सटकायच्या. त्यात कसलीही घाई-गडबड-धडपड नसायची, तर त्या नुसत्या सटकायच्या. मगरींना जमिनीवर सुरक्षित वाटत नाही. जमिनीवर गवसल्या की त्यांचीं पहिली प्रतिक्रिया म्हणजे पाण्यात पळ काढणे. पाणी आणि जमीन याच्यामध्ये तुम्ही असाल तर त्या कदाचित तुमच्यावर चाल करतील. तुम्ही बोटीत असाल आणि मगरीने जर तुमच्या दिशेने पाण्यात येण्यासाठी सूर मारला तर ती हल्ला करणार असंच वाटतं.

हा प्रत्यक्ष हल्ला नसला, तरी धोकादायक प्रकार असतो. पहिले दोन आठवडे मी माझा तराफा शक्यतो किनाऱ्याजवळून न्यायचो. म्हणजे धबधबा आला की तो पटकन् किनाऱ्यावर ओढून घेता यायचा आणि किनाऱ्यावर जनावर असेल तर सहज शिकारही साधायची. पण बऱ्याचदा इतर जनावरांपेक्षा, या मगरीशीच गाठ पडायची. माझा तराफा चांगला मजबूत, ऐसपैस होता त्यामुळे उलटण्याचा धोका कमी होता, पण दुसऱ्या एखाद्या बोटीने किनाऱ्याच्या इतक्या जवळून जाणे, धोक्याचे ठरले असते. एकदा तराफा एका मगरीच्या जवळ जवळ अंगावर गेल्यावर तिचे लक्ष गेले, ती सर्रकन मागे वळली. तराफ्याला स्पर्श केला आणि बुडी मारून नाहीशी झाली. त्यानंतर किनाऱ्यापासून ८–१० यार्डापेक्षा जवळून न जाण्याची मी दक्षता घेतली.

कोरड्या हंगामात सरासरी दर मैलावर एक दोन धबधबे असत, आणि धबधब्यांच्या अधल्या-मधल्या संथ पाण्यात, डबक्यात मगरीची वस्ती असे. नदीचे पाणी उतरले की साहजिकच अशा जागी मगरींची संख्या वाढत असे. शिवाय मासेही अशा जागी खालचा प्रवाह सोडून वर चढत. मग भुकेल्या मगरींची एकच दाटी होत असे. अशा वेळी जे काय समोर दिसेल त्याचा लचका तोडायला त्या धडपडत. असं म्हणतात की पूर्ण वाढ झालेली मगर डुक्कर किंवा हरणाशी ( एवढंच कशाला प्रत्यक्ष रानरेडा वा हत्तींशीही !! ) लढत घेऊ शकते. मग त्यांनी तराफा वा बोटीवर हल्ला चढवणे साहजिक होते. विचार करा दर मैलागणिक निदान ५–६ तरी जबरी मगरी असायच्याच, (दहा फुटापर्यंतच्या चिल्लर मगरी सोडून देऊ या !! ) त्यामानाने सबंध सफरीत माझ्यावर प्रत्यक्ष झालेले त्यांचे सात हल्ले काहीच नाहीत.

मी हल्ला म्हणतो, तो म्हणजे त्यांचा नेहमीचा लुटुपुटीचा हल्ला नाही तर खरा-खुरा हल्ला. मगरीचा वासलेला जबडा पाहिला की प्राणी जागच्या जागी गारठतो. मगरींनाही याची पूर्ण कल्पना असावी कारण त्या माझ्या तराफ्याच्या मागून वा बाजूने गुपचूप यायच्या. ( त्या समोरून क्वचित हल्ला चढवतात ) जबडा वासून त्यांच्या यच्चयावत् अणकुचीदार सुळ्यांचे आणि घाणेरड्या हिरड्यांचे दर्शन द्यायच्या, आणि मग हळूहळू जबडा मिटून संथ गतीने मागे फिरायच्या. माझ्यामुळे त्यांची निराशा होत असणार. काही दिवसानंतर मला त्यांची इतकी सवय झाली, की मी बंदूक उचलायचेही कष्ट घ्यायचो नाही. मला वाटतं, नवखी वस्तू गळाला

लावून टाकल्यावर ट्राऊट नाहीतर पाईक माशाची जी नैसर्गिक प्रतिक्रिया होते, तशीच तराफा पाहून मगरींची होत असणार. आणि कधीही न बघितलेली, चाखलेली ही वस्तू कोणती म्हणून कुतूहलाने त्या त्यावर झडप घालत असणार. कारण स्थानिक आदिवासी कधीही बोटी वापरत नाहीत. तर अरुंद उताराच्या जागा पाहून नदी पार करतात. यापूर्वी नदीतून होडकं–बोट-तराफा काहीही गेलेलं नव्हतं. साहजिकच घळीतल्या मगरींना मनुष्यप्राण्याची फारशी माहिती नव्हती. म्हणूनच आपल्या साम्राज्यातल्या या नवलाईच्या गोष्टीची त्यांनी चाचपणी करणं, साहजिकच होतं. पण या चाचपणीत ही बोट जर उलटली नाही ( मग मात्र काहीतरी दगाफटका असल्याचा मगरींना संशय येईल. ) आणि संथपणे निघून गेली की मगरीचे सगळे औत्सुक्य संपायचे आणि त्या माघारी वळायच्या. मगर पाण्यातले सगळ्यात खतरनाक किंवा खुनशी जनावर असेल, पण ते शूर, लढवय्ये जनावर नक्कीच नाही. मला मगरींची तशी भयानक भीती कधीच वाटली नाही. तरी त्यांच्या तावडीत सापडलो तर काय होईल. याची मी कल्पनाच करू शकत नसे. आदिस आबाबातल्या एका जर्मन बुढ्ढ्याचे शब्द मी कधीच विसरणं शक्य नव्हतं.

'मगर तुला ताजा–ताजा खाणार नाही. फरफटत खोलखोल, पाण्यात घेऊन जाईल. तिला चावता येत नाही. ती तुझ्या प्रेताचे तुकडे–तुकडे करून तळातल्या चिखलात पुरून ठेवेल. मांस चांगले सडले, कुजले, हाडापासून अलग झाले की मग त्यावर ताव मारेल–'

मी सफरीत मारलेल्या एकूण पाच मगरींपैकी (खरोखरच चांगल्या टिपलेल्या ! ) दोनच मगरीची कातडी सोलू शकलो. एक होती दीड फुटाची बच्ची, तिला तर मी केवळ हाताने पकडली होती. तर दुसरा भिडू ५–६ फुटी होता. तो पाण्यात आरामात उन खात पडला होता. ( याचंच यकृत खाऊन मी आजारी पडलो होतो ) यालाही मी कधी पूर्ण सोलू शकलो नाही. पण मला घळीतून कातडी न्यायची होती, म्हणून मी गळाने शिकार करायची ठरवली.

मी तंबूच्या खिळा ठोकून–ठोकून त्याचा हूक बनवला. त्याला काटा नव्हता, पण, म्हटलं काम निभून जाईल. माझ्याकडची गळाची दोरी आणि नांगराच्या जादा दोराला तो हूक अडकवून तो पाण्यात टाकला. आमिष म्हणून माकडाचे डोके होते दोराचे दुसरे टोक एका झाडाला बांधले आणि दुसऱ्या झुडपाआड दडून राहिलो. इथे खूप लांब-रुंद जागी खोल पाणी होते आणि येताना तिथे मध्यम आकाराच्या खूप मगरीही दिसल्या होत्या. अर्धा तास काहीच घडलं नाही. दुसऱ्या दिवशी पहाटे प्रयत्न करावा, या विचारात असतानाच काहीतरी हालचाल गळाजवळ जाणवली.

पाण्याच्या रंगात जरासा बदल, प्रथम नाकपुड्या आणि सुजवट डोळे, मुंडकं आणि पाण्याबाहेर डोकावणारा पाठीचा भाग. पण नदीत कसलेही तरंग–बुडबुडे मागमूस नाही. कसलीही जाणीव न देता धुक्यातून उमटणारी आकृती. या वेळचं

दृश्य खरोखरच कल्पनातींत होतं—समुद्रतळातून एखादा महाभयंकर जलचर प्राणी उठावा तसं ! त्या मगराचा आकार बघून माझं हृदय अक्षरशः गोठलं. मी बघितलेल्या मगरापैकीं तो सर्वात मोठा होता, सगळं शरीर दिसत नव्हतं, तरी तो वीस फुटी नक्कीच होता, असा मी अंदाज केला. जगातला सर्वात मोठा मगर भासत होता तो. तो प्रत्यक्ष दिसत होता, तरी त्याचं अस्तित्व खोटंच वाटत होता. नदीचा काठ उथळ आणि चांगला रुंद होता त्यामुळे त्याने अर्धे शरीर सहजी पाण्याबाहेर काढले. त्यांची पाठ चांगली रुंद आणि इतकी उंच होती की त्याच्या पाठीवर स्वार व्हायचे म्हटले तर पाय जमिनीला टेकले नसते. हे धूड एवढं प्रचंड होत की तोंडातून ज्वाळा येत नसल्या तरीं परीकथेंतच शोभून दिसलं असते.

तो जसा गळाकडे सरकू लागला तसं मला जाणवायला लागलं की हा गळाला लागला तरी आवरता येणार नाही. तो गळासकट नाहीसा होईल. मी झुडपातून ताडकन् उठलो आणि हातवारे करत ओरडू लागलो. खरं म्हणजे मला ओरडायचं होतं, पण तोंडून शब्द फुटेंना. मी बार टाकायला पाहिजे होता, पण तेही सुचलं नाही. मगर क्षणभरहीं थबकला नाही की माझ्या हातवाऱ्यांकडे त्याने ढुंकूनही बघितलं नाही. तोंडाच्या टोकाने त्याने गळ पकडला आणि गर्रकन् वळून नाहीसा झाला. गळाची दोरी भराभरा उलगडू लागली. नांगराचा दोर संपणार एवढ्यात मी तो कसाबसा पकडला. मगर नदीच्या मध्यावर जाऊन प्रवाहाला लागला. तो नागमोडी गेला नाही की कसले हिसके दिले नाहीत, तर अगदी जहाजाइतक्या संथ गतीने तळाला गेला. मी भरभर उलगडणारा दोर थांबवण्याचा, किमान त्याचा वेग कमीं करण्याचा प्रयत्न केला. पण फक्त माझे हात सोलले गेले ! पाऊण इंच जाडीचा दोर भराभर संपत आला आणि अचानक माझ्या लक्षात आलं की मी जाड दोर आधीं बांधला आहे, आणि मग पातळ दोर. शेवटचे २० यार्ड राहिले होते. मग तो तुटलाच असता, याचा अर्थ यापुढे मला तराफा नांगरणं अथवा बांधून ठेवणं, त्याची कसलीहीं दुरुस्ती करणं अगदी अशक्यच होतं. मी इतका असहाय झालो होतो, की मला धाय मोकलून रडावसं वाटत होतं. नशीबाने मगर जरा विसावला. त्याने अजून गळ गिळला नसेल या आशेने मी जीव खाऊन दोर ओढायला सुरुवात केली. पण ओंडक्याला बांधल्यासारखा दोर ढीम होता. तो राक्षस गळ गिळून निपचित पहुडला होता. गळ सोडण्याचं चिन्हं नव्हतं. काही मिनिट गेली, पाच-सातच असतील, पण मला युगं लोटल्यासारखं वाटलं. मी अंगात होता नव्हता तेवढा जोर लावून, दोर ओढला. दोर खरोखरच मगराने गिळला आहे की ओंडक्याला अडकला आहे याची मला शंका यायला लागली. मी परत परत दोर खेचत होतो. एवढ्यात एक जबरदस्त झटका बसला. बहुधा मगराने मुंडी झटकली असेल. दोर हळूहळू उलगडत गेला—संपला, ताणला आणि लुळा पडला. मी जितक्या लौकर ओढता येईल तेवढा भराभरा दोर ओढून घेतला. हूक वाकडा-तिकडा झाला होता. पण तुका म्हण

त्यातल्या त्यात. शिकारीची कल्पना मीं त्या दिवशीं सोडून दिली.

तरीही शिकारीचा विचार मनात घोळत होताच. तंत्रात कशी सुधारणा करता येईल याचा मी विचार करत होतो. मात्र आता नांगराचा दोर खर्ची घालण्याचा धोका पत्करायचा नाही हे मी नक्की केलं. त्याऐवजी मी तराफ्यावरचे पिंप वापरायचे ठरवले. २० लिटर टँकची उद्धरणशक्ती जबरदस्त असते. झटू दे मगराला त्याच्याशी. पण एक प्रश्न होता. तो टँक।पिंप हुकच्या अगदी जवळ बांधला असता तर भुकेकंगाल मगरालाही संशय आला असता. उलट पिंप आठ-दहा फूट मागे बांधावे तर उपयोग नव्हता कारण नदीची खोली फक्त ५–१० फूटच होती. मग मी एक आयडिया केली. हुकच्या जवळ तीन फुटांवर आणि मागे साधारण पन्नास फुटावर नांगराच्या दोराचे दोन फास केले आणि शेवटाला पिंप अशा तऱ्हेने बांधले की ३० यार्ड दोर खेचल्याशिवाय पिंप ओढले जाऊ नये. शिवाय मगर दोर घेऊन तसाच निघाला तर किंवा मी दोर खेचायला सुरुवात केली तर पिंप सरकत मगरापासून तीन फुटावरील फासाजवळ जावे. त्यामुळे दोर अचानक न संपता त्याला अवरोध झाला असता आणि पिंपाच्या उद्धरणशक्तीमुळे मगराला झक मारत बाहेर पडावेच लागले असते. मी माझ्या युक्तीवर बेहद्द खूष होतो. आणि हे अगोदरच का सुचले नाही म्हणून आश्चर्य करत होतो. समुद्रावर शार्क मासे धरायला पण हीं आयडिया अंमलात आणायची असे मी मनोमन ठरवून टाकले.

गळाच्या शेवटाला लावायला माझ्याकडे वायर नव्हती आणि गळाची नेहमींची पातळ दोरी पुन्हा एखाद्या राक्षसाच्या घशात मला जाऊ द्यायची नव्हती. मग मी आणखी एक कल्पना लढवली. काठावरच्या एखाद्या झाडाच्या फांदीवरून गळाची ही पातळ नायलॉन दोरी सोडायची. मात्र आमिष गट्टम् करायला एखादा दांडगोबा आला की पटकन् दोरी मागे ओढून घ्यायची.

माझ्या नवीन शिकारतंत्राचा प्रयोग करायला मीं अधीर झालो होतो. दोन दिवसांनतर योग्य अशी संथ पाण्याची जागा सापडली. नदीच्या काठावरच एका उतरत्या पठारावर मुक्कामाला छानपैकी जागा मिळाली. नदीकाठावरून ही जागा दिसत नव्हती, पण मला मात्र गळाची जागा नेमकी दिसत होती. परत मीं आमिष म्हणून एक माकड बांधलं. त्याच्या शेपटीला दोर बांधून काठावरच्या झाडाच्या बेचक्यातून तो मागे घेतला. दोराने माकडाचं वजन जेमतेम पेललं होतं आणि मगराने पकडल्यावर मीं ढील दिला असता तर तो लगेच सुटला असता. झाडाखाली चांगलं दोन–तीन फुटाचं रुंद तळं साचलं होतं. मी तो लोखंडी हूक परत चांगला घासून–पुसुन वाकवला होता आणि माकडाच्या शरीरात घुसवला होता. फक्त त्याचे टोक माकडाच्या तोंडात आले होते. फासाला बांधलेले पिंप झुडपाआड लपवला होता आणि दोराचे दुसरे टोकही झाडाला व्यवस्थित बांधून ठेंवले होते. अगदीं जय्यत तयारी झाली होती. मी तंबूत गेलो. बंदूकीत दोन बार भरले. कमरेच्या पट्ट्यातलीं

काहीं काडतुसं ठवलीं. सुरा जागच्या जागी आहे कीं नाहीं बघितलं आणि मग जाग-वर येऊन माकडाचीं दोरी अलगद पाण्यात सोडली.

थोडयाच वेळात एक मगर आली. ज्या वेगाने आणि बेधडकपणे ती आलीं त्यावरून ती भयंकर भुकेली असावी. तिचीं लांबी साधारणत: दीड फूट असावी. पण अशा बच्च्यासाठी मी सगळी मगजमारी मुळींच केली नव्हती. मी गळाची दोरी पटकन वर ओढली. त्या येडयाला काय झालं ते कळलंच नाही. जबडा न मिटता तीं आ–वासून तशीच बघत राहीली. मला वाटलं ती टळेल, पण माकडातून टपक-णाऱ्या रक्ताच्या थेंबांच्या आशेने ती तिथंच चकरा मारत राहिली. काही वेळाने तिच्या जोडीला आणखीं एक मगर आली. ही आणखीनच लहान होती. काय वैताग आहे. दहा एक मिनिटं वाट बघितली आणि मग आरडा–ओरडा करत या बच्च्यांना हाकलून देऊन मी तंबूकडे परतलो. अर्ध्या तासाने परतून परत माकड सोडलं, तर या दळींदर हजरच. मी माकड वर ओढून ठेवलं आणि चक्कर मारायला गेलो. थोडया वेळाने परत येऊन बघितलं तर काही अंतरावर मध्यम आकाराच्या मग-रीच्या नाकपुडया दिसल्या. बहुधा तिला माकडाचा वास लागला असावा. मी माकड जरा खाली सोडलं ते बच्चे येताहेत का बघायला, लगेंच ते आलेही. पण मोठ्या मगराला बघून त्यांनी पळ काढला. मगराने बेंधडक गळ पकडला. गरंकन वळला आणि सूर मारून पसार झाला. त्याची लांबी साधारण १० फूट असावी. साधारणत: पंधरा यार्ड गेल्यावर तो नदीच्या तळाशी विसावला असावा. अमिषासकट गळ. मिळायला मी त्याला पाच–एक मिनिटं दिली आणि नदीकाठी निघालो. मी फासाचे दोन्ही दोर उचलले आणि झटका देऊन हूक जाम करण्याचा प्रयत्न केला मला जोराचा विरोध झाला. पण विशेष काही घडलं नाही. मी परत दोर उचलून हळुहळू ओढू लागलो. योजना मस्त जमली होती. आता टँकच्या उद्धरणशक्तीविरुद्ध शेवटचे काही यार्ड दोर ओढायचा होता. झाडाभोवती दोराचे वेटोळे घातले तरच पिंप पाण्याखाली दाबून धरणं शक्य होतं. परत काही घडलं नाही– दोन, तीन, पाच मिनिटं....

पाणी एकदम उफाळून आलं. बेभानपणे मुंडकं झटकत मगराचे अर्धे अधिक शरीर पाण्याबाहेर आले. या पिंपामुळेच ही बला आली असं समजून तो त्यावरच तुटून पडला. वाटलं की पिंपाचे आता बारा वाजणार. पण मला गोळीही घालता येईना. कारण रक्तानें बाकी मगरी जमा झाल्या असल्या आणि जखमी मगरावर तुटून पडल्या असत्या. त्या मगराने शेपटीने तडाखा हाणण्याचा प्रयत्न केला. पण गळाचीं दोरी आणि पिंप यात फक्त तीन फुटांचेच अंतर होते. त्यामुळे तो तडाखा हाणायला मगर सरकला की पिंप सरकायचे. लुळा पडलेला दोर हातात धरून ही झटापट पहाण्याव्यतिरिक्त मी काही करू शकत नव्हतो

दहा मिनिटं धडपडल्यानंतर मगर थकल्याची पहिली लक्षणं दिसायला लागली

पिप वापरायची बुद्धी सुचली म्हणून बरं झालं, याहीतर त्या धुडापुढे काही टिकाव लागला नसता. मी आतापर्यंत मारलेल्या एखाद्या मोठ्या माशासारखी मगराची वागणूक नव्हती. पाण्याच्या पृष्ठभागावर येऊन लोळण घेणं, शेपटावर नाचणे, उगाचच इकडं तिकडं पळापळ करणं – या सगळ्या युक्त्या त्याला माहीत असाव्यात. पण आता मात्र काहीही हालचाल न करता तो तळाशी गुमान पडून होता. टॅकच्या उद्धरणशक्तीशी लढणं म्हणजे उगाच शक्ती वाया घालवणं होतं हे त्यानं ओळखलं असावं. अर्ध्या–अर्ध्या तासाने तो नुसता पृष्ठभागावर यायचा. तो वर आला रे आला की मी त्याला हुकाची ओढ जाणवावी म्हणून मी दोराला झटका द्यायचो. की तो परत खाली जायचा. तासाभरानंतर मगर थकल्याची उघड – उघड लक्षणं दिसायला लागली.

हळू हळू मी दोर ओढायला सुरुवात केली. प्रतिकार अजिबात जाणवलाच नाही. मी जणू लाकडाचा निश्चल ओंडकाच प्रवाहाच्या दिशेने नेत होतो. काही वेळा तो मगर चक्क मागचे पाय हवेत ताणून, उलथा तरंगायचा. मला जवळ बघितल्यावर मात्र त्याने जबडा वासला. आपल्या पनवतीला जबाबदार कोण हे त्याने ओळखले असावे. मग जवळ आल्यावर दोन गोष्टी स्पष्ट झाल्या. एक म्हणजे हूक जबड्यात नेमका आवळला होता. त्यामुळे झुंजीत त्याला बरेच पाणी प्यावे लागले होते. त्यामुळेच झुंज लवकर आटपली असेल. पण दुसरी गोष्ट आणखी भयानक होती. हुकाला बांधलेला आडवा दांडा मगराने अर्धा-अधिक चावला होता. मी लगेचच बंदुकीला हात घातला. त्याचवेळी मगराने एक झटका दिला आणि तो तळाला गेला. गळाने मासे पकडताना अनेकदा प्रत्यक्ष मासा धरण्यापेक्षा त्याला निसटू देण्यातच मजा असतो. पण आयुष्यात प्रथमच मगर गळाला लागलेला असताना, तोही थकलेला. हातातून निसटू द्यायचा म्हणजे काय ? पण तेवढ्यात तो आणखीनच हिसके देऊ लागला, निदान मला तसं वाटलं तरीं –

झटका देऊन प्रत्येक वेळी दोर ओढल्यानंतर मी जीव खाऊन ओरडायचो. 'देवा, तो दांडा आणखीं काही क्षण तगू दे. मगर अगदी हातातच आल्यासारखा आहे.'

जाळं किंवा गळाशिवाय नुस्त्या बांबूच्या जोरावर पहिला मोठा मासा धरताना एखाद्या पोराची जशी अवस्था होते, तशी माझी झाली होती. मी मरणातून दमलो तरी त्या आडव्या दांड्यापुढे मला दुनियेचा विसर पडला होता. फक्त त्या मगराचे अस्तित्व आणि त्याच्या आयुष्याचा अखेरचा धागा बाकी होता. काही वेळानंतर मी त्याला परत जवळ खेचला. तेव्हा कोण कुणाकडे जास्त खुन्नसमध्ये बघत होतं ते सांगणं कठीण आहे. आपले मुंडके आणि चारी पायासकट जेव्हा तो उथळ किनाऱ्यावर आला, तेव्हा मी डाव्या हाताने दोर घट्ट ओढून धरला आणि उजव्या हाताने बंदूक उचलून पिस्तुलासारखी रोखली. जबड्यातून मी त्याच्या डोक्याच्या दिशेने गोळी घातली. बंदुकीच्या बाराबरोबर एकदम स्फोट व्हावा तसा तो मगर उसळला.

दोर भराभरा उलगडला आणि माझे हात सोलले गेले. झक मारत दोर सोडावा लागला. मी शर्ट फाडला आणि त्याच्या गुंडाळीत दोर पकडला. माझ्या हातांची वाट लागली होती, ते सुजून रक्तबंबाळ झाले होते. दहा फुटांवर परत मगर वर आला. मी तीन यार्डांवरून त्याच्या डोक्यात गोळी घातली, इंजिनाच्या चाकासारखा तो गरगरला आणि कुंथत कोसळला. मी बंदुकीत बार भरला आणि पाण्यात २-४ पावलं गेलो. मगर शेवटचे आचके देत होता. अखेर आटोपला एकदाचा !

जरा दम खाऊन मी तो मगर किनाऱ्यावर ओढायला सुरुवात केली. तोपर्यंत तिन्हीसांजा झाल्या होत्या. मी प्रचंड थकलो होतो. त्यामुळे त्याची कातडी सोलायचा बेत मी उद्यावर ढकलला. बंदुकीच्या आवाजामुळे इतर मगरी इतका वेळ दूर राहिल्या असल्या तरी आता त्यांची नाकाडे आणि डोळे पाण्यावर डोकावू लागले होते. मला माझी शिकार सुरक्षित ठेवणं भाग होतं. नाहीतर हमखास त्यांनी रात्रीत त्याचा फडशा पाडला असता. अंगात होतं, नव्हतं तेवढं बळ एकवटून चढावरून फरफटत मी ते धूड माझ्या तंबूजवळ आणून टाकलं. नदीपासून हे अंतर १५ यार्डच होतं. पण दरवेळी वाटायचं, सालं याचं वजन वाढतंय की काय ! आताच प्रेताची दुर्गंधी पसरली होती. रात्रीत ती आणखीनच वाढणार होती. पण मगराच्या राखणीच्या टप्प्यातच मी रात्र काढायची ठरवली.

मी तंबूत परतलो, बंदूक व्यवस्थित भरली आहे की नाही, काडतुसाचा पट्टा ठीकठाक आहे ना याची खात्री केली आणि दुसऱ्याच क्षणी आडवा झालो. सकाळी उठताच जाणवलं, की काहीतरी बिनसलंय, मगराची घाण येत नाहीये. मी बाहेर येऊन बघतो तर मगर गायब ! खाणाखुणांवरून कळलं, रात्री दोन मगर येऊन आपल्या मृत बांधवाला घेऊन गेले. त्यातला एक तर माझ्या तंबूपासून केवळ दोन फुटांवर आला होता.

मला रात्री कसलाही आवाज हालचाल जाणवली नव्हती. मी तंबू उचकटला, गाशा गुंडाळला आणि तराफा गाठला !

काही दिवसांनंतर अजून एक पाहुणा रात्री माझ्या भेटीला आला. मात्र यावेळी तो गुपचुप आला गेला नाही. अंधार पडता पडता तंबू ठोकून मी मासे पागायला गेलो होतो. काही अंतरावर हिप्पोचा आवाज ऐकला आणि घाई गर्दीत परत येऊन मी कॅमेरा आणि फ्लॅश घेऊन गेलो मात्र जाताना तंबू नीट बंद करायला विसरलो. अखंड एक मासा आणि दोन फोटो काढून (त्यांनाही प्रकाश कमी पडल्याचं नंतर समजलं !) परतलो तेव्हा मिट्ट अंधार झाला होता. काही दिसत नव्हते. माझा टॉर्च तर केव्हाच कामातून गेला होता. माझ्यात जेवणाचेही त्राण नव्हते. मी तसाच तंबूत शिरलो, प्रथम बाहेरचा पडदा लावला, मच्छर येऊ नये म्हणून लावलेली जाळीही बंद केली. आणि झोपण्याच्या पिशवीवर पहुडलो. मला जवळ जवळ झोप लागत होती. इतक्यात पायात काहीतरी भारी जड सळसळल्यासारखं वाटलं. स्पर्श

थंड आणि कोरडा होता. हालचाल संथ पण पीळदार होती. एकाच शब्दात म्हणजे साप ! सावकाश काळजीपूर्वक पण विळख्या विळख्याचे त्याची हालचाल सुरू होती, जणू तो काहीतरी शोधत असावा. माझी एवढी तंतरली होती. मी तसूभरही हलू शकत नव्हतो. ' अंगात कुठेतरी अणकुचीदार दात घुसणार–' फक्त याचीच वाट पहाणं माझ्या हातात होतं. साप आता माझ्या पायावरून सरकत होता. पण तो नेमका कुठे गेला किंवा आहे, मला पत्ता लागत नव्हता. अगदी काळजीपूर्वक बंद केलेल्या तंबूच्या दाराशी डोकं करून मी पडून राह्यलो.

साप विषारी असेल का ? बहुसंख्य साप विषारी नसतात. आता मला लोकांनी सापाबद्दल सांगितलेल्या दर्दभऱ्या कहाण्या आठवायला लागल्या. खरं तर यापूर्वी मी सफरीत काहीं साप बघितले होते आणि मारलेही होते. खरं तर शहरात तुम्ही गाडीखाली सापडण्याचा जेवढा संभव असतो त्यापेक्षा कितीतरी कमी धोका या आफ्रिकन जंगलात सर्पदंशाचा असतो. पण आता सर्पदंशाने काय होतं ते एकेक आठवायला लागलं. वेदना, मग अंधारीं, अचके, नाका तोंडातून डोळ्यातून रक्त, अंग लुळं तीन मिनिटांत बेशुद्धी, पाच मिनिटात मरणं–एक ना दोन !

या अंधारात साप विषारी आहे की नाही, हे जाणण्याचा एकच मार्ग होता. पण मला जोखीम पत्करायची नव्हती. मी आणि साप एक तंबूमे बंद हैं, अशी हालत होती. शैय्यासोबती मिळावा असं अनेकदा वाटे, पण परमेश्वरा असली ' सोबत ' नको होती असं वाटायचं, एकदम बंदूक उचलावी. पण अंधारात जाम दिसत नव्हतं त्यातून हा साप आहे कुठे कळत नव्हतं. उजाडेपर्यंत निपचीत पडून रहाणं हा एकमेव मार्ग होता !

विषुवृत्ताजवळ रात्र संध्याकाळी सुमारे सातपासून पहाटे पाचपर्यंत असते, आणि या असल्या घळीत सूर्योदयानंतर घंटाभराने सूर्यप्रकाश पोहोचतो. अलम् दुनियेच्या सुरुवातीपासून एवढी लंबी (काळ) रात्र नसेल. रात्रभर मीं जागा असलो तरीं एकदाही सापाची हालचाल जाणवली नाही. सकाळीं तंबूच्या पडद्यातून जेव्हा थोडा उजेड आला तेव्हा त्याचा आकार जाणवला, तीनचार फूट लांबीचा तो साप माझ्या पायाजवळच्या कोपऱ्यात वेटोळे घालून बसला होता. त्याची पाठ काळी आणि पोट पुसट राखाडी होतं. मांझं डोकं जाळीच्या दाराकडेच होतं. मी अगदीं सावधपणे चेन उघडायला सुरुवात केली. बोंबला चार वर्षात प्रथमच ती अडकली ! सापानेही हालचाल सुरू केली, वेटोळ्यातून डोकं बाहेर आलं. मी जीव खाऊन चेनला हिसका दिला. बया उघडली. मी हळूहळू बाहेरचे पडदे सोडले. साप उत्सुकतेने माझ्याकडे बघत होता. मी सुरा सापडतो का चाचपू लागलो. सापाने हल्ला केलाच तर प्रथम त्याचे मुंडके उडवायचे–

पहिला पडदा, दुसरा पडदा, तंबू उघडला. धड श्वास घ्यायची पण हिंमत नव्हती तरी पाय पोटाशी घेऊन मी हळूहळू तंबूच्या दाराकडे सरकायला लागलो. साप लक्ष-

पूर्वक माझी हालचाल पहात होता आणि त्याहीपेक्षा एकाग्र चित्ताने मीं सापावर लक्ष ठेवून होतो. एक हात लांब करून मी शर्ट उचलला त्याने हल्ला केला तर त्याच्यावर फेंकण्यासाठी. माझं बहुतांश शरीर तंबूबाहेर आलं. तेव्हा माझ्याच्याने राहवेना. मी पाय जवळ घेतले आणि एकदम कोलांटी उडीं मारली. सापाने डोके उचलले, पण पाठलाग केला नाही. सुटल्याच्या भावनेने मला रडावंसं वाटत होतं, पण माझ्या तोंडाला कोरड, पडली होती, सर्वांगाला दरदरून घाम फुटला होता. एखाद्या दारूड्यासारखा भेलकांडत मीं नदीवर आंघोळीला गेलो. तासाभराने परतलो तर साप महाराज तंबूत आरामात पहुडलेले. एका काठीने ढोसून त्याला तंबूबाहेर हुसकावले माझ्यापेक्षा तो कमी घाबरलेला होता आणि बाहेर जायला स्वारी नाखूष होती.

मात्र एकदा बाहेर पडल्यावर दुसरा कटाक्षही न टाकता तो सरळ पाला पाचोळ्यात सळसळत गेला. त्यालाही शय्यासोबती पसंत पडला नसावा !

◆

## पाच

तंबूसमोर झाडाच्या सावलीत पडून मी विचार करत होतो. थंडगार बियरची चव काय मस्त असेल ! शेजारच्याच झाडावर बसून दोन होले घुमत होते. थोड्या वेळाने ते उडून गेले, मग गडद रंगाचे काहीं मोठे स्नाईप पक्षीं पलिकडच्या गवतात शिरून नाहीसे झाले. त्यांच्यामागून काहीं स्पर फाऊलसही गेले. बराच वेळ त्यांचा कॅवरॅक – कवरॅक आवाज ऐकु येत होता. पण जागचं उठून जावंसं काहीं वाटेना पलिकडच्या तीरावरून एक माकड कसलीशी तक्रार करत होतं. पण बाकीं सर्व शांत होतं. आता एवढं शांत वातावरण मी घळीत कधीच अनुभवलं नव्हतं. मी जागचा हललो नाही. संध्याकाळीं गाराचं वादळ येणार हे मी ओळखलं होतं.

नदी आणि झाड यामध्ये बारक्या दगडाचा एक पट्टा होता. त्यात अधे–मधे खुरटी झुडपं आणि गवत माजलं होतं. आपण इथेच का उगवलो आणि इथेच का आहोत, याबद्दल ही झुडपे दैवाला दोष बसत नव्हती की खंत करत नव्हती. त्यांना एकच काम होतं. रुजायचं वाढायचं. आणि पसरायचं. पुढच्या पावसात तीं वाहून जातील, फक्त बीजें शिल्लक राहील. ही बीजं पाण्याबरोबर वहात जातील आणि कदाचित नदीकाठच्या चिखलात पडतील. उन्हाळ्यात तो चिखल वाळून जाईल.

पाऊस येईल. निसर्ग–चक्रात त्या बीजाला जागा असेल तर ते परत रुजल. वाढल. मरेल, त्याचा जीवनक्रम असाच असेल. ज्या जीवनचक्राला लौकिक अर्थाने काहीं अर्थ, कृतज्ञता असेल–नसेलही. मला त्यांचा हेवा करावा की कीव हेच समजत नव्हतं

अचानक माझ्या मागे काहीतरी हालचाल झाल्याचे जाणवले. शरीर न हलवता मी हळूच मान वळवून बघितली. ते दृश्य बघून माझा श्वास रोखला गेला माझ्या–पासून केवळ चाळीस यार्डांवर जगातला सर्वात सुंदर असा मोठा कुडू (एक प्रकारचे हरीण) उभा होता. नदीकाठच्या झुडपातून बाहेर येऊन तो उघडयावर आला होता. त्याच्या अंगावर सूर्यास्ताचे सोनेरी किरण रेंगाळत होते. आतापर्यंत मी बघितलेल्या किंवा ऐकलेल्या कुडुंपेक्षा हा सर्वात मोठा व ऐटदार मोठया शिंगाचा होता.

शिकार करण्यालायक कोणत्याही कुडूची शिंगे ३५ ते ४० इंची असावी लागतात. ४०–५० इंची शिंगाचा कुडू अगदी चांगल्यापैकी समजला जातो. माझ्या माहितीच्या अनेक शिकाऱ्यांनी असे कुडू दिमाखाने आपल्या दिवाणखान्यात टांगून ठेवले आहेत. ५०–५५ इंची शिंगवाला कुडूला अस्सल खानदानी शिकारी डोळे झाकून मारेल. आदिस आबाबाला मला एका पार्टीला बोलावलं होतं. त्या पार्टीचं कारण म्हणजे त्या शिकाऱ्याने ५२ इंची शिंगाचा कुडू मारला होता. ' रोलॅंड वर्ल्ड लिस्ट ' प्रमाणे ' बोमॅन ' या विश्वविक्रमी कुडूच्या शिंगाची लांबी ५९ इंच होती.

पण माझ्या समोरचा हा कुडू या सगळयांपेक्षा मोठा होता. मीं यापूर्वी अनेकदा मोठे कुडू अथवा त्यांची छायाचित्रे बघितली होती, पण त्यातल्या कुणाशीच याची तुलना होऊ शकत नव्हती.

माझा वास त्याला येत नव्हता, पण तो माझ्याकडे बघत होता. त्याच्या नजरेत भीती नव्हती, पण सावधपणा होता. हनुवटी पुढे येऊन डोके मागे करून तो रुबाबात उभा होता. त्याची शिंगे वक्राकार होत पाठीमागे गेली होती. कदाचित शेवटच्या हस्तीदंती टोकांमुळे तो विश्वविक्रमी ठरली असती.

या कुडूची शिकार करायची मला अनिवार इच्छा झाली. झटकन् उठून बंदूक घ्यावीशी वाटायला लागली. तसं करणं शक्य नव्हतं, कारण काडतुसही बदलायची होती. छोटीं पाणबदकं मारण्यासाठी म्हणून मी बंदुकीत पाच नंबरची काडतुसं घातली होती. आता प्रथम तंबूवर टांगलेला काडतुसाचा पट्टा आणणं भाग होतं. तो तगडा, देखणा कुडू माझ्याकडे एकटक बघत होता, तेवढया २–३ सेकंदातच माझ्या मनात हे सगळे विचार डोकावून गेले. तो जाईपर्यंत निस्तब्ध पडून रहावं आणि मग बंदूक भरून त्याचा पाठलाग करावा लागेल हे मीं ओळखलं.

पारध करण्याची उत्कट इच्छा मी कधीच अनुभवली नव्हती. या जगात आता तो कुडू आणि मी सोडून कशाचंच अस्तित्व उरलं नव्हतं. प्राण्यांची हत्या करण्यात मला कधीच आनंद वाटला नव्हता, पण शिकारीत मजा यायचा. चालायला लागल्या-

पासूनच मी शिकार आणि मासेमारी करत आलोय. पण हा बेगुमनापणे उभा ठाकलेला तो कुडू बघून पूर्वी कधीच न अनुभवलेली अशी रानवट उर्मी उफाळून आली. मी झपाटून गेलो. तो कुडू म्हणजे माझ्यासाठी केवळ विश्वविक्रमी आकार वा शिंगे असलेला प्राणी नव्हता.

ते सौंदर्य, त्या सौंदर्याचा ठेवा मला भावला. ते मिळवावं, दो हातांनी धरावं, जवळ ठेवावं असं वाटू लागलं. मला त्याच्यात जिवंत प्राण्याऐवजी काहीतरी अद्भुत जाणवायला लागलं. मरणही याचा रुबाब हिरावून घेऊ शकणार नाही याची खात्री पटली. याचा देह म्हणजे हाडा-मासाचा फारतर हजार पौंडी गोळा. पण माझी स्मरणशक्ती जोपर्यंत शाबूत असेल तोवर कधीही मी याला विसरू शकणार नाही. मी याची शिंगं जपून ठेवीन आणि ती मला कायम या क्षणाचं स्मरण देतील. मला त्याचं मास, शिंग किंवा रुबाब हवा म्हणून केवळ मी त्याला मारणार नव्हतो. गेले कित्येक दिवस मी रोज प्राणी मारत होतो, त्यांचे मास खाऊन झाले की त्यांना विसरत होतो–पण हा रुबाबदार कुडू–हा कधीच मरणार नाही. या देखण्या, तगड्या कुडूने माझ्या जीवाला वेड लावलं. त्याला बघताच मी वयाच्या बाराव्या वर्षी जर्मनीतल्या ब्लॅक फॉरेस्टमध्ये केलेला हरणाचा पहिला पाठलाग मला आठवला. लॅपलॅंडमध्ये मारलेले हरीण आणि मूस आठवले. म्हणूनच मला या कुडूला मारण्याची अनिवार इच्छा झाली असावी, तो मला गवसणार नाही म्हणूनच कदाचित माझ्या हातात टेलिस्कोप असलेली दणकेबाज बंदूक असती तर गोष्ट वेगळी. मी, मग कदाचित गोळी झाडलीही नसती. पण माझ्याकडे फक्त शॉटगन होती आणि सावज हमखास पाडण्यासाठी वीस यार्ड जवळ जाणे कठीण होते.

पारध म्हणजे अनवट जंगलातून, रानोमाळ भटकणे, काट्या–कुट्यातून सरपटत चिखल तुडवीत जाणे. पारध म्हणजे डास, माशांच्या झुंडी, धूळ–वारा–भाजते उन आणि गोठवणारी थंडी यांना अंगावर घेणे. हे सगळं भोगण्यातच शिकारीची मजा असते. मला कुडू मारायचा होता, पण त्याचा आनंदोत्सव साजरा करायचा नव्हता. मला त्याला मारायचा होता कारण मी त्याचा आशिक होतो.

माझा कुडू पुढे सरकला आणि त्याचे अर्धे शरीर झुडपाआड गेले. तसे त्याचे डोके माझ्यासमोर आले. त्याच्या नाकपुड्या वाऱ्याचा मागोवा घेत होत्या. पण वारा सरळ माझ्या दिशेला होता. कुडू सावध झाला होता, पण त्याला माझा वास आला नव्हता. काहीतरी वेगळं आहे, पण नक्की काय, ते त्याला समजत नव्हतं. यापूर्वी त्याने मनुष्यप्राणी बघितलेला असता, तर मला पाहताच तो कधीच चौखूर उधळला असता, नाहीसा झाला असता. पण तो ३० यार्डावरून माझ्याकडे पहातच राहिला होता. त्याच्या धुळभरल्या गडद कातड्यावर हलकेसे उभे पट्टे होते. सूर्य बरोबर त्याच्या समोर होता आणि मी सावलीत स्तब्ध पडली होतो. त्याने माझा तंबू नक्की पाहिला असावा. तो सरकत माझ्याजवळ आला. हे काहीतरी चमत्कारिक आहे आणि

ते बघायलाच हवं अशी उर्मी त्याच्या मनात आली असावी. मीं श्वास रोखून धरला. माझा वास न घेता, केवळ २० यार्डांवरून तो दिमाखदारपणे खाडीकाठच्या उथळ पाण्याकडे गेला. झुडपाआड जाण्यापूर्वी तो थबकला. मान वळवून वारा हुंगत राहला. पाण्यापाशी जाण्याआधी त्याच्या सुंदर, वक्रावर अणकुचीदार शिगांना हलकासा झोका बसला. मला आता तो दिसत नव्हता. पण तो आता त्या उथळ पाण्यात तहान शमवायला जाणार हे मला माहीत होतं.

मीं बंदूक उचलली आणि सरपटत तंबूकडे काडतुसांचा पट्टा आणायला निघालो. मीं पाच नंबरची काडतुसं काढली तेव्हा, माझे हात कापत होते. उजव्या नळीत मीं १२ गेजचे 'बिग बॉस' काडतूस घातले, दुसरीत विंचेस्टर सुपरस्वीट ०० बक् घातले. मग पट्ट्यातील इतर गोळ्या मी चाचपून बघितल्या आणि काही क्षणांपूर्वी कुडू ज्या दिशेला गेला, तिकडे सरपटत निघालो. सुमारे १० यार्ड गेल्यावर कुणी तरीं पहातंय अशी मला जाणीव झाली. मी वळून बघितलं. तर कुडू पहिल्यांदा जिथं उभा होता तिथे दोन इंपाला हरीणं उभीं होती. ती सगळा वेळ माझं निरीक्षण करत होती. आरशासमोर हातवारे करताना पकडला गेल्यावर लहान मुलाची होतात. तशी माझी कानशिलं गरम झाली. पळा पळा, मी हळूच कुजबुजलो, कुडूला ऐकू जाईल या भीतीने मीं मोठ्यांदा बोलू शकलो नाही. त्यांना पळवण्यासाठी मी अर्धवट उभा राहिलो. पण त्यांना पुढचा 'शो' बघायची उत्सुकता होतीं. आता परिस्थितीं गमतीची पण तितकीच वैतागाची झाली होतीं. इतके निरागस प्राणीं मीं कधीच पाहिले नव्हते. ते पाहून मला एका व्यंगचित्राची आठवण झाली. त्यात एक शिकारी नराला मारण्यासाठी एका हातात बंदूक धरून दुसऱ्या हाताने माद्यांना बाजूला सारत होता. मी या इंपालांना हुसकू शकत नव्हतो कारण मग कुडू पळाला असता. आता सरपटत जाण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. मी जवळ जाताच, ती हरणं वळून निघाली. नराने वळन फिस्कारून माझ्याकडे पाहिले. तो आवाज ऐकून कुडू कुठल्याही क्षणी धावत येण्याची शक्यता होती. पण एकतर तो कुडूचा पणजोबा ठार बहिरा असावा, त्याला अजिबात वास येत नसावा. किंवा भीती म्हणजे काय हे त्याला माहीत नसावे. पण पाणी पिण्यावाचून त्याला कुणीही परावृत्त करू शकत नव्हते.

'तो जर अजिबात घाबरणार नसेल, तर मी वाऱ्याच्या दिशेने जाईन' मी मनाशी विचार केला. मग तरीं नक्कीच त्याची घाबरगुंडी उडेल. पण आता वाऱ्याची दिशाही बदलली आणि मी त्या बाजूने जाऊ शकत नव्हते. आता दबा धरूनच बसायला हवं होतं. कुडू डावीकडे वळू शकत नव्हता कारण त्या बाजूला उभी दरड होती. आणि मगरींनी खचाखच भरलेली नदीही पार करू शकत नव्हता. आता कुडू समोर दोनच मार्ग होते. एक म्हणजे आलेल्या मार्गाने परतणे, पण ती शक्यता कमीच होती. झाडा–झुडपांच्या दाटीची त्याला शाश्वती वाटणार नाही याची मला खात्री होतीं. मग उजवीकडे वळून खडीच्या पट्ट्याच्या कडेने तो झुडपाकडे जाईल असं

मला वाटलं.

पण आला त्या दिशेनेच परतला तर काय करायचं ? तसं केलं तर ओहळाच्या मोकळ्या भागातून परतणंच त्याला शक्य होतं. मग या मोकळ्या जागीच बसलं तर. माझ्या मनात लखकन् विचार चमकून गेला. मी तंबूतून स्लिपींग बॅग ओढून घेतली आणि त्यावरून सरपटत ओहोळाकडे निघालो. बॅगमध्ये काही काटक्या-काठ्या घालून मी ती कुंपणासारखी मोकळ्या जागेभोवती उभी करू शकणार होतो. बॅगेला जबरदस्त वास येत होता. या वासाने तो नक्कीच घाबरेल !

अचानक नदीच्या बाजूने वावटळ उठली. घळीत दूर गडगडाटाचे आवाज घुमले. आता लपत-छपत जाण्याची गरज नव्हती. मी धावतच नदीकाठच्या दुसऱ्या वरच्या भागाकडे गेलो. नेमका त्याच क्षणी सूर्यास्त झाला आणि उन्मळून पडलेल्या एका झाडाचा आडोसा मला मिळाला. माझा अंदाज बरोबर ठरला तर कुडू माझ्यापासून केवळ २० यार्डांवरून जाणार होता.

मी जेमतेम झाडामागे दडलो, इतक्यात तो कुडू नदीकाठाने येताना दिसला. तो माझ्या अंदाजाप्रमाणेच येत होता. आपला शिंगाचा काहीच भार नाही अशा ऐटीत तो येत होता. अजाणता माझं रक्त उसळत होतं. माझ्या तोंडाला कोरड पडली. मी आवंढा गिळण्याचा व्यर्थ प्रयत्न केला. जंगलाचा गंध, नदीचा नाद मला जाणवला, पक्ष्यांचा आवाजही येत होताच, दृष्टीला फक्त कुडूच दिसत होता. नदी सोडून आता माझ्या दिशेला वळला, भरली बंदूक आता झाडाच्या बेचक्यात सज्ज होती. तो आता ३० यार्डांवर होता आणि थेट माझ्याकडेच येत होता. मी त्याच्या छातीवर नेम धरला. बंदूक माझ्या खांद्यावर नीट विसावली होती. माझं हृदय धडधडत होतं. मी क्षणभर डोळे मिटले आणि हात कापत नाहीत ना याची खात्री केली.

' तो एकटाच आहे. त्याचा जनाना दुसऱ्या नराने बळकावला आहे, म्हणून तर तो एकटा आहे. ' मी डोळे उघडले तेव्हा तो आणखी जवळ आला होता. पुढे–पुढे सरकत होता. माझ्या समोरच एक झुडुप होतं. तो झुडपाच्या पुढे आला की गोळी घालायची !

तो झुडपाजवळ आला, क्षणभर थबकला. झुडपाची पानं ओरबाडली. आणखी पुढे आला. मी बरोबर छातीच्या मध्यावर नेम धरला आणि चाप ओढला कुडु ताठ झाला. स्तंभित होऊन पाहू लागला. त्याला गोळी लागली नव्हती. बंदुकीचा बार उडालाच नाही. मी गोंधळून चापाकडे बघितलं आणि काडतुस पेटलं. बंदुकीचा उलटा दणका बसला. कुडु क्षणभर मागे सरकला आणि उलटा वळून पळायला गेला तेव्हा खाली पडला. तरीही तो लगेच उठला आणि झाडीकडे धावत सुटला. मी दुसरा बार काढणार होतो, पण तोपर्यंत फार उशीर झाला होता. गवतावरून उडी मारताना तो परत एकवार पडला आणि मग लंबे पाय झाडत झाडीत पसार झाला.

सगळा थरार संपला होता. मला कसनुसंच झालं. मी त्याला बघितलाच नसता

किंवा जखमी केलाच नसता तर बरं झालं असतं. त्यांच्या खांद्यात गोळी घुसली होती. मी त्याला जखमी केलं होतं.

'त्याला शोधून काढलं पाहिजे, मला गेलंच पाहिजे, आठवडाभर लागला तरी हरकत नाही.'

मी बंदूक भरून त्याच्यामागे धावत सुटलो. एवढ्यात घळीतून वारा घोंघावत आला. इतका वेळ कुडुच्या नादात माझं आकाशाकडे लक्षच गेलं नव्हतं. झंझावात सुटला होता आणि जोराचा पाऊस सुरू झाला. मीं धावत जाऊन माझी स्लिपींग बॅग आणली आणि तंबत फेकली. तंबूतले मटणाचे वाळके तुकडे, वंदूक झाकण्यासाठी प्लॅस्टिकचा कागद घेतला. तंबू नीट बंद केला आणि निघालो.

घळीतून सूर्य केव्हांच नाहीसा झाला होता पण अंधार पडायला अजून–तास दीड-तास अवकाश होता. कुडु ओहळाच्या बाजूच्या दाट झुडपात मुसंडी मारून गला होता. पावसामुळे रक्ताचा माग वाहून गेला असला तरी चिखलात खुरांचें ठसे स्पष्ट दिसत होते. मी अगदी सावकाश आवाज न करता चाललो होतो. ओहळाचे पात्र रुंदावून खडीला सुरुवात झाली आणि त्याचा माग लागेना. मीं पावसात चिंब भिजलो होतो. काडतुसही भिजतील अशी भीती वाटत होती. पण मी काहीही करू शकत नव्हतो. अगदी तिन्हिसांजा झाल्या तरी मी बारकाईने पात्रात खुरांचे ठसे शोधत होतो शेवटी मला ते सापडले. पाऊस सपाटून पडत होता, त्यामुळे मला अगदी हळूहळू जावे लागत होते. ठसे एका उभ्या चढणीतून काटेरी जाळीकडे गेले होते. तिथून पुढे ते नदीपासून सुमारे ५०० फूट उंचीवरच्या पठाराकडे गेलेले दिसले.

वर पोहोचेपर्यंत माझी अगदी दमछाक झाली. मग मी एका खडकावर चढून बसलो आणि आजूबाजूला पाहू लागलो. या पठाराच्या तिन्ही बाजूला उंच–उंच दरडी होत्या. बाकी ठिकाणी दाट गवत आणि काटेरी गचपण होते. काट्यांमुळे मला जागोजागी खरचटले, ओरबडले होते. शर्ट फाटला होता. आता या गचपणातून पलीकडे जाणं मला अशक्य वाटत होतं. तरीही कुडु तसाच पलीकडे गेला असावा. आता पावसाचा जोर ओसरू लागला होता. झपाट्याने अंधार पडायला लागला. मी माघारी फिरायचं ठरवलं. आता तर सुरक्षितपणे तंबूकडे जाणंही शक्य नव्हतं. परत दुसऱ्या दिवशी हा चढ चढावा लागू नये म्हणून मी आहे तिथेच मुक्काम करायचा ठरवला. ओहोळाच्या मधोमध कोरडी आणि सुरक्षित जागा होती म्हणून मी त्या दिशेला निघालो. आता माझ्या अंगात कुडुचा माग काढण्याचं अजिबात त्राण नव्हतं. मी झुडपातून तसाच झोपण्याच्या जागेकडे निघालो. पण झुडपात इतकी दाट जाळी होती की मला वाटलं या झुडपातच आता रात्र काढावी लागणार. इतक्यात कसलीतरी खसपस झाली आणि एक प्राणी उडी मारून मी जाणार होतो, त्या दिशेने धावत गेला. हे सगळं इतकं अचानक घडलं की मला काही सुचलंच नाही. बंदुकीचा सेफ्टी लॅच काढून नेम धरेपर्यंत अंधुकशी आकृतीही दिसेनाशी झाली होती. आवाज

मला वाटलं.

पण आला त्या दिशेनेच परतला तर काय करायचं ? तसं केलं तर ओहळाच्या मोकळ्या भागातून परतणंच त्याला शक्य होतं. मग या मोकळ्या जागीच वसलं तर. माझ्या मनात लखकन् विचार चमकून गेला. मीं तंबूतून स्लिपींग बॅग ओढून घेतली आणि त्यावरून सरपटत ओहोळाकडे निघालो. बॅगमध्ये काही काटक्या-काठ्या घालून मी ती कुंपणासारखी मोकळ्या जागेभोवती उभी करूं शकणार होतो. बॅगेला जबरदस्त वास येत होता. या वासाने तो नक्कीच घाबरेल !

अचानक नदीच्या बाजूने वावटळ उठली. घळीत दूर गडगडाटाचे आवाज घुमले. आता लपत-छपत जाण्याची गरज नव्हती. मी धावतच नदीकाठच्या दुसऱ्या वरच्या भागाकडे गेलो. नेमका त्याच क्षणी सूर्यास्त झाला आणि उन्मळून पडलेल्या एका झाडाचा आडोसा मला मिळाला. माझा अंदाज बरोबर ठरला तर कुडू माझ्यापासून केवळ २० यार्डांवरून जाणार होता.

मी जेमतेम झाडामागे दडलो, इतक्यात तो कुडू नदीकाठाने येताना दिसला. तो माझ्या अंदाजाप्रमाणेच येत होता. आपला शिगाचा काहीच भार नाही अशा ऐटीत तो येत होता. अजाणता माझं रक्त उसळत होतं. माझ्या तोंडाला कोरड पडली. मी आवंढा गिळण्याचा व्यर्थ प्रयत्न केला. जंगलाचा गंध, नदीचा नाद मला जाणवला, पक्ष्यांचा आवाजही येत होताच, दृष्टीला फक्त कुडूच दिसत होता. नदी सोडून आता माझ्या दिशेला वळला, भरली बंदूक आता झाडाच्या बेचक्यात सज्ज होती. तो आता ३० यार्डांवर होता आणि थेट माझ्याकडेच येत होता. मी त्याच्या छातीवर नेम धरला. बंदूक माझ्या खांद्यावर नीट विसावली होती. माझं हृदय धडधडत होतं. मी क्षणभर डोळे मिटले आणि हात कापत नाहीत ना याची खात्री केली.

‘ तो एकटाच आहे. त्याचा जनाना दुसऱ्या नराने बळकावला आहे, म्हणून तर तो एकटा आहे. ’ मी डोळे उघडले तेव्हा तो आणखी जवळ आला होता. पुढे–पुढे सरकत होता. माझ्या समोरच एक झुडुप होतं. तो झुडपाच्या पुढे आला की गोळी घालायची !

तो झुडपाजवळ आला, क्षणभर थबकला. झुडपाची पानं ओरबाडली. आणखी पुढे आला. मी बरोबर छातीच्या मध्यावर नेम धरला आणि चाप ओढला कुडु ताठ झाला. स्तंभित होऊन पाहू लागला. त्याला गोळी लागली नव्हती. बंदुकीचा वार उडालाच नाही. मी गोंधळून चापाकडे बघितलं आणि काडतुस पेटलं. बंदुकीचा उलटा दणका बसला. कुडु क्षणभर मागे सरकला आणि उलटा वळून पळायला गेला तेव्हा खाली पडला. तरीही तो लगेच उठला आणि झाडीकडे धावत सुटला. मी दुसरा बार काढणार होतो, पण तोपर्यंत फार उशीर झाला होता. गवतावरून उडी मारताना तो परत एकवार पडला आणि मग लंबे पाय झाडत झाडीत पसार झाला.

सगळा थरार संपला होता. मला कसनुसंच झालं. मी त्याला बघितलाच नसता

मात्र एकू येत होता. कोणता तरीं मोठा प्राणी बिचकून उठला होता. नीट बघावं म्हणून मी ओणवं होऊन बघितलं तर एका जागी रक्ताचं थारोळं होतं. म्हणजे नक्की कुडुच इथे बसला असावा.

इथून पुढे जनावरांची मळलेली वाट गेली होती आणि तसंच पुढे ५०० यार्ड गेल्यावर ओढ्याचं मोठं सुकलेलं पात्र होतं पात्रात एका खोबणींत मऊ वाळू होती. तिथेच मी पसरलो.

रात्र तशी शांत होती. पण डासांना बरोबर माझ्या आगमनाचा पत्ता लागला आणि लगेच ते स्वागताला आले. थोड्याच अंतरावर कुणीतरीं प्राणीं अधून मधून घोरत होता. फक्त दुसरी काहीं चाहूल लागली की त्याचे घोरणे बंद व्हायचे. रात्रीच्या वेळी माकड आणि बिबट्याच्या आवाजातील फरक मला ओळखता यायचा नाही. दिवसा फरक ओळखण सोपे किंवा तसे वाटते तरीं. रात्री मात्र काहीच पत्ता लागत नाही. काही वेळा माकडं बिबट्याची नक्कल करतात तर काही वेळा बिबटे माकडांची. नीट झोप लागेना, मला सारखी तंबूची आठवण येत होती

पहाटे–पहाट मी परत मागावर निघालो. किमान डझनभर वेळा मी ओढ्यातून वरच्या अंगाला चढून बघायचो. पण खडक लागले की माग दिसेनासा व्हायचा. मी आणखी एका पठारावर चढलो. तिथून दोन्ही बाजूचे नीट दिसत होते. मटणाचे वाळके तुकडे खाऊन मी दिवस आणखी वर येण्याची वाट बघू लागलो. गिधाडांना जखमी कुडुचा बरोबर पत्ता लागेल आणि मग मलाही ते समजेल अशी मला आशा वाटत होती. दुपारी दोन गिधाडं आली पण न थांबता दुसऱ्याच दिशेने गेली. मग मी आशा सोडून दिली. आता खायला काहीं नव्हतं. शिवाय पाणीही जवळ नव्हतं. मी तंबूकडे परत निघालो.

शिकारीतला थरार आता पार संपला होता आणि मी अगदीं थकून गेलो होतो. कुडुबद्दल काय वाटलं आठवत नाही, पण स्वतःवर मात्र मी फार संतापलो होतो. कदाचित तो अपंग होऊन कणाकणाने मरेल, अपंग होऊन मरेल या विचाराने मला फार अपराधी वाटलं. मी कुडुची शिकार केली नाही, तर त्याच्यावर खुनी हल्ला चढवला असं मला वाटू लागलं.

तंबूत रात्र काढून सकाळी पुन्हा मी कुडुच्या शोधार्थ निघालो. बरोबर थोडं खायला, पाण्याची बाटली आणि काडेपेटी घेतली. दोन दिवस मी शोधत होतो पण पत्ता लागला नाही. उरलेल्या सर्व सफारीत मी स्वसंरक्षणार्थ वा मासाव्यतिरिक्त सोडून कधीही जनावरांवर बार टाकला नाही.

प्राणी वा पक्षी मारला की दरवेळी पोटभर मास मिळतच असं नाही, हा माझा अनुभव आहे. रंगीबेरंगी इंजिप्शियन बदकांबद्दल तर हा अनुभव बरेचदा आला. एकदा तराफ्यातून जात असताना एक बदक माझ्याकडे शाही थाटात बघताना दिसलं. निळसर पंख, हिरवे गर्द शरीर आणि मान लाल–पिवळी होती. त्याला

मारणं म्हणजे हातचा मळ होता. अगदी बाजारात जाऊन उचलून आणल्यासारखं. मी अगदी जवळून बार टाकला. नेम चुकणं शक्यच नव्हतं. गोळी बरोबर छातीत घुसली असावी, कारण पाण्यात लांब लांब टांगा टाकत कर्कश आवाज करत त्याने पळायला सुरुवात केली. सुमारे ३० यार्ड गेल्यावर त्याने पाण्यातून हवेत झेप घेतली आणि पुढच्या वळणावर ते दिसेनासे झाले. त्यानंतर ते मला कधीच दिसले नाही.

खूप दिवसांनी काही बदक दाटीने उभीं असलेली मला दिसली. मी तीन नंबरच्या काडतुसाने दोन्ही नळ्यांतून बार टाकले. पण फक्त एकच बदक जखमीं झाल्यासारखं दिसलं. थोडं अंतर उडत जाऊन ते पाण्यात पडलं. मीं परत बार टाकला. तो बरोबर लागला. पण ते तसंच फडफडत पुढ सटकलं आणि सुमारे १०० यार्ड तराफ्याच्या पुढे गेलं. मी तिथे जाऊन ते उचलणार एवढ्यात पाण्यात कसलीतरी खळबळ झाली आणि मगरीने माझ्या हातची शिकार पटकावली.

दोन दिवस मी इतका पागल झालो होतो कीं बदकं दिसलं तरीं बघून न बघितल्यासारखं करायचो. तरीही एकदा छोट्या सुळक्याआड अचानक बदक दिसल्यावर मी गोळी घातलीच. हे बदक मात्र मी मिळवलं. मात्र त्याची मान कापल्यावरच ते मेलं. त्याचं वजन अंदाजे ३० पौंड असावं. पण मारायला जेवढं अवघड तेवढंच खायलाही कठीण होतं.

एकदा मी बबून माकड मारायचं ठरवलं. तोपर्यंत अर्धा प्रवास झाला होता आणि खाण्यापिण्याचेही काही चोचले उरले नव्हते. शिवाय दारूगोळाहीं काटकसरीने वापरायला हवा होता. कारण काही वेळा अर्धा डझन गोळ्या खाऊनहीं रानडुक्कर पळून जात. त्या मानाने माकडं लवकर मरतात. म्हणून नदींच्या काठी पाण्यावर आलेल्या माकडावर मी बार टाकला. गोळी बरोबर लागली, पण बंदुकीचा सोडून इतर कसलाही आवाज आला नाही. मी ३० यार्ड खालीं तराफा लावून माकड घ्यायला आलो तर माझ्या आजुबाजूने भयंकर चित्कार ऐकू येऊ लागले. तीन बाजूंनी मला संतापलेल्या दणकट माकडांनी घेरले होते. त्यांच्या डोळ्यात सूडाची भावना दिसत होती. संतापलेली बबून माकडं म्हणजे काही चेष्टा नाही. अशा वेळी ते कोंडीत पकडून बिबट्यालाही मारतात. त्यांच्या लांब पिवळ्या सुळ्यांनी ते हात सहज फाडू शकतात. झाडांच्या हलणाऱ्या फांद्यावरून मी ओळखलं, आता ती अगदी जवळ आली आहेत. मीं बंदुकीत गोळ्या भरल्या पण आता मागे फिरणं एवढा एकच मार्ग होता. मी तसाच सुसाट मागे आलो, तरफ्यावर उडी घेतली आणि पाण्याच्या मध्यभागी गेलो तेव्हा कुठे जरा सुरक्षित वाटलं. मला वाटलं माकडं माझा पिच्छा सोडून आपल्या जखमी भाईबंदाकडे जातील, पण त्यांनीं काठावरून माझा पाठलाग सुरू केला. त्यांचे चित्कार ऐकून आणखी साथीदार त्यांना सामील झाले. पुढचे दोन तास हा पाठलाग चालू होता. मला माझीच गंमत वाटलीं.

नदी संथ गतीने वहात होती. आणि मी दोन तासात तीन मैलही गेलो नसेन,

एवढ्यात धबधब्याचा आवाज आला म्हणून मी तराफा काठावर घतला तर माझे 'पाठीराखे' हजर. मी तराफा दुसऱ्या काठाला घेतला तर तिथ दुसरी रिसेप्शन कमिटी हजर, मोठी माकडं धिप्पाड पहिलवानासारखी वाटायला लागली. पुढे काय करायचं याचा विचार करेपर्यंत प्रवाहाचा जोर वाढला आणि पुढच्या वळणावर मला नदीच्या मधोमध एक बेट दिसलं. आता पाण्याचा जोर इतका वाढला कीं आहे त्या जागीं तराफा नांगरणं शक्य नव्हतं. आणि बेटावरही जाता येत नव्हतं. डाव्या बाजूला एका प्रचंड खडकावर आदळून पाणी उसळत होतं. एका चिंचोळ्या पट्टीतून मी जेमतेम तराफा उजवीकडे घेतला, तेवढ्यात तो प्रवाहाच्या धारेत सापडला. आता वल्हवणं अशक्यच होतं. नदीत फेकला जाऊ नये म्हणून तराफ्यावरच्या दोरांना घट्ट धरून रहाणं एवढंच माझ्या हातीं होतं. उन्मळून पडलेल्या एका झाडाने मधेच प्रवाह थोपवला होता. त्यांच्या फांद्या पसरल्या होत्या त्या दिशेला जाऊन मी सरळ धडकलो. धडकेने फांद्या मोडल्या आणि तराफा जरा उचलला जाऊन अर्धा पाण्यात, अर्धा बाहेर असा गरगरत पुढे गेला. पुढे आणखी एक धबधबा आला आणि पात्रातल्या मोठ्या खडकांमुळे प्रवाह विभागला गेला. काय होईल ते होईल असा विचार करून मी तराफ्याच्या भरवशावर सर्व गोष्टी सोडल्या. दोनदा तराफा खडकाला धडकून उंच उडाला ! मला वाटलं आपला खेळ खलास ! पण तराफा सहीसलामत होता आणि पुढे निघाला.

पुढचे पाच मैल नदी दोन उंच दरडींमधून वेगाने वहात होती. मीं १५–२० मिनिटांत ते अंतर पार केलं. माकडं आता मागे पडली होती. त्यांनी माझा पाठलागही सोडला असावा. सुमारे तासाभराने मी किनारा गाठला आणि मुक्कामाची तयारी केली. यानंतर संपूर्ण प्रवासातच काय नंतरच्या आयुष्यात कधीही माकडांवर बार टाकायचा नाही. असा मी निश्चय केला !

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणे
भू-प्रवास
दा. क्र. ६८२
३६६६६
१९।८।८५
ग्रंथ. शाखा (स्थळ प्रत)

# सहा

'मला मी सहा वर्षांचा मूलगा असून हवाई हल्ल्यापासून बचाव करण्याच्या खंदकात बसल्यासारखं वाटत होतं. खूप थकलेला. घाबरण्याचंही त्राण नसलेला. शहरात सर्वदूर बॉंबस्फोटाचे आवाज येताहेत. जणू एखादा भयंकर राक्षस आजुबाजुला उत्पात करत अंगावर चालून येतोय– त्याचा घाला केव्हा, कुठे पडेल काही अंदाज येत नाही. स्फोटाचे आवाज जवळ–जवळ यताहेत. एक–दोन–तीन – आता आपली पाळी ! आवाज दूर गेला. पुन्हा आपण वाचलो. आवाज आणखी दूर-दूर चालला. आणि काही कळायच्या आतच थेट डोक्यावर स्फोटाचा दणका !'

□ □ □

मी किंचाळतच उठलो. मला जीव खाऊन पळायचं होतं. मग मला जाणवलं, मी तर तंबूत आहे. तंबूचा कॅनव्हास फडफडत होता. वारा दरीतून घोंघावत होता. बाहेर वादळ थैमान घालत होतं. मी जे ऐकत होतो तो विजांचा कडकडाट होता; पण मला बसल्या जागेवरून उठता येत नव्हतं. मी माझ्या स्लिपिंग बॅगवर झोपलो होतो. ती रक्ताने माखली होती. माझा शर्टही रक्ताने माखला होता. पण त्यावरचे रक्त सुकून तो अंगाला चिकटला होता. माझ्यावर हल्ला झाल्यावर काय-काय झालं, ते हळूहळू मला आठवू लागलं.

मी इथे कसा आलो ते काहीच आठवत नव्हतं. अजन मी स्वप्नात नाही ना ? आणि हे आठवणंही स्वप्नातलाच एक भाग –

माझे दोन्ही हात इतके जडशीळ झाले होते की या शरीराशी जणू त्यांचा संबंध नव्हता, मोठ्या मुश्किलीने एका हाताने मी बाजूला झालेल्या जखमा बघितल्या – परत एकवार गुंगी !

परत जेव्हा मला जाग आली तेव्हा उन्हं उतरली होती. मला आठवलं, मी ज्या दिवशी आलो त्या दिवशी एक कॅटफिश पकडून तंबुच्या बाहेर एका खांबावर टांगून ठेवला होता. त्याला आता प्रचंड मुंग्या लागल्या होत्या. का, देवजाणे तो मासा पाह्यला आणि मला धक्काच बसला. माझी सुस्ती उतरली. माशाच्या स्थितीवरून

मीं अंदाज केला की, बहुधा दोन दिवस बेशुद्धीत होतो. मला सणकून ताप भरला होता. एकाएकी तंबूत कसलीतरी दुर्गंधी जाणवायला लागली. बेशुद्धीतच मला हग-वण सुरू झाली होती, मीं घाबरत घाबरत शर्ट ढिला केला. जखम सुजून काळी-निळी होऊन चिघळली होती.

आता पुढे काय ? अंधुकशी जाग – बेशुद्धी – परत जाग – ग्लानी – एवढंच जिणं आता बाकी होतं. हात-पाय कसे हालवायचे, डोकं कसं ताळ्यावर आणायचं – सुचत नव्हतं. जणू नसा कापलेल्या असताना बोटांची हालचाल करण्याचा प्रयत्न करावा. मेन्दूला ताण दिला तरी शरीराला यातना व्हायच्या. मी पार हबकलो होतो. माझं सर्वांग पोटात जमा झालं होतं. पोट दुप्पट फुगल्यासारखं वाटत होतं. मी चुपचाप पडून होतो. जे घडलं त्यावर माझा विश्वासच बसत नव्हता. मी नशीबानं हल्लेखारांच्या तावडीतून सुटलो होतो. पण जखमांच्या तापाने आडवा झालो होतो. औषध-पाण्याशिवाय या खोऱ्यातून बाहेर पडण्याची सुतराम शक्यता नव्हती.

मला धड काहीच आठवत नाही, मला परत झापड आली की मी जागा असून भीतीने अर्धमेला झालो. परत जेव्हा जाग आली तेव्हा मात्र निर्धाराने मी भीती गुंडाळून ठेवली ! कसाबसा पाण्याच्या बाटलीपर्यंत पोहोचलो. पाणी निर्जंतुक कर-ण्यासाठी क्लोरीन, पोटॅशिमय परमँगनेटचा तुप्पट-तिप्पट डोस त्यात घातला. मी तहानेला होतो. अर्धी बाटली पाणी प्यायलो आणि बाकी पाणी टॉवेलवर ओतून जखम गच्च भिजवली. काही वेदना जाणवत नव्हत्या, मी काळजीपूर्वक शर्ट काढला आणि सुकलेले रक्त धुवून काढले. बोटांची जखम उघडली. जेवढी ताणता येईल तेवढी ताणली आणि आत आयोडिन ओतले. त्यावर पेनिसिलीन पावडर टाकली. मुशाफिरीच्या सुरुवातीलाच स्थानिक लोकांनी माझी औषधं पळवली होती, त्यामुळे फक्त यावरच निभावणं भाग होतं. या एवढ्याशा हालचालीनेही मला प्रचंड थकवा आला. पण मनाला बरं वाटलं. (नंतर कळलं की हा उपाय जखमेपेक्षाही जालीम ठरला असता !) हाताला तात्पुरतं बँडेज बांधून झाल्यावर मी घाणेरड्या स्लिपींग बॅगसह सर्व कपडे गुंडाळले आणि तंबूच्या बाहेर टाकले. अंधार पडला. क्विनाईनचा दुप्पट डोस घेऊन मी उरले–सुरले मास पोटात ढकलायचा प्रयत्न करू लागलो. पण मला ते सोसवेना. मध्यरात्रीपर्यंत मी तळमळत होतो

केव्हातरी डुलकी लागली असावी. अर्धवट जाग आली तेव्हा तंबूजवळच आर्त स्वरात कुठलातरी पक्षी ओरडत होता. मला त्या हल्लेखोरांची आठवण आली. काय झालं असेल त्यांचं ? दोघांना मी जखमी केलं होतं, त्यामुळं ते माझ्या मागावर आले नसावेत. पण बाकीचे ?

परत ते मला गाठायचा प्रयत्न करतील ? त्यांना माहितीय मी जबर जखमी झालोय ते. कदाचित आणखी काहीजण त्यांना येऊन मिळाले असतील आणि हल्ल्याच्या जागेपासून त्यांनी माग काढायला सुरुवात केलीही असेल. माझ्या सुटकेनंतर काय

काय घडलं ते ओझरतं आठवतंय.

रविवार ५ फेब्रु. १९६०. घळीत येऊन मला पाच आठवडे लोटले होते. तरीही एकदाही आदिवासींची आमने-सामने गाठ पडली नव्हती. माझे सर्व सामान लंपास झाल्यापासून माझा त्यांना मागमूस लागू नये म्हणून मी आटोकाट प्रयत्न करायचो. त्यानंतर बहुतेक वेळा प्रत्यक्ष प्रवास करताना वा मुक्काम आवरून निघताना जरूर पडली तर बार काढत असे. म्हणजे समजा बंदुकीच्या आवाजाच्या रोखाने आदिवासी आलेच तर त्यांना मी सापडू नये. मी मुक्कामही अगदीं आडोशाला करत असे आणि छोटी-विनधुराची शेकोटी पेटवीत असे.

रविवार मी नदीकाठी जंगलात साजरा करायचो म्हणजे नेहमीपेक्षा दिनचर्या बदलायचो. नेहमीप्रमाणे लवकर उठायचो नाही तर तंबूच्या कॅनव्हासमधून सूर्यकिरण चांगली झिरपली, जंगलातून पक्षी-माकडांची धून टिपेला पोहोचली कीं मगच जरा डोळे उघडायचे. नाश्ता बनवून लगेच चंबुगबाळं न आवरता मीं तसाच पडून रहायचो. नुसतं आळसावायला मझा यायचा !

५ फेब्रु. ला मी जिथे पडाव टाकला होता, तिथं नदीचे पात्र चांगले रुंद आणि संथ होते. पैलतीरावर घनदाट झाडी असलीं तरीं ऐलतीरावर मात्र हलकिशी हिरवळ होती. समोरच्या सुळक्यांच्या पल्याड सूर्य होता. त्यामुळे त्यांच्या नुसत्या काळचाकभिन्न आकृत्याच जाणवत होत्या. पाच सुंदर इजिप्शियन बदकं एका झोपलेल्या मगराजवळून तरातरा चालत गेली. त्यांची ही मजा बघत मी मस्तपैकी पडून होतो. हे अस्पर्श सुख उपभोगणारा मी पहिलाच मानव प्राणी आहे ही जाणींव फार सुखद होती. हा स्वर्ग नाही तर सावज साधायची सुंदर जागा आहे याची जाणीवही मला होतीच.

आदल्या दिवशी मी आलो तेव्हा हे सगळं इतकं निरामय, स्वर्गीय नव्हतं. मी पिशवीतून माझीं डायरी काढली आणि आधींच्या दिवसाचीं नोंद केली केली. मुक्काम २१ फेब्रु. ४, १९६०. एकदा पाणघोड्याचा आणि दोनदा मगरीचा हल्ला. हे जरा जास्तच झालं—

मगरीच्या हेतूबद्दल संशयच नव्हता. उतारावरून सूर मारून ती नदीत झेपावली आणि सरळ माझ्या तराफ्याकडेच आली. मग ती नेहमीप्रमाणे नाक फेंदारून काही वेळ रेंगाळली आणि सपासप पाणी कापत आली.

आतापर्यंत असा थेट हल्ला कधी झाला नव्हता. त्यामुळे काय करावं सुचेना. पण मी काही करूहीं शकत नव्हतो. जबडा वासून मगर अगदी तराफ्यापर्यंत आली आणि एकदम माघारीं फिरलीं.

परत तसंच. मग भरीस भर म्हणून आणखी दोन मगरी जबडा वासून आल्या. त्यांनी आपसात काय संदेश पाठवले देव जाण पण तिघी पात्रात वेगवेगळ्या जागीं, पण एकदम उपटल्या. तीत जबडा वासलेल्या जबरी मगरीच्या गराड्यात मी आणि

माझा तराफा. व्वा ! नामी दृश्य होते. साल्या लौकर डुबकीही घेईनात. एकीने डुबी मारली, पण दुसऱ्या दोघी ढीम. उलट तराफ्याखालून झटके बसायला लागले. दोन ओंडक्यांच्या फटींतून मगरीचे कातडे दिसायला लागले. थराकून मी बंदूक काढली आणि ५ नंबरच्या काडतुसाने बार काढला. बंदुकीची नळी जवळ-जवळ मगरीला टेकली होती. योग्य तो परिणाम झाला. सगळ्या मगरी गायब !

पण पनवती एवढ्यानेच संपली नव्हती. माझ्या कॅंपपासून दोनश यार्डावरच एका येड्या पाणघोडीने मला जवळ जवळ जलसमाधीच दिली असती. मी तराफा संथ गतीने घेऊन यत होतो तो पुढच्या वळणावर दोनशे मीटर अंतरावर मला आठ पाणघोडे दिसले. ते मला नवीन नव्हते. पण मला बघून ते अस्वस्थपणे या किनाऱ्या-वरून त्या तीरापर्यंत ये–जा करत धडपडू लागले. नक्की कोणता तीर गाठावा याबद्दल त्यांचा निश्चय होईना. आपण गावात शिरलो की गाडीच्या वाटेत कोंबड्या गोंधळ घालतात ना अगदी तसंच. पाणघोड्यांचा बेत अजूनही ठरेना. आता अंतर कमी होऊ लागले तसा मी माझा विचार बदलला. पाणघोड्यांची धावपळ नुसती बघण्यात अर्थ नव्हता कारण पाणघोडे आणि कोंबड्या यांच्यात फरक आहेच.

आता कोणी कोणाला वाट द्यावी हा सवाल होता. की आपणच नांगर टाकून थांबावं ?

पाणघोड्यांनीच काढता पाय घतला. तिघे डाव्या किनाऱ्यावर गेले तर पाच जण उजव्या तीरावर. त्यांना कसलीही घाई नव्हती. पण माझ्या आगमनामुळे ते वैतागले असावेत. कारण ते सारखे मागे वळून बघत होते. तराफाही हलके हलके त्यांच्याच दिशेने चालला होता. सुदैवाने प्रवाहाला फारसा जोर नव्हता.

नदीमध्ये तराफ्याचं नुकसान करू शकणारा एकमेव प्राणी म्हणजे पाणघोडा शिवाय त्याला मगरीचीही डर नव्हती. मगराने जर त्याची खोड काढलीच तर आपल्या अक्षरश: प्रचंड जबड्याने तो मगराची क्षणार्धात दोन कांडक करू शकेल. प्राणी संग्रहालयात गजाआड हा अजस्र प्राणी बघणं आणि नदीच्या पात्रात हे महाकाय धूड बघणं यात फार फरक आहे. मी बंदूक काढून नुसता हवेत बार काढण्याचा विचार करत होतो, पण बेत बदलला. कारण आवाजाने त्यांची पांगापांग झाली असती आणि या गोंधळात कदाचित ते माझ्या तराफ्यावर आदळले असते. मी तसाच त्यांच्या दिशेने जात राहिलो.

अचानक एक पाणघोडा उलटा फिरला आणि हल्ल्याच्या आवेशात येऊ लागला. ती पाणघोडी असावी. हल्ला करण्यापेक्षा तिला पलिकडच्या तिघांकडे जायचे असावे किंवा तिच्या पिल्लाच्या संरक्षणार्थ ती धावली असेल. काय असेल ते असो पण आपला प्रचंड जबडा वासून सुस्कारत ती माझ्या दिशेने येत होती. मी आतापर्यंत पुष्कळ पाणघोडे बघितले होते, पण ते एकतर सुस्तपणे बघत किंवा दुर्लक्ष करत म्हणून अगदी मट्ठ वाटायचे. पण अशी चाल करून येणारी पाणघोडी मी बापजन्मात

बघितली नव्हती. तिला थोपविणारे अलम् दुनियत आता काही नव्हते. ती क्षणभर घुटमळली आणि परत फेसाळत्या पाण्यात ती अशी मुसंडी मारून आली– तराफा जेमतेम दोन–चार इंचांनी बचावला.

मी तराफ्यावर पालथे पडून हाताने दोर गच्च पकडून ठेवले होते. आता कुठल्याही क्षणी दणका बसणार. एक यार्ड–दोन–तीन तराफा तरंगत होता. ती पाणघोडी परत आली नाही. सुमारे २०० यार्ड खाली गेल्यावर मी तराफा किनाऱ्यावर लावला. जरा दम खाल्ल्यावर मुक्कामाचे सामान–सुमान काढायला सुरुवात केली. आराम करण्याएवढे प्रयास नक्कीच पडले होते.

सूर्याची स्थिती बघता सकाळचे साडेनऊ वाजले असावेत. दुपारच्या जेवणासाठी मी गळ घेऊन नदीवर निघालो. गळाला रात्रीचे उरले–सुरले मांस लावले होते. दरवेळी गळ तळाला जायचा, पण मासा काही गावायचा नाही. मी बंदूक ठेवून आलो होतो. काही मिळालं तर बघावं म्हणून मी बंदूक आणायला तंबूकडे निघालो. बघतो तो, तंबूच्या वरच्या सुळक्यावरून चार व्यक्ती माझ्याकडे पहात होत्या.

चार आदिवासी तिघे तिशीचे आणि एक विशीतला असावा. इतक्या दिवसानंतर दुसरा मनुष्य प्राणी बघून मला आनंद झाला. इतका की इथले आदिवासी, त्यांची कीर्ती–कहाण्या, स्वानुभव मी पार विसरून गेलो. मी नाचत हातवारे करत त्यांना खुणावू लागलो. तेही उतरून खाली आले. ते गाला जमातीचे होते. प्रत्येकाकडे भाला, धनुष्यबाण, सुरा होता. एकाच्या पाठीवर ठोसमार बंदूकही होती. प्रत्येकाच्या अंगावर 'शमाब्द' नावाचा पारंपारिक पोशाखही होता. खरं तर राखाडी रंगाचे तुकडे म्हणणं जास्त योग्य. आम्हाला एकमेकांची भाषा येत नव्हती. पण त्यांना दोस्ताना करायची इच्छा दिसली. माझी हत्यारं बघायची त्यांची इच्छा दिसली. काय हरकत आहे ? मी त्यांना तंबूकडे घेऊन गेलो. तंबू अजून बंद होता. केवळ कॅमेरा, भांडी-कुंडी आणि काही नकाशे बाहेर होते. ते तिथे आपसात बोलत, प्रत्येक गोष्ट चाचपून बघत होते. माझ्या दाढी वा केसांचे त्यांना नवल वाटले नसावे, पण निळी जीन आणि खाकी शर्टाची नवलाई होती. गोऱ्या माणसाविषयी त्यांनी थोडे–बहुत ऐकले असावे. पण जिता जागता गोरा माणूस ते प्रथमच पहात असावेत. अगदी सावधपणे पण काहीसे लाजत ते माझे हातपाय चाचपडून बघत होते. एकाने तर चक्क शर्ट वर करून आत काय आहे ते बघून घेतले !

त्यांचे सुरुवातीचे कुतुहल संपले आणि त्यांनी ठिय्या मारला. त्यांच्या नजरेत संशय नव्हता तर आत्मविश्वासत होता. जणू मी त्यांच्या प्रदेशात घुसखोरी केली आहे आणि ते मला जाब विचारताहेत. मी अम्हारिक भाषेतले काही शब्द पाठ करून ठवले होते कारण इथिओपियात सर्वत्र तीच अधिकृत भाषा आहे, पण यांना त्यातला एक शब्द कळेना. उलट ते त्यांच्या बोलीत मला काहीतरी सांगू लागले. मला समजेना तसा त्यांनी आवाज चढवला. भाषा न समजणे आणि ऐक न येणे

यातला फरक बहुधा त्यांना समजत नसावा.

माझ्याजवळचे काही गळ मी बाहेर काढले. त्यांनी बहुधा कधी गळ पाहिले नसावेत आणि याचे नेमके काय करावे त्यांना समजेना. मग मी त्या दोरीला गाठ घातली, एक हुक अडकवला आणि हातवारे करून नदीच्या दिशेने बोट दाखवून गळ टाकल्याचा आविर्भाव केला. तेव्हा त्यांच्या डोक्यात थोडा प्रकाश पडला असावा. मी प्रत्येकाला एक हूक बक्षीस दिला आणि हुकाच्या बदल्यात खायला मागू लागलो. पण कसले काय ! एकतर त्यांच्याकडे खायला काही नसावे. किंवा त्यांना नीट समजत नसावे. त्यांच्या चेहऱ्यावरून त्यांच्या मनाचा काहीच थांगपत्ता लागत नव्हता. वैतागून मी त्यांना आणखी काही हुक्स आणि दोरी दिली. त्याचा त्यांना आश्चर्य न वाटता, आनंद वाटला. मला सुरुवातीला वाटले त्यापेक्षा ते भलतेच हुशार असावेत.

मी काल रात्री जमवलेल्या काटचाकुटयांचा ढीग केला आणि माचिस काढून तो पेटवला तेव्हा तर त्यांच्या आश्चर्याला पारावर उरला नाही. मी त्यांना पाच काड्या दिल्यावर त्यांनी एका पाठोपाठ त्या पेटवायला सुरुवात केली. शेवटी त्यांना थोपवावे लागले. मग मी कॉफी उकळली, मगात ओतली आणि जोरदार घोट घेऊन तो मग त्यांच्यापैकी एकाच्या हातात दिला. कॉफी त्यांना नवीन नसावी. कॉफी मूळची इथिओपियाचीच आहे आणि अजूनही जंगलात कुठे कुठे कॉफीची झुडपं आढळतात. माझी अमेरिकन कॉफी त्यांना कशी भावते याची मला उत्सुकता होती. त्यांनी निमूटपणे घोट–दोन घोट कॉफी प्याली. पण तिसऱ्याने ती सरळ जमिनीवर ओतून दिली.

मग एकजण उठला आणि कॅमेऱ्याशी खेळू लागला. मी तो परत घ्यायला उठलो तर तो रागावला. अखेर इतरांनी काहीतरी सांगितल्यावर त्याने नाखुशीनेच तो परत केला. एकाने माझ्या कमरेच्या सुऱ्याला हात घातल्यावर मात्र मी पटकन बाजूला झालो. प्रथम ते बुजत होते, पण एकदा भीड चेपल्यावर ते हट्टाला पेटले; आणखी झटू लागले.

मी अस्वस्थ झालो. कारण सुरवातीला ते दोस्तीत वागत होते. पण आता आडदांडपणा करू लागले. अधून मधून बोलायचे, पण तसा त्यांचा चेहरा मख्खच होता. या निर्जन घळीत कोणीतरी मनुष्य–प्राणी भेटावा अशी मनोमन इच्छा होती, पण आता ही बला केव्हा टळते असे झाले ! आमचं संभाषण म्हणजे हसणं, पण जन्मभर तुम्ही तोंड वेंगाडून हसू शकत नाही.

ते हलायची चिन्हे दिसेनात. त्यांच्याकडून खायला मिळायची आशाही मावळली. मी दुपारच्या जेवणाची सोय करायला उठलो. मी बंदूक घेतली नाही. ( कदाचित त्यामुळेच माझा जीव वाचला असेल ! ) तर नदीकाठी मगाशी जिथे गळ लावले होते तिथे गेलो. तिथून तंबू आणि तिघेही दिसत होते. दोन्ही गळाला कॅटफिश लागले होते. मी सुऱ्याने त्यांची मुंडकी उडवली आणि माघारी फिरलो.

आदिवासी अचंब्याने माझ्याकडे आणि माश्यांकडे आलटून पालटून बघत होते. काहीतरी कुजबुजत होते. पण कुणीही जागा सोडली नाही. शेवटी मीच मासा उंच धरून सलाम ठोकला. एकाने हसून थोडा प्रतिसाद दिला. मी बाजूच्या मोडक्या झाडावर मासे टांगले आणि त्यांचे तुकडे करायला म्हणून सहज जाऊ लागलो.

अचानक एक आदिवासी उभा राहिला आणि माझ्या जवळ येऊन पायाच्या दिशेने काहीतरी खुणावू लागला. माझ्या पायात बूट होते. ते अनवाणी होते, म्हणून बूट मागत असावेत असं वाटलं. परत पायाच्या दिशेने बोट दाखवत तो काहीतरी सांगू लागला. बघता-बघता त्याचा आवाज चढला. माझे लक्ष विचलित करण्याचा त्याचा हेतू असावा. एकाएकी मला जाणवलं मला त्यांनी घेरलं आहे. ते माझ्या जवळ जवळ सरकत आहेत. त्यांच्यातील एकजण खाली वाकला आणि माझा पाय खेचून त्याने मला खाली आपटले. मग झटापटीला सुरुवातच झाली. दुसऱ्याने मला मागून विळखा घातला तर एकाने बंदुकीचा दस्ता माझ्या डोक्यात हाणायला उगारला. चौथ्याने माझ्या खांद्यावर दणका दिला. त्या फटक्याने माझा डावा हात लुळा पडला आणि जाणवलं आता आपला खातमा ! इतक्यात समोरच्याने सुरा काढलाच. मी इतका भयचकीत झालो होतो की नो ऽ नो म्हणत मी कसाबसा वार चुकवला तरी माझ्या डाव्या कुशीत काहीतरी घुसलेच. वेदना जाणवली आणि नुस्ती आग-आग ! पण सुरा उपसून काढला तेव्हा तो चांगलाच खोलवर गेल्याचे समजलं. मरण एवढं सोपं! माझं मलाच कळेना. जखमेतून रक्त वहात असावं. शर्ट तांबडा भडक झाला होता. सगळं इतक्या क्षणार्धात घडलं होतं की काही सुचेना. सुरा परत लखलखला आणि मी ओळखलं, ज्याला मघा गळ दिला तोच हा !

हे तर मुंडकी मिरवणारे ! माझ्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. आता तर पुरतीच फाटली. अर्थात एकदा मेल्यावर मुंडकं काय अंगठा काय—पण खुन्नस चढला. मला धरून ठेवलं होतं. त्याला कडकडून चावा घेऊन मी सुटका केली. सुरेवाल्याला एका लाथेत लोळवला ( फिल्मी स्टाईल ! ) आणि माझा सुरा काढून हवेत सपासप वार करू लागलो. आता अंगात वीरश्री संचारली होती. स्वतःच्या प्राणासाठी नाही तर आदिवासींनी माझ्यावर मात केली म्हणून. गोऱ्या माणसाचं मुंडकं म्हणजे ते मोठेच हिरो बनणार होते. तेही माझ्या जीवावर ( मुंडक्यावर ! ) ते पुन्हा जवळ सरकताच मी त्यांच्यातला एकाला पुन्हा लोळवला. दुसरीकडून अंगावर उडी घेऊन मी त्याच्या पोटात सुरा खुपसला. तो खाली कोसळताच बाकीचे क्षणभर मागे सरकले आणि तो मोका साधून बंदूक घ्यायला मी तंबूकडे सुसाट सुटलो. मी बंदूक घेऊन आलो तेव्हा ते जखमी साथीदाराला ओढून नेत होते. त्यातले दोघे परत उलटे फिरले. एकाने ठोसमार माझ्यावर रोखली होती. मी अंदाजाने दोन बार टाकले. निशाणा साधला होता की नाही देव जाणे, पण ते दोघे आडवे झाले आणि धडपडत आजूबाजूच्या झुडपात नाहीसे झाले. एकाएकी जंगलात कोलाहल माजला. पक्षी

चित्कार करू लागले. त्यांच्यापैकी कुणीतरी व्हिवळत होता. मी परत बार भरला.

हळूहळू शांतता झाली. सन्नाटा. जीवघेणी शांतता. मी जीवाचा कान करून चाहूल घेत होतो. पण ते गेल्या दिशेने कसलाही आवाज येत नव्हता. जर सलणारी जखम नसती तर सगळच एखाद्या दुःस्वप्नासारखं वाटलं असतं. मी झाडाच्या आडोशाला बसलो. ते आदिवासी जर परतले तर लांबूनच मोका साधतील याची खात्री होती. केवळ दैवयोगानेच मी त्यांच्या तावडीतून बचावलो होतो.

त्यांचे धनुष्यबाण–भाले वगैरे माझ्या तंबूच्या आसपास पडले होते. मी त्यांचे तुकडे तुकडे केले. जाताना ते फक्त सुरे आणि ठोसमार बंदूक घेऊन गेले होते. त्यांच्याकडे बंदुकीची पावडर तरी होती की नाही शंकाच आहे. मी जखमेभोवती शर्ट गच्च आवळून बांधला. पण फारसा उपयोग झाला नाही. कारण रक्त भळाभळा वहात होतं. मला भोवळ येऊ लागली आणि जबर रक्तस्त्राव होऊन मी मरणार असं मला वाटू लागलं. अर्धा एक तास झाला असावा. आदिवासी आसपास नाहीत याचा साधारण अंदाज होऊन मी धडपडत उठलो. होत नव्हतं ते सामान तंबूत फेंकलं. तंबूच्या दोऱ्या उचकटल्या आणि तो तसाच फरफटत घेऊन तराफ्यावर आलो.

तराफा मला पलीकडच्या तीरावर न्यायचा होता. पण वल्हवायचे त्राण नव्हते. मी तराफा तसाच प्रवाहाबरोबर जाऊ दिला. फक्त मी देवाची प्रार्थना करत होतो. पुढे मोठा धबधबा नसावा किंवा खडकावर आपटून तराफा उलटू नये. कारण मगरी माझा घास घ्यायला टपल्या होत्याच. तराफा फेसाळत्या पाण्यातून धक्के खात चालला होता, मधेच एखाद्या खडकावर आपटून तो पार तिरपागडा व्हायचा. मी अर्धवट शुद्धीत असलो, तर कसाबसा दोर पकडून ठेवायचो नाहीतर नुस्ता पडून रहायचो. त्याशिवाय माझ्या हाती काय होतं ? माझ्याकडे ढीगभर नकाशे होते, पण आता त्यांचा काय उपयोग. नकाशावर हे सतराशे-साठ धबधबे थोडेच असणार ? एरवी लांबून जरी धबधब्याचा अंदाज आला तरी मी तराफा किनाऱ्यावर घ्यायचो. पण आता असाह्य्य स्थितीत मी अंधार पडेपर्यंत तराफा तसाच चालू द्यायचो. सकाळ झाली की परत पुढे. हल्लेखोरापासून जितकं दूर जाता येईल तितकं बरे.

परंतु भल्या सकाळीच माझं डोकं एवढं भणभणायला लागलं की कुठेतरी थांबणं भाग होतं. कुठे उतरावं या विचारात असतानाच काठावर कुणीतरी माणूस दिसला. जवळ गेल्यावर मी ओळखलं, हा तर माझा स्कँडिनेव्हियाचा दोस्त ! आपल्या सहा मीटर शिडाच्या बोटीतून आईसलँडमार्गे अटलांटिक पार करायला दोन वर्षापूर्वीच निघालेला. नंतर त्याची काहीच खबरबात नव्हती. या इथे त्याला बघून मला खूपच आनंद झाला. आश्चर्याचा धक्का बसला नाही. तराफा नीट काठाला लावण्याची ताकद माझ्यात उरली नव्हती. शवटी त्यानेच ओरडून नांगराची दोरी फेकायला सांगितली. किनारा जेमतेम पाच यार्डावर असेल, पण मी फेकलेला दोर तिथपर्यंतही

पोहोचला नाही. दोर पकडायला तो दोन–चार पावलं पाण्यात आला, पण त्याच्या हाती दोर लागला नाहीं. तराफा प्रवाहाबरोबर तरंगत पुढे चालला.

शेवटी कसाबसा माझ्या दोस्ताने तराफ्याचा दोर खेचून तो एका खडकाला घट्ट बांधून ठेवला. माझी टिंगल–टवाळी करत हाताने धरून त्याने मला किनाऱ्यावर घेतले. जवळ जवळ मला उचलूनच सावलीत नेऊन ठेवले. ' मुंडकंच जाणार होतं नं ! साला आदिवासी ना ? किती जण होते.' त्याने उत्तरालाही उसंत दिली नाही. ' साला, तुझ्या मुंडक्याची मस्त ट्रॉफीं झाली असती.' थट्टा करता करता त्याने अर्धी बाटली व्हिस्की काढलीं. मला जमके एक पेग दिला आणि उरलेली बाटली माझ्या शेजारी ठेवून दिली. ' तो इथे कसा ?' माझी उत्सुकता दाटून आली. ' हे बघ एक दिवस तू या मार्गाने येणारच याची मला खात्री होतीच. थांब, मला माझी बंदूक आणू दे ' तो बोलता बोलता उठला, बंदूक उचलली आणि जंगलाच्या दिशेने चालू पडला. दिसेनासा होण्यापूर्वी त्याने एकदा मागे वळून पाहिलं आणि बंदूक हलवन ' बाय बाय ' केलं. मी जीव तोडून त्याला थांबायला सांगत होतो, पण तो थांबला नाही. मी कितीतरी वेळ रेतीत बसून त्याची वाट बघत राहिलो, पण तो आला नाही. नाइलाजाने उठलो तेव्हा लक्षात आलं, हा सगळा भाम होता, किनाऱ्यावर मी एकटाच होतो, अगदी एकटा !

माझ्या अंदाजाप्रमाणे मी प्रवाहाबरोबर २० किमी आलो असेन. पण जंगलातून हे अंतर पार करणे सहज शक्य होतं. मी तराफ्यावरच सर्व सामान उतरवलं आणि तराफा जरा खालच्या बाजूला गवताळ दलदलीत लपवून ठेवला. परत येताना कंबरभर पाण्यातून यावं लागलं म्हणजे आदिवासी नाही तर आता मगरींच्या तोंडीं पडायचो. मी झटकन किनारा गाठला. मला जबरी भोवळ आली. माझी अगदी हालत झाली होती. तराफ्यावरचं सगळं सामान वाहून नेणं मला शक्यच नव्हतं. बरेच सामान मी काठावरच्या झुडपातच दडवून ठेवले. फक्त बंदूक, तंबू, औषधाची पेटी, सुकवलेले मांस आणि पाण्याची बाटली घेऊन नदीपासून २०–३० यार्डावरील टेकाडावर आलो. आडोशाची जागा निवडून जमीन साफसूफ करून कसाबसा तंबू ठोकला. परत धडपडत नदीवर गेलो आणि शर्ट भिजवून आणला. भूक नव्हती. पण काहीतरी खायलाच हवं होतं. मी गळ शोधला आणि नशीबानेच मला चांगला १० पौंडी कॅटफिश मिळाला. तंबूत परतताना मी गळ वगैरे व्यवस्थित लपवून ठेवला. तंबू ठोकण्यापूर्वी मी माझा कॅमेरा तिपाईवर उभा केला आणि ' सेल्फ टायमर 'ने स्वत.चे दोन फोटो काढून ठेवले. मेलो तरी काहीतरी असावं म्हणून. अर्थात कॅमेरा· फिल्म तरी मागे राहिल का हा विचार शिवलाच नाही.

रात्र झाली तेव्हा मला जाणवलं, की मी तंबूच्या बाहेर तसाच उघड्यावर पडून आहे. मी तंबूत शिरलो, बंदूक तयारीत ठेवली आणि परत गुंगीत गेलो.

नंतर आपल्या जगात परत आल्यावर अनेकदा माझ्या मनात विचार .यायचातेव्हा

मीं घाबरलो होतो की नव्हतो ? कारण माहीत नाहीत पण बहुधा मीं घाबरलो नव्हतो. एखाद्या त्रयस्थाकडे बघावं तसा मी या घटनेकडे बघत होतीं . मीथोडाफार भावनाप्रधान झालो असेन, पण भीतीपेक्षा एकाकीपणा जास्त जाणवला. खरं म्हणजे आयुष्यात प्रथमच मी अगदी खूप एकाकी झालो. मला कुटुंबीय, ओळखी–पाळखीचे असे कोणीच जवळचे नव्हते. मला दाईने वाढवलें आणि मग शिकारीला मी घराबाहेरच राहिलो होतो. त्या निमित्ताने भरपूर प्रवास केला होता. पण तोही एकटयानेच. भटकंतीत अनेक मित्र मिळाले, पण कितीही संकट आले, तरी त्यांच्यावाचून माझे कधीही अडले नाही. त्यांची प्रकर्षाने आठवणही आली नव्हतीं. आताचीं परिस्थिती वेगळी होती. इथल्या स्थानिक लोकांना टाळून मला रहायचं होतं· कातडी बचावण्यासाठी. काहीं क्षण मी इतका भावनाप्रधान झालो की माझ्या थडग्यावर उभारायच्या क्रूसाचा मी विचार करू लागलो. तेवढीच माझी निशाणी. कारण मी मेल्यावर एक दोन दिवसातच तरसांनी माझ्या शरीराची विल्हेवाट लावली असती.

मी फारच भावनेच्या आहारी जात होतो.

रात्रीच्या भयाण अंधारात मी माझ्या गत आयुष्याचा विचार करत होतो. काय करून घेतलं होतं मी जिंदगीचं ! डोळयासमोरून एकामागून एक दृश्ये सरकत होती. अर्थहीन–अर्थपूर्ण, रंगीबेरंगी–रंगहीन, क्षुल्लक म्हणून विस्मृतीच्या गर्तेत फेकली गेलेली. पण आता तेवढीच धुमारून येणारी. सगळंच अगम्य. तुफानातून सहीसलामत वाचून, माझ्या छोटया नावेतून किनाऱ्याला लागायचो तेव्हाच आकंठ समाधान मला याद यायला लागलं. पॅरिसमध्ये लठ्ठ पगाराची नोकरी मिळत होती. पण ती ठोकरून कष्टाचे पण माझ्या आवडीचे चित्रकाराचे जिणे जगायचे ठरवले तो क्षण आठवला. डॉक्टरकीला जायचं सोडून व नोकरीधंद्याऐवजी मी भटक्या म्हणून जगायचं ठरवलं तो दिवस मला चांगलं आठवतोय, घसरगाडीतून लॅपलॅन्ड ओलांडताना एक ओसाड खोपटं सापडलं. केवळ म्हणूनच घोंघावणाऱ्या तुफानातून बचावलो होतो तर एकदा भोवळ येऊन मी १०० फूट पाण्यात पडलो होतो. एका मित्राने सुदैवाने मला वर बोटीत ओढून घेतले. मी गेलेले देश, तिथले लोक राहून राहून आठवायला लागले. आई–वडील–प्रेयसी याद येऊ लागली. ती आत्ता काम करत असतील ? मित्रमंडळीत गप्पा मारत असतील की फिरायला गेली असतील ? गावाला बर्फ पड असेल. खूप बर्फ. त्याचे त्यांना काहीच वाटत नसेल. माझी आताची ही दशा बघन ते काय म्हणतील ? 'नाहीतरी तुला सांगत होतोच.' 'बिच्चारा' सगळें मोठा सुस्कारा सोडून म्हणतील. मी तसा सणकी नाही, पण कोणी बिच्चारा म्हणण्यासारखं काहीच घडलं नव्हतं. परत जिंदगी मिळाली तर अशीच गुजारेन.' असं म्हटल की मनाला शांती मिळते. मनापासून तसं वाटत असेल तर खरंच शांती मिळते· एकाच गोष्टीचा अफसोस होता, शिडाच्या तीस फुटी होडीतून जगप्रदक्षिणा करण्याचे माझे स्वप्न आता अधुरेच रहाणार.

माझ्याकडे एक मेणबत्ती होती. मी ती उगाचंच पेटवली आणि विझवून टाकली. धीर यावा म्हणून. पण मला पक्कं माहीत होतं की, 'पॉइंट फाईव्ह प्रोग्रॅम'च्या हेलिकॉप्टर्सनी अख्खे खोरे पालथे घातले तरी किंवा मला शोधायला कुणी नदीकाठाने आला तरी त्यांना बेमालुमपणे लपवलेला माझा तंबू दिसणार नाहीच. मी माझ्या डायरीत नोंद केली.' 'आपल्याला हवे तसे मनपसंद आयुष्य जगण्याची संधी मला मिळाली. माझ्या पुढच्या जन्मापर्यंत जग कदाचित सामूहिक जीवनाकडे झुकले असेल. अशा जगात स्वतंत्र व्यक्तिमत्व म्हणजे...

आतापर्यंत सफरीत मी बिडी-काडी क्वचितच ओढायचो. मात्र आता एका मागोमाग सिगरेटी ओढाव्याशा वाटू लागल्या. मी कणाकणाने संपतोय – कधीच जागा होणार नाही. अशा विचित्र भावनेनं मला घेरलं. चिघळलेल्या जखमांमुळे ताप वाढत होता. मी बरळत होतो. कसलीतरी जबरदस्त भीती मनात घर करून बसली होती. कोणीतरी बोलावतंय असं वाटायचं. मीही साद घालायचो. माझाच आवाज परका झाला. वाटू लागलं भुतं मला उल्लू बनवताहेत.

मला चित्र-विचित्र स्वप्न पडायची आणि स्वप्नात नाना तऱ्हेची माणसं यायची. मी कधीही न बघितलेली. पण मित्रांपैकी कोणी दिसायचा नाही. एक स्वप्न चांगलंच आठवतंय, एक गबाळा मनुष्य स्वप्नात आला. त्याला मी केव्हातरी बघितलं होतं. पण कुठं ते आठवत नव्हतं. त्याच्या म्हणण्यानुसार इथिओपियन सरकारला माझ्यावरच्या हल्ल्याची खबरबात लागली होती. आणि माझ्यासाठी सुटका पथक पाठविण्याची ते तयारी करत आहेत त्यांना यायला २।३ दिवस लागतील. तोपर्यंत तो माझ्या मदतीला आला होता. त्याच्याकडे सर्व औषधे होती आणि माझ्या जखमा धुवून त्याने व्यवस्थित मलमपट्टी केली. नंतर त्याने वर्तमानपत्राची भेंडोळी काढली. ती वाचायची मला उत्सुकता असेल अशी त्याची कल्पना होती, त्याचे समाधान होण्यासाठी सर्व पेपर्स मी वाचले आणि काही बातम्यांबद्दल त्याच्याशी चर्चाही केली. त्याच्यादृष्टीने त्या घटना फार महत्त्वाच्या होत्या, पण मला त्यांचे सोयरसुतकही नव्हते.

नंतर एक सुंदर बाई भेटायला आली. पण रूपापेक्षा विक्षिप्तपणा जास्त होता. माझ्या अंदाजाप्रमणाच ती तिशीची असावी. तिने एटदार कपडे घातले होते, पण मेक–अप् अंमळ जास्त केल्याने आत्ताच्या गरम हवेत तो चेहेऱ्यावर ओघळला होता. तिला बघून मी इतका चकित झालो की, मला एक शब्दही बोलता येईना. तिने वाकून माझ्या तंबुची मच्छरदाणी उघडली आणि 'माझ्या जादा चौकसपणाबद्दल माफ करा हं.' असं काहीसं पुटपुटली. आदिस आबाबाला आली असताना तिला माझ्यावर ओढवलेल्या प्रसंगाबद्दल समजलं होतं. सगळ्यांनाच माझ्याबद्दल हळहळ वाटत असेल, पण मला आदिस आबाबाला परत आणण्यापूर्वी इथे जंगलात भेटणं तिला जास्त रोमांचक वाटत होतं. नंतर काय झालं आठवत नाही, पण स्वतःचीच

कींव आल्याचे मात्र आठवते.

तिसऱ्या रात्रीं तरसाचं ओरडणं ऐकायला आलं. या भागात तरस इतक्या जवळून ओरडताना पहिल्यांदाच ऐकले. मी बंदूक सज्ज ठेवली होती, पण बार घालायचं धाडस नव्हतं, कारण बंदुकीचा आवाज ऐकून लुटारूंनी मला नेमकं शोधून काढलं असतं. तरस नाना तऱ्हेचे आवाज काढू शकतात. हसणे. खिदळणे, फिस्कारणे. विव्हळणे, रडणे. फार वेळ ते यडेविद्रे आवाज एकत राहिलात तर वेड लागायची दाळी यते. फक्त बायकांच्या पागलखान्यात असे आवाज ऐकायला मिळत असतील.

तरस भित्रट तरीही भीतिदायक असतात. लाजाळू तरीही धीट असतात. सापळ्या मारखा त्याचा जबडा असतो. तरस झोपडीत शिरून लहान मुलाला पळवू शकते. गाय प्रसवत असताना तिच्यावर हल्ला करून नुकतंच जन्मलेलं वासरू घेऊन जाऊ शकतं, गुपचुप गोठ्यात शिरून गायीचं आचळ फोडू शकतं. आणि घाबरून ती पळत सुटली की थकेपर्यंत तिचा पाठलाग करून तिला मारू शकता. तुमच्या कॅम्पमध्ये शिरून शेकोटीजवळ तुमच्या कुत्र्यासारखं बसू शकतं किंवा झोपेमध्ये तुमच्या चेहेऱ्याचा लचका तोडू शकतं. या रॉबर्ट रुआर्कने दिलेल्या धोक्याच्या सूचना आहेत.

कदाचित तापात पडलेली स्वप्नं असतील वा खरंही असेल. पण मी त्यांना पाहिलं अमं नक्की सांगू शकत नाही. ते दुपारी आले. पहिल्यांदा एकच आलं आणि झुडुपाभोवती घिरट्या घालताना अधून-मधून माझ्याकडे आणि माझ्या तंबुकडे बघत राहिलं. काही वेळानं इतर आले. त्यांचे लांबडे पाय दुमडून माझ्यापासून सुमारे दहा फुटांवर अर्धवर्तुळाकार ते बसले. काहीही हालचाल न करता माझ्याकडे ते शांतपण बघत होते. ते रागावलेले किंवा धोकेबाज दिसत नव्हते. मृत्यूपंथाला लागलेल्या माणसाचा जीव जायची आपण जशी वाट बघत बसतो, तसे ते नुस्ते वाट बघत होते. पण त्यात आपल्यासारखा ढोंगीपणा नव्हता. ते आधी कधी आले नाहीत. आता त्यांचं यणं हे अशुभ लक्षण होतं. दोनदा मी मच्छरदाणीतून बंदूक काढली. पण बंदूक काढली की ते पळून जायचे आणि थोड्या वेळाने परत यायचे. अंधार पडेपर्यंत ते येत राहीले आणि रात्रभर त्यांचा आक्रोश चालूच होता.

माझी तब्येत आणखीनच बिघडत चालली होती. पुढचे काही दिवस तर मी बेशुद्धीतच होतो. एकदा मला शुद्ध आली तेव्हा लक्षात आलं की मी नदीकिनारी झोपून पाणी पीत आहे. मी तिथवर कसा गेलो हे मात्र आठवत नाही.

हल्ला झाल्यानंतरचा हा कितवा दिवस होता – आठवा–नववा–दहावा ? मला कधीच समजणार नाही एक दिवशी सकाळी मात्र ताप उतरला. मी वाचण्याची शक्यता आहे असं मला जाणवलं. ताकद यईपर्यंत मी त्याच जागी राहिलो तर उपयोग होईल असा मी विचार केला. पण माझा मासाचा साठा कुजला होता, त्यामुळे लुटारू असले तरी मला शिकार करणे भाग होते. पण त्याऐवजी मासेमारी वा फासे-पारधी करून आणखी दोन दिवस काढावेत असं मी ठरवलं. दुपारी दोन

छोटेसे पक्षीं समोरच्या झाडावर उतरले तेव्हा मला वाटलं, एका छऱ्यांत मी दोन्ही पक्षीं मारू शकेन. एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर ते उड्या मारत होते. ते एका-मागोमाग बसल्यावर मीं लगेच चाप ओढला. मी इतका दुबळा झालो होतो की त्या धक्क्यानिशीं मागे पडलो आणि इतक्या वेदना झाल्या की, मला वाटलं आपल्याला जबर दुखापत झाली आहे. मग मी सरपटत झुडुपात गेलो. दोन्हीं पक्षी मिळाले तेव्हा वाढदिवसाची भेट मिळाल्यासारखं वाटलं. आयुष्यात केव्हाच मीं एवढा भुकेला नव्हतो. त्यांची पिसं उचकटून टाकली आणि साफ करून, भाजून त्यातला एक पक्षी ताबडतोब खाल्ला, दुसरा दुसऱ्या दिवशीच्या न्याहारीसाठीं ठेवून दिला. अंधार पडेपर्यंत मी सर्व आवरून ठेवलं आणि दुसऱ्या दिवशी सूर्योदयापूर्वी निघण्याचीं तयारी केली. म्हणजे लुटारू आले तरीं मी त्यापूर्वी सटकलेला असेन.

मीं इतका दमला-भागला होतो, तरी मला झोप आलीं नाही आणि पहाटेपूर्वीच उठून तराफा पाणथळ भागातून ओढून काढला.

माझ्या अचानक येण्याने 'वॉटर-हॉग' भलतेच चकित झाले. एक पिल्लू तर धडकता धडकता वाचले. ते इतक्या पटकन् पळाले की बंदूक घेऊन मला त्यांचा पाठलागही करता आला नाही. पण ते परत पळाले, तेव्हा एका गोळीत त्याला लोळवून मी तराफ्यावर ओढून आणले. मग मी तंबु गुंडाळला, सामान-सुमान गोळा केले आणि पाणी जाणार नाही अशा रीतीने बांधून घेऊन तराफ्याला बांधले.

तराफा मधल्या धारेला घेतला आणि पुढच्या प्रवासाला लागलो.

◆

## सात

लेक तानापासून सुदानच्या सरहद्दीपर्यंतचा ५०० मैल प्रवाहात नदीला साधारणतः ४००० फुटांचा उतार आहे. पुलापासून सुरुवात केल्यानंतरच्या पहिल्या आठवड्यात माझ्या अंदाजानुसार खूप धबधबे आढळले नाहींत. पण पुढे मात्र खूप आढळले. दोन वेळा तर मला माझा तराफा सगळा सोडवून सुटा करून नदीच्या अडलेल्या प्रवाहाच्या पलीकडे न्यावा लागला. पुढे परत मी तराफ्यावरून प्रवासाला सुरुवात केली. अनेकदा मी तराफ्यावरचे सर्व सामान उतरवून, १०० यार्ड लांबीचा दोर बांधून तराफा प्रवाहात सोडून देत असे. आणि प्रवाह शांत झाला की तराफा काठावर ओढून घेत असे. मग तीन चार खेपा घालून मागे ठेवलेले माझे सामान

घेऊन येत असे. जमिनीचा चढ–उतार जसा असेल त्याप्रमाण दरदिवशी सरासरी ५०० यार्ड ते १५ मैल अंतर काटत असे.

☐ ☐ ☐

खूप दिवस शिकार न मिळाल्यामुळें माझ्याकडचे अन्नपाणी संपले होते. मी भुकेला होतो, पण सगळा परिसर भुताटकीने झपाटल्यासारखा वाटत होता. गळाला मासे लागत नव्हते, प्राणीही जवळपास फिरकत नव्हते. मी तराफा काठावर आणताना दूरवरचीं हरिणं हेरली होती. पण त्यांनाही माझा सुगावा लागला असावा. कारण मी येण्याच्या आतच ती पळाली. टेकडीवरच्या झुडपाच्या दिशेने जेव्हा ती गेली, तेव्हा वाऱ्याच्या विरुद्ध दिशेने जाऊन मी त्यांचा माग काढायचा ठरवला. एक नर एका मोठ्या खडकावर उभा होता. त्याचे रंग–रूप आसपासच्या झाडोऱ्यात अगदी बेमालूम मिसळून गेले होते. मी जवळ जाताच तोहीं पळून गेला. या सर्व धडपडींत तास दीड तास सहज गेला होता. मी पार थकलो होतो आणि नदी किनारी परतण्यापूर्वी मला विश्रांतीची गरज होती.

पुढे आलेल्या एका सुळक्याच्या सावलीत मीं ताणून दिली. मला मलेरियाचा झटका आला असावा. जवळचे क्विनाईन केव्हाच संपले होते. काडतुसेही फक्त ११च उरली होती. या भागात लुटारूही आढळले होते. कारण दोन दिवसांपूर्वी घळीच्या दरडीपलीकडून धूर येताना दिसला होता. मीं घळीतून कधीच सुखरूप बाहेर पडणार नाही याची मला पुरेपुर खात्री पटली. लवकरच मगरी वा लुटारू माझा फडशा पाडणार हे स्पष्ट होते, दोघांपैकी कोणाच्या हातचे मरण बरे ह्याचाच मी विचार करत होतो. कसंही असलं तरी मरण पटकन यावं ! या दृष्टीने मगरीच जास्त चांगल्या होत्या !

उदास मनाने मी नदीकाठचीं वाळू बोटांच्या फटीतून सोडत बसलो होतो. केवळ चाळा म्हणून, तेवढ्यात काहीतरी जाणवलं. समोरच्या वाळूतल्या गुळगुळीत खड्यांना सोनेरी झाक होती. मी हात लांब करूनही ते त्या खड्यांपर्यंत पोहोचले नाहीत. मला जागवरून उठायचा कंटाळा आला होता. तरीही मी एकटक बघत राहिलो काही वेळाने माझ्या डोक्यात प्रकाश पडला. मी जे पाहिलं त्याचा अर्थ हळूहळू माझ्या डोक्यात शिरला. माझ्यावर कुणीतरी नजर ठेवून आहे, असं वाटलं, म्हणून मी आजुबाजूला बघितलं. मी अगदी एकटा होतो. मी तसाच रांगत पुढे गेलो. आणि तो खडा उचलला-सोनं !

चक्क सोनं होतं ते ! माझा विश्वासच बसेना. मी तो खडा हातात घेऊन बघितला. आकाराच्या मानाने त्याचे वजन जास्त होते. माझ्या चाकूने ठाव–ठोक करून त्याला काही आकार देता येतो का ते मी बघितलं. हा लवचिक आणि चकाकता

धातू म्हणजे नक्कीच सोनं होतं. मी स्वप्नात तर नाहीना अशी भीती मनात चमकून गेली किंवा ह्या तापाच्या लीला असाव्यात आणि कोणत्याही क्षणीं खाडकन जाग यणार असं वाटू लागलं. सोन्याचा खडा अदृश्य होऊ नये म्हणून मी मुठीत घट्ट धरून ठेवला.

दोन–तीन वर्षांपूर्वी फिनलंडच्या लॅपलँडमध्ये मला असंच सोनं सापडलं होतं. त्यामुळे अशा स्वरूपातलं सोनं कसं असत ते मला पक्कं आठवत होतं. ते कसं शोधावं हेही माहीत होतं. माझ्या हातातला खडा साधारण शेंगदाण्याच्या आकाराचा होता. मी सगळा थकवा विसरलो. धडपडत आसपास शोधू लागलो.

मग मला आणखी काही खडे मिळाले. नंतर लक्षात आलं, रेतींत सर्वदूर सोन्याचे कण असलेले खडे पसरले आहेत. रेतीच्या कणांच्या आकाराचेच. मी शर्ट काढला आणि जेवढी रेती त्यात घेणे शक्य होते. तेवढीं भर–भरून घेतली. मग धडपडत नदीं-काठी गेलो. सामानातून तसराळे काढले आणि काठावर बसून ती रेतीं धुवू लागलो. मागे फिनलंडला केवळ चूप म्हणून मी हा उपद्व्याप केला होता. तेव्हा माझ्याकडे सर्व प्रकारची सामुग्री होती. पण आता माझ्याकड तसराळ सोडून काहींही नव्हतं. रेतीपासून सोनेरी कण अलग करणे कठीण आहे हे लौकरच माझ्या लक्षात आले. मग मी केवळ त्यातल्या त्यात मोठे सोनेरी खडे निवडायचे ठरवले.

हातातलं काम संपवून मी लगेच पहिल्या जागी परतलो. तिथूनच मीं परत भर-भरून रेती आणणार होतो पण तो विचार बदलून मी माघारी फिरलो व नदीच्या दिशेने गेलो, पहिल्या जागी परतल्यावर माझ्या लक्षात आलं, कीं केवळ पावसाळ्यात वाहणाऱ्या छोट्या झऱ्या–ओहळातून हे सोनेरी कण आले असावेत. आता उशीर झाला होता. मी आणखी सोनेरी वाळू जमा करून नदीकिनारीं परतलो. तंबू ठोकला आणि पुन्हा वाळू धुवायला सुरुवात ! ठार अंधार पडेपर्यंत हा उद्योग चालला होता. नंतरच मी झोपायला गेलो.

रात्रभर मला सोन्याच्या खजिन्याची स्वप्नं पडत होतीं. नदीकाठाने मीं पुढ जात होतो आणि कुठेही उकरले की सोन्याचा मोठा थर लागत होता. अस्सल सोन्याचा. मी दगड उचलायचो त्याचं सोनं व्हायचं खडक उचलला. की त्याचंही सोनं. मी तसाच तरातरा पुढे गेलो. पण जिथे खाईन तिथे सोनेच सोने. मला काही सुधरेना. मी वर कड्याकडे बघितलं. कडाही सोन्याचा मला अफाट सोनं सापडलं. अगदी अफाट. हे सर्व जर एका वेळी बाजारात आणलं तर त्याची काहीच किंमत उरणार नाही. तांब्या – पितळाइतकाही त्याला भाव येणार नाही. अगणित मोलाचा खजिना मिळाला होता, पण तो कवडीमोल ठरणार होता. फसवा होता. मला जाग आली तेव्हा हे सगळं स्वप्न होतं. हे जाणवून मला हायसं वाटलं.

नंतर मला आठवलं. आदल्या दिवशी मला खरोखरच सोनं सापडलं आहे. मी परत शांतपणे विचार करू लागलो. ' मीं हरिणांच्या मागे–मागे गेलो. खडे–रेती

उचलली. नदींत धुतली. मला खरोखरच सोनं सापडलं होतं. अगदीं खरं.!' ते बाटलीत भरून ठेवल्याचंही मला आठवलं. बाटली हाताला लागते का म्हणून मी चाचपून बघितलं. बाटली नसणारच या भावनेने. पण बाटली तिथेच होती. सोन्या सकट.

रात्र पडली होती. सगळीकडे चंद्रप्रकाश पसरू लागला होता. घळींच्या कडयांचे झाडा--झुडपांचे चित्रविचित्र आकार चंद्रप्रकाशात मजेशीर भासत होते. चंद्राचे कवडसे तर अगदी हाताशीच होते. लख्ख प्रकाश झाडा-झुडपातून पसरून राहिला होता. मी कपडे चढवले, बंदूक घेतली आणि तंबूच्या बाहेर पडलो. नदीच्या पाण्यावर हळुवार चंदेरी लाटा उठत होत्या. पक्षी, वारा, पाणी अगदी कसलाही आवाज नव्हता. मी ढगातून चालल्यासारखा चांदण्यातून चाललो होतो. मी रात्री कशासाठी बाहेर पडलो होतो. किंवा भर रात्री मला काय सापडणार होतं कुणास ठाऊक. आता काहीच आठवत नाही. मी गेलो तिथे कसलीही सोनेरी झाक नव्हती. काहीही जादूई वा वेगळं नव्हतं. इतर कुठल्याही सुकलेल्या ओहळासारखंच ते कोरडं पात्र होतं. मी खडकावर चढलो. आणि झुडपातून सरपटत जाऊन पहिल्या दिवशी ज्या छोटया गुहेबाहेर पहुडलो होतो, तेथें जाऊन पसरलो.

हळू हळू माझ्या शोधाचे महत्त्व आणि त्याचे होणारे परिणाम मला जाणवू लागले. मीं पैशाची कधीच फिकीर केली नव्हती. मला पोटापुरते पैसे नेहमीच मिळत गेले होते. माझ्या गरजाहीं साध्याच होत्या. मी अशा वातावरणात वाढलो होतो की जिथे कुणाला कधीच पोटापाण्यासाठी फारसे कष्ट करावे लागत नव्हते. आणि नंतर घर सोडून आईवडिलांच्या अर्थिक पाठबळाशिवाय भटकायला सुरुवात केली तेव्हाही मी पोटापाण्यासाठी केवळ नशीबावर हवाला ठेवला होता. नशिबाचीही माझ्यावर मेहेरनजर होती, अगदी आतापर्यंत.

आता सोनं मिळाल्यावर मी पाहिजे तिथे जाऊ शकणार होतो. मी १–२ वर्ष भारतात जाणार होतो. मग स्कॅंडिनेव्हियात माझ्या आवडीची बोट खरेदी करून जग–प्रदक्षिणाही करू शकणार होतो. माझ्या आवडीच्या सर्व जागा हिंडू शकणार होतो. उत्तरध्रुव, जपान, टिएरा देल फयुगो, अलास्काचा पश्चिम किनारा, न्यूझीलंड... रेतीशी खेळता खेळता मी स्वप्नाच्या साम्राज्यात हरवलो, एकाएकी एमिल लुडविगच्या पुस्तकात नाईल आणि नाईलच्या इतिहासाबद्दल लिहिलेला मजकूर आठवला. ईजिप्शियन साम्राज्याचा सोन्याचा स्त्रोत इथिओपियात होता आणि पिरॅमिडस्‌मध्ये आढळलेले सोन्याचे प्रचंड साठे पश्चिम इथिओपियातूनच आलेले होते. ईजिप्तच्या विशेषज्ञांना इथिओपियातील खाणीतून किती सोने निघाले याची माहिती असली तरी त्यांना त्या खाणीचा ठावठिकाणा कधीच लागला नव्हता. ब्ल्यू नाईलच्या उगमाच्या भागात हा साठा असावा एवढ्याच निष्कर्षाप्रत ते आले होते. फरोहाची संस्कृती उत्तुंग आणि गुंतागुंतीचा अंतर्भाग असणारे पिरॅमिडस् बांधण्यात

निष्णात होती. पण आपल्या सोन्याच्या खाणी आणि सोने गाळण्याचं कसब असणाऱ्या स्थानिक लोकांना ते कसे विसरले ? इजिप्तचा कब्जा सोडून परत गल्यावर या स्थानिक लोकांचे काय झाले ? तेव्हा इथे राहणाऱ्या स्थानिक लोकांना सोन्याच्या खाणी कुठे आहेत हे नक्कीच माहीत असावे पण त्याची कुठेही नोंद ठेवलेली नव्हती. अनेक शतके कित्येक अधिकृत आणि अनधिकृत मोहिमा आणि साहसी वीर या (Ophir) सुवर्ण–भूमीच्या शोधात फिरले. पण कुणालाही यश आले नाही. सुदानच्या बाजूने नाईलच्या घळीत शिरून उगमापर्यंत जाण्याचे अनेक प्रयत्न झाले. हे वीर लगेच माघारी फिरले नाहीत, तरी पुढे त्या मोहिमांचा थांगपत्ता लागत नसे या प्रदेशात शिरण्याचे धाडस करणाऱ्यांपैकी फक्त हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच लोक जिवंत परतले होते.

'कदाचित त्या खाणी याच भागात असतील. त्या विशेषज्ञांचा अंदाज बरोबर असेल आणि मला जर सोन्याचा मुख्य साठा सापडला असेल, तर इथे सोन्याचा भरपूर साठा असेल.' मी मनाशीच विचार केला.

इथे दोन-तीन आठवडे मुक्काम ठोकून सर्व भाग पिंजून काढावा लागेल. दररोज दोन-तीन तास सोने गाळले तर त्यातून आणखी सोने शोधण्यासाठी संशोधकांची स्वतंत्र मोहीम मी आखू शकेन. चंद्र हळूहळू नाहीसा होत होता आणि दरडीच्या काळ्याकुट्ट छाया पसरायला लागल्यावर मी तंबूकडे परतलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी मला खूप अशक्तपणा जाणवू लागला. मी गेल्या चोवीस तासात सोन्याच्या नादात काहीही खाल्लं नव्हतं. मूठभर तांदूळ सोडून माझ्याकडे काहीही नव्हते. मी ते तांदूळ शिजवले, क्विनाईनच्या गोळीबरोबर खाल्ले. बंदुकीत दोन गोळ्या भरल्या आणि बाकी सात गोळ्या तंबूत सुरक्षित ठेवून बाहेर पडलो. प्रत्येक गोळीनिशी मला जास्तीत जास्त शिकार साधावी लागणार होती. लुटारूंनी माझा दारूगोळा पळवल्यावर, मी जास्तीतजास्त काटकसरीने तो वापरत होतो. पण माझा काडतुसाचा पट्टा दोनदा नदीत पडला होता. माझ मासे पकडायचे गळही इतक्या ठिकाणी तुटले होते की जमतेम १० यार्ड दोर शिल्लक होता. नदी जिथे रुंद आणि खोल असेल तिथे मासेमारी करण्याची माझी हिंमत नव्हती. जर एखादा मोठा मासा गळाला लागला असता तर झटक्यानिशी तो दोरीसकट गळ तळाला घेऊन जाण्याची शक्यता होती. म्हणून मी शक्यतो कडेला साठलेल्या पाण्यातच मासेमारी करत असे. पण आता घळ इतकी निमुळती झालेली होती की कडेची डबकी वा ओहळ आढळणं शक्यच नव्हते. आता गळ वा हुकचा काहीं उपयोग नव्हता. तो गमावण्याचा धोका पत्करण्यातही अर्थ नव्हता. मग जनावरांच्या रूळलेल्या वाटांवर फासे लावून ठेवले. सूर्य जरी माथ्यावर होता, तरी बंदूक घेऊन मी नदी किनाऱ्याने सावजाच्या शोधात निघालो. शिकारीला योग्य जागा होती आणि चिखलात पाऊलखुणा पण होत्या. पण दोन तीन तासांत मारण्याजोगा एकही प्राणी आढळला नाही. मी

पाय ठवल्यामुळे वा आदिवासी नेहमीं शिकारीला यत असल्याने कदाचित प्राणी इकडे फिरकत नसावेत.

परतताना, पैलतीरावर दूरवर कुठेतरी हत्तीची तुतारी ऐकू आली. आतापर्यंत मला कुठे हत्ती आढळले नव्हते आणि आता ऐकलेला हा आवाज पहिला आणि शेवटचाच. त्याची तुतारी मला धोक्याच्या घंटेसारखी वाटली. बाकी जिवंतपणाच्या कसल्याही खाणाखुणा नव्हत्या. अगदी मगरीसुद्धा नाहीत. आसपास कोणी नव्हते. मी एकटा होतो. पूर्ण दुनियेत मी सोडून कुणीही नव्हते.

गूढ सुवर्ण–भूमीत मी एकटाच होतो !

माझ्या तंबूजवळच्या गवतात एक मोठा साप आढळला. एक रंग सोडला तर तो अगदी अजगरासारखा होता. मी बरोबर त्याच्या डोक्यावर दगड मारला आणि उडी मारून त्याचे डोके जमिनीवर दाबून, बंदुकीच्या दस्त्याने त्याला मारला. मी भूकेला होतो. सापाचे कातडे काढून लगेच त्याचे तुकडे-तुकडे केले. मग तसराळ्यात तो तळला. अजूनही तो झटके देत होता. तळण्यासाठी माझ्याजवळ चरबी नव्हती. ना मीठ-मसाला, पण तसाच तो मी अधाशीपणे पार संपवला. उरलेला दिवस परत सोनं गाळण्यात गेला. रात्री खायला काही नव्हतं. अजून काही दिवस जर खायला काही मिळालंच नाही तर–मी तो विचारच सोडून दिला. मी इतका दमलो होतो की आडवं झाल्यावर लगेचच मला गाढ झोप लागली.

नंतरच्या दिवसात दिनचर्येत विशेष काही बदल झाला नाही. डुक्कर मारण्याची संधी मीं गमावली. फासे जसेच्या तसेच होते. एक मासा गळाला लागला आणि दुस-ऱ्यांदा प्रयत्न केल्यावर दोरी तुटली. डुकराला आमिष म्हणून माशाचा सांगाडा लावला. माशाच्या नाकपुडीत हुकही खोचून ठेवले. त्याची दोरी तंबूजवळच्याच एका झाडाला–लाकडाला–बांधून ठेवली, माझी खात्री होती. डुकरं जर या वाटेने आली, तर त्यांना मासा खाण्याचा मोह आवरणार नाही. ते खायला गेले की लाकडाचा आवाज होऊन मला नक्की जाग येईल. लाकडाच्या खुणावरून मला माग काढता येईल आणि एका गोळीनिशी मी त्याला लोळवेन.

पण घडलं ते वेगळंच. संध्याकाळी मी माघारीं फिरलो तेव्हा, आमिषाजवळ कसलातरी आवाज आला. आवाजावरूनच ते डुक्कर नाही, हे नक्की समजलं. तरी मी बंदुक सरसावून निघालो. कोल्ह्याच्या आकाराचा उंदरासारखा प्राणी फसला होता आणि सुटू शकत नव्हता. मी त्याला मारला, सोलला आणि दुसऱ्या दिवशी त्याची न्याहारी केली. अशा प्राण्यांमध्ये जंत, गुंडाळी कृमी ( Topeworm ) वगैरे जास्त असतात. म्हणून मी त्याचे नेहमीपेक्षा जास्त बारीक तुकडे केले आणि जास्त वेळ शिजवले. अगदी लागेपर्यंत मांस शिजवले. तरी त्याचा शिसारी आणणारा वास काही गेला नाही. नंतर मी दोन सरडे मारून खाल्ले. वाटले तेवढे त्यांचे मास वाईट लागले नाही. त्याच दुपारी एका बगळ्याने सरड्याची एक नाकपुडी खाल्ली

मी त्यात हुक लावले होतेच. बगळयाच्या लांब तंगड्या आणि पंख पिसं ओरबाडून तो सोलल्यावर अगदी टर्कीसारखा दिसू लागला. शिकार-स्वयंपाक-जेवण यात दररोज तीन तास जात पण पोट काही भरायचे नाही–!

दररोज जमलेलं सोनं बाटलीत भरलं की माझीच मला कीव यायची. काही मिनिटांतच जमा केलेल्या सोन्याच्या पैशावर मी कुठल्याही श्रीमंती हॉटेलमधे शाही खाना घेऊ शकलो असतो, इथे मात्र मी उपाशी मरत होतो.

पहिल्यांदा मी थोड सोनं मिळालं की लगेच नदीवर नेऊन धूत असे. नंतर मात्र जिथे भरपूर साठा असेल तीच रेती नेऊ लागलो. गुळगुळीत दगडांच्या खाली, अथवा धबधब्यांमुळे पडलेल्या भोकात, किंवा पावसाळयात जिथे पाण्यात भोवरे निर्माण होतात, त्याखाली हमखास सोने सापडायचे. एका भगदाडात तर मला रेतींच्या एका कणाबरोबर तीन कण या प्रमाणात सोने सापडले. दैवयोगाने अजून एक शोध लागला. खडकाच्या खोबणीतून मी थोडेसे शेवाळे उचलले तेव्हा मला सोन्याचे दोन मोठे गोळे मिळाले. मी शेवाळे झटकले तेव्हा आणखी थोडे तुकडे पडले, सुरुवातीला मला याचं कारण समजलं नाहीं. पण नंतर लक्षात आलं. जमिनीतल्या भोकांमध्ये प्रथम पुराच्या पाण्याने माती-रेती आणि सोन्याचे कण भरले जात असावेत. पाण्याची पातळी खाली गेली की वर शेवाळे साचत असे आणि पुढच्या पावसात हलकी माती रेती वाहून जाऊन खाली शेवाळयात सोन्याचे कण रहात असावेत. शेवाळे झटकून सोनं मिळवायचा हा अगदी सोपा मार्ग होता, पण अर्ध्या दिवसातच त्या भागातील सर्व शेवळे झटकूनही झाले.

माझी जखम परत चिघळू लागली होती. सततच्या श्रमामुळे, भुकेमुळे आलेल्या थकव्याने आणि हगवणीने ताप परत चढू लागला. पुढचे आणखी काहीं दिवस दिनक्रम बदलला नाही. मात्र कामातली सनसनाटी संपली. फक्त शारीरिक ताण उरला. अनेकदा माझा मलाच प्रश्न पडायचा की मजा म्हणून झालं ते पुरे, आता मी पुढच्या प्रवासाला का सुरवात करत नाही ! ते अगदी सोपं होतं, गाशा गुंडाळायला, तराफ्यावर टाकायचा आणि नांगर सोडायचा.

बाटलीतला सोन्याचा वाढता साठा बघूनही आणखी सोनं गोळा करण्याचा उत्साह ओसरायला लागला आणि प्रत्येक खेप जास्त वेळ खाऊ लागली. काही वेळा जुन्या दोस्ताशी बोलावं तसं मी बंदुकीशी गप्पा मारू लागलो. 'ह्या सोन्याचा माझ्यावर पगडा बसत चालला आहे.' मी या विराण जागी जास्त काळ राहता कामा नये' असं मी, स्वतःला परत परत बजावत असे. आणि न निघण्यासाठी पुन्हा स्वतःच बहाणा शोधत असे. एकदा हगवणीचं निमित्त मिळालं, एकदा सोन्याचा भरपूर साठा मिळाला आणि एकदा तीन बदकं दिसली. वाटलं, पुढच्या प्रवासात पुरेल एवढं मास हवं असेल तर एका तरी बदकाला मारलंच पाहिजे. खरं कारण हे होतं की मी खूप अशक्त झालो होतो आणि पुढे जायचा प्रयत्न करावासाच वाटत नव्हता. रात्रीही

मला धड झोप लागायची नाही. झुडपात जराही आवाज झाला किंवा पक्षी ओरडला तरी मी दचकून जागा व्हायचो.

लुटारू ! त्यांना माझा पत्ता लागला असेल ! पण मी तर या जागी एकही गोळी झाडली नाही. मग त्यांना तंबू दिसला असेल की माझ्या पाऊलखुणा ?

एकदा रात्री मी सिगरेट ओढत होतो. अगदी शेवटच्या साठ्यातली ही सिगरेटही अखंड जाळत ठेवलेल्या ओंडक्याने पेटवली होती. व ओंडकाही लपवून ठेवलेला असे. तेवढ्यात नदीकडून पाणघोड्याच्या ओरडण्याचा आवाज आला. मी सिगरेट तशीच विझवली आणि पाणघोडे नदीवर चरायला आले असतील या आशेने तिकडे निघालो. अगदी जवळून जाणाऱ्या डम-डम बुलेटसारख्या खास काडतुसाने त्यांना मारणे शक्य होते. एका पाणघोड्याचे महिनाभर पुरेल इतके मास आणि चरबी मिळाली असती. पण पाणघोडे प्रवाहाच्या वरच्या वा खालच्या बाजूला गेले असावे. त्यांची निशाणी सापडली नाही.

मी तंबूत येऊन पडलो आणि एकाएकी अंगभर मुंग्याच मुंग्या चढल्या. गरम सुया घुसाव्यात तशा त्या चावे घेत होत्या. मी मच्छरदाणी ओढून काढली, अंगावरचे कपडे काढले आणि जमिनीवर लोळण घेतली. मुंग्यांचे दोन तुकडे केले तरी त्यांच्या चिमट्याची पकड तशीच्या तशीच. मुंग्यांना घालवण्यासाठी आणि त्या कुठून आल्या ते शोधण्यासाठी मी मशाल पेटवली. तंबूभर तांबूस रंगांच्या, मोठ्या मुंग्याच मुंग्या पसरल्या होत्या. मघाशी मी घाईत विझवलेल्या सिगरेटमुळे तंबूच्या तळाला भोक पडले होते. त्या एवढ्याशा भोकातून मुंग्यांची पलटणच आत घुसली होती. मी त्यांना हाकलण्याचा खूप प्रयत्न केला. पण त्या परत परत चावे घेतच होत्या. अंगाची आग-आग होत होती. दाट अंधार होता तरी मी तसाच नदीवर निघालो. पात्र खोल आणि अंधारं होतं. मगरी प्रत्यक्ष दिसल्या नव्हत्या, तरी त्या जवळपास दबा धरून बसल्या असण्याचा संभव होता. मग माकडांची युक्ती केली. पाणी प्यायच्या अगोदर पाण्यात दगड फेकायचा अथवा लांब काठ्यांनी जोरात आवाज करायचा. मगरी अशा आवाजाला घाबरतात. पूर्ण आंघोळ करण्याची माझी हिंमत नव्हती, पण अंगावर पाणी उडवून अंगाची लाही-लाही कमी करण्याचा प्रयत्न केला. तरी पण खूप वेळ आग होतच राह्यली. पहाटे पहिली सूर्यकिरणं झिरपली, तसा मी लगेच तंबू साफ करायला लागलो.

जणू काही सर्व जगच माझ्याविरुद्ध कारस्थान रचत होते. पूर्व आफ्रिका आणि इथिओपियात उभी हयात घालवलेल्या त्या जर्मन बुढ्याची आणि त्याच्या शब्दांची मला आठवण झाली. त्याने वारंवार बजावले होते, ' ब्ल्यू नाईल आपली गुपिते सहजासहजी उघड करत नाही. घुसखोरांना हुसकावण्यासाठी निळ्या नाईलकडे खूप अस्त्र आहेत. आणि पुराणातील हेडस् (Hades) प्रमाणे अजस्त्र प्राण्यापासून ते छोट्या किटाणूपर्यंत कशानेही ती तुझा जीव घेईल. काही अनपेक्षित घडून तू संपशील

फक्त सिनेमातले हिरोच सिंहाच्या तोंडी, हत्तींच्या पायदळीं वा रानम्हशींच्या शिंगांना बळी पडतात. बहुधा आतडी पोखरून टाकणाऱ्या कसल्यातरी जंतूंनी नाहीतर साध्या विंचवाच्या दंशाने तू मरशील. खपशील !'

मला स्वप्नातल्या सावलीगत भासणाऱ्या युरोपच्या जीवनाची आठवण झाली. जो तो आपापल्या कामात–उद्योगात. इथल्या कीडयामकोडयांच्या तोंडीं मरायला मी ते ऐषारामी जीवन सोडून आलो यावर विश्वासही बसत नव्हता.

एकाएकी मी धास्तावलो. मी खरोखरच जिवंत नसलो तर ? कदाचित मी आजारी असेन आणि स्वप्न पहात असेन. कदाचित मी तापात बरळत असेन. सोनं-बिनं सगळं खोटं, भासच ! मी केव्हाच मेलो असेन नाहीतर कसल्यातरी दीर्घ बेशुद्धीत असेन.

स्वच्छ सूर्यप्रकाश पडला होता आणि मी विचार करून बघितला, वेड लागण्या-पूर्वीची तर ही लक्षणं नसावीत ? माझ्याकडे अर्थातच उत्तर नव्हतं. मी प्रार्थना केली आणि झोपी गेलो. जाग आल्यावर मी नदीवर आंघोळीला आणि मासे धरायला गेलो.

आता माझं तारखांचं भान पण सुटलं होतं. सहा-सात की आठ तारखेला संध्या-काळी मी पहिल्यांदा ढोलाचे आवाज ऐकले. तेही नीटसं आठवत नाही. प्रथम वाटलं भास असेल, पण ढोलाचा आवाज येतच राहिला. चूक होणं शक्यच नव्हतं. थोडा वेळ विचित्र सुरात आणि लयीत गाण्याचे आवाजही ऐकू आले. वाऱ्याच्या झोताने सूर काही वेळा अस्पष्ट व्हायचे. तरी तो भास नक्कीच नव्हता. त्या दिवशी दुपारी मी पक्षी मारण्यासाठी या जागी प्रथमच बार टाकला होता. आदिवासींनी ते आवाज ऐकले असतील. ते फार लांब नसतील. कदाचित ते चढणीवर असतील. सगळी दरड उतरून घळीत येणं त्यांना जमलं नसेल आणि आता आहेत त्या जागी ते मुक्कामाला थांबले असतील. सकाळी ते शोध सुरू करतील आणि मला शोधायाला त्यांना अजि-बात वेळ लागणार नाही. पण हे गात का होते ? ढोलाचा आवाज कशाला ? आपण शत्रू नाही हे सांगण्यासाठी ? की मीं पळून जाऊ शकणार नाही याची त्यांना खात्री होती ? ते आधीच विजयोत्सव साजरा करत असावेत.

रात्रीचे बहुधा दहा वाजले होते. मी ताबडतोब सामानाची बांधाबांध सुरू केली. बांधाबांध पूर्ण झाल्यावर तंबू उखडला आणि अंधारातच सर्व सामान तराफ्याकडे आणलं. खाली दीड मैलावर एक धबधबा नदीचा मार्ग रोखतो हे मला माहीत होतं. चंद्रोदय होताच या धबधब्यापर्यंत जायचं मी ठरवलं. सूर्योदय झाल्यावर तराफा नांगरून मी मार्ग शोधून मग पुढे निघणार होतो. आदिवासी येण्यापूर्वीच मी त्यांच्या-पासून खूप दूर गेलेलो असेन. मी तराफ्याजवळच एका झुडपात बंदूक घेऊन बसलो आणि चंद्र उगवण्याची वाट पाहू लागलो.

मला जर प्रवाहाच्या खालच्या दिशेला १० मैल कोणी नेऊन पोहोचवलं असतं' तर माझ्या जवळ असलेले, सर्व सोनं द्यायला मी तयार होतो !

◆

# आठ

पाण्यात उपटसुंभासारख्या आलेल्या खडकावर माझा तराफा दणकन आदळला आणि मी त्या बेफाम धबधब्यात फेकला गेलो. गरागरा फिरत प्रवाहाबरोबर खाली वहात गेलो. जरा डोकं वर करायला अवसर मिळाला तेव्हा तराफा नशिबाने जवळच होता. एकदा मी किनाऱ्यावर उभा राहून तराफ्याची दोरी सोडत असताना धडपडलो आणि तराफा सामानासकट सुसाट वहात गेला. सामानाशिवाय जगणं अशक्य होतं. तराफ्याशिवाय जगण्यापेक्षा गोळी खाऊन मेलेलं बरं. पण गोळी झाडून घ्यायला बंदूकही सामानातच होती. मी किनाऱ्यावरून धावत सुटलो. पण पुढच्याच वळणावर तराफा दिसेनासा झाला. मी गवतातून सरपटत, झुडपं ओरबाडत निघालो. माझी सालडी निघाली, फांद्या ओरबाडत होत्या. तरीही मी खडकांवरून उड्या मारत, उथळ पाण्यातून चालत, चिखल तुडवत चाललो होतो. एका वळणावर आलो, तर तराफा वहात पुढच्या धबधब्याकडे जाताना दिसला. मला धाप लागली. सगळा धीर सुटला होता. मला अक्षरशः रडू फुटलं. बंदूक असती तर मी सगळं संपवलं असतं.

का ? माझ्या वाट्याला हे का यावं ? माझ्या बगलेच्या जखमेतून परत रक्त वाहू लागलं होतं. तरीही मी परत तराफ्याचा पाठलाग करायचा ठरवला. मी तराफा गाठू शकणार नाही, याची मला खात्री होती. तरीही मी पुढे निघालो. मी आशा-निराशेच्या पलीकडे गेलो होतो. फक्त घामाने चिंब भिजलो होतो.

माझ्यासमोर ३०० यार्डावर तराफा खडकांच्या मागे गेला. माझी वाट लागली; यापेक्षा माझ्या निष्काळजीपणामुळे वाट लागली याचे दु:ख होत होते. पुढच्या वळ-णावर येऊन बघतो तो तराफा एका धबधब्यात दोन खडकांमधे अडकून पाण्यात अर्धवट बुडाला होता. आता फक्त प्रवाहात झोकून द्यायचं, पोहत जाऊन तराफा धरायचा आणि त्यावर चढायचे. आता बाकी काही विचार मनात नव्हता. पण मी माझा बेत अंमलात आणायच्या आतच तराफा परत निसटला. पण तिथे नशिबाने पाणी इतके उथळ होते की तराफा जमिनीला अडकत होता. त्यामुळे खाली पळत जाऊन मला तराफा अडवण्याची संधी मिळाली. धबधब्या खालचा डोह फक्त १०० यार्ड लांब होता, त्यानंतर परत नवीन धबधब्यांना सुरुवात होत होती, मी निम्मा डोह पार केला तेव्हा धबधबा ओलांडून तराफा पात्राच्या मध्यभागातून माझ्याच

दिशने येत होता. मी कपड्यासह पाण्यात उडी मारली. आणि मध्यभाग गाठला. नशीबाने पाण्याच्या वेगाचा मी अचूक अंदाज घेतला होता. त्यामुळे पुढचा धबधबा येण्यापूर्वीच जमतेम तराफ्यावर चढलो. आता पुढे काहीही संकटं आली, अडी-अडचणी आल्या तरी मघाच्या निराशेपुढे क्षुल्लक होत्या. तराफा हाकण्याची वा खडकावर आपटल्यापासून वाचविण्याची ताकद माझ्यात नसली तरी मला सुखरूप असल्यासारखे वाटत होते. सुटकेचा आनंद झाला होता.

एकदा तराफा गाठल्यावर परत फुकाचा विश्वास वाढला. पाण्याची पुढे काय स्थिती आहे हे पूर्वीप्रमाणे तपासून पहाणं मी सोडून दिलं. पाण्याचा आवाजाचा नुसता कानोसा घेऊन मी ठरवायचो, पुढे जायचे की नाही. काही वेळा नदी अडवली गेलेली असायची वा तिला अनेक फाटे फुटायचे. मग मी सगळं तराफ्याच्या भरवशावर सोडून निवांत बसायचो. पूर्वी समुद्र प्रवासात माझ्या छोट्या बोटीबद्दल मला जे वाटायचं तसं तराफ्यावद्दल वाटू लागलं. माझ्याशी भांडणाऱ्या एखाद्या जिवंत प्राण्यासारखे माझे त्याच्यावर प्रेम जडले. त्याचे कौतुक वाटू लागले.

दुपारी मी एक जंगली डुक्कर मारले. त्यामुळ पुढच्या काही दिवसांचा पोटापाण्याचा प्रश्न सुटला. दोन दिवसांचा की चार-पाच ? मला फिकीर नव्हती. काळाची काळजी नव्हती. फक्त किती अंतर काटले ते महत्त्वाचे होते. मी रोजनिशी ठेवली नव्हती आणि दिनक्रमही बदलत नव्हता. मीं कुठे कुठे मुक्काम केला होता हेही मला नकाशावर दाखवता यायचे नाहीं कारण नकाशाचे प्रमाण खूप मोठ होते आणि त्यात तपशील नव्हते. मी नक्की काय करतो आहे, कशाचाच भरवसा नव्हता. प्रवास म्हणजे नुसत्या हालअपेष्टा उरल्या होत्या.

शेवट जवळ आला आहे हे मी ओळखलं, पण नेमका कोणत्या तारखेला मी कोसळलो आणि काय घडलं काही समजलच नाही. एकदा तराफ्यावरच मला डुलकी लागली आणि किनाऱ्याला आपोआप लागलो तेव्हा जाग आली. मला ताप आल्याचे जाणवले, तरी मी दुर्लक्ष केले. मला मरायचाही थकवा आला होता. सगळा प्रवास स्वप्नवत वाटू लागला. माझं डोकंही आता अर्धवट काम करू लागले.

दिवस भराभरा जात होते !

मला आठवतंय, एका सकाळी मी नेहमीप्रमाणे तबू न आवरता तिथच राहिलो. पुढे सुदानपर्यंत सोपे धबधबे असतील या निव्वळ भरवशावर मी तराफा पुढे नेऊ शकत नव्हतो. केवळ दैवावर अवलंबून, मी सगळ्या संकटातून सहीसलामत सुटेन अशी व्यर्थ आशा करण्यात काही अर्थ नव्हता. मी ठराविक अवधीत सुदानच्या सरहद्दीत पोहोचलो नाही तर हेलिकॉप्टरने माझा शोध घेण्याचे वचन अमेरिकन लोकांनी दिले होते. पण त्यांच्यावर विसंबण्यात अर्थ नव्हता आणि जरी ते आले असते तरी मी पायलटला दिसणे शक्य नव्हते. उघड्यावर तंबू ठोकणे, निशाणी म्हणून बांबूला शर्ट अडकवणे किंवा किनाऱ्यावर पांढरे दगड रचून ठेवणे म्हणजे

केवळ पायलटला नाही तर लुटारूंनाही आमंत्रण होते. घळीची वेडीवाकडी वळणं, सुसाटणाऱ्या पाण्याचा आवाज यामुळे अगदी शेवटच्या क्षणी मला हेलिकॉप्टर आल्याचे कळले असते आणि मी नदीकिनारी जाईपर्यंत ते निघूनही गेले असते. बंदुकींच्या आवाजाचाही उपयोग झाला नसता.

मी हार पत्करली आणि घळ पार करून परत गोडजॅमच्या दिशेने पायीं जाण्याचे ठरवले.

खरं म्हणजे हा मूर्खपणाचा कळस होता. मी तो निर्णय तेव्हा का घेतला याचे कसलेही स्पष्टीकरण माझ्याजवळ नाही. तराफा सोडून देणं म्हणजे पूर्णपणे पागलपणा होता. कारण काही तास चालणेही मला खरोखर अशक्य होते. मग घळीच्या उभ्या भिंती चढून जाणे तर दूरच, मला सणकून ताप भरला होता आणि मला काहीही सुधरत नव्हतं, एवढी एकच सबब असू शकेल. दुपारी अखेरचा मी तराफ्यावर चढलो आणि घळीबाहेर पडण्यासाठी एखादी सोयीस्कर जागा येण्याची वाट बघू लागलो.

दोन-तीन मैल गेल्यावर एक नदी नाईलला मिळाली होती, तिथे मला हवी तशी सोयीस्कर जागा सापडली. पण तो तराफा सोडल्यावर पुढे काय घडलं काही माहीत नाही आणि आता ते कधी कळणारही नाही.

माझी शुद्ध हरपली आणि जेव्हा जाग आली तेव्हा मी आदिवासींच्या झोपडीत होतो. दोन पुरुष आणि दोन बाया माझ्याकडे पहात होत्या. मी डोळे उघडल्यावर ते पटकन बाहेर गेले आणि काही क्षणातच अनेक आदिवासींनी झोपडीत गर्दी केली. मी तराफ्यातून उतरून झोपडीपर्यंत कसा आलो ते धड सांगू शकत नव्हतो आणि ते सांगत असलेलं काही एक मला कळत नव्हतं. काहीतरी अंधुक आठवत होतं, पण खरं खोटं देवजाणे. एक मात्र नक्की आठवतंय की बरोबर काय वस्तू घ्यायच्या याची यादी मी तयार केली होती. बंदूक आणि काडतुसांचा पट्टा, चाकू, गळ, सोन्याची बाटली, औषधं, कॅमेरा, डायरी, पेपर्स. पण शुद्ध आल्यावर तर झोपडीच्या कोपऱ्यात माझं तराफ्यावरचं सर्व सामान ढीग करून ठेवलं होतं. मी हे सगळं ओझं आणणं अशक्यच होतं. या आदिवासींना मी नदीकाठी सापडलो असेन आणि त्यांनी सामानासह मला इथे आणलं असेल. खरं म्हणजे मी दुसऱ्या खोऱ्यातून जायचा विचार केला होता. किंवा असंही घडलं असेल, की मी सगळ्या गोष्टी आखल्या असतील आणि किनारी कोसळून पडल्यावर स्वप्नवत् पुऱ्या केल्या असतील. कारण उभा कडा पार करून सापासारखा वळत जाणारा मैलोगणती रस्ता पार करणे अशक्यप्राय होते.

कदाचित प्रत्यक्षात घडलं ते या सर्व अर्धवट आठवणींचं मिश्रण असेल. माझ्या डायरीत कसल्याही नोंदी नव्हत्या. आणि सोनं सापडलं तेव्हापासून मी काही फोटोही घेतले नव्हते. माझी सुटका कशी झाली हे बहुधा अनुत्तरितच राहणार. आदिवासींनी मला का वाचवलं, माझ्यावर औषधोपचार का केले, मला खाऊ-पिऊ का घातलं, हे

समजणंही कठीण आहे. चांगुलपणा ही त्यांची नैसर्गिक प्रवृत्ती नाही. मला मारून टाकणं, माझं सामान लुबाडणं आणि प्रेत नदीत फेकून देणं हे अपेक्षित होतं. माझी अवस्था पाहून माझी दया यणं असंभवनीय होतं. माझ्याकडे कसलाही पुरावा नाही; पण केवळ तर्क आहे, की मी लुटारूंशी दिलेल्या झुंजीची हकीकत यांच्या कानावर आली असेल. कदाचित माझ्यावर हल्ला करणारे लोक या लोकांचे दुश्मन असतील आणि त्यांना सूड उगवायचा असेल.

या टोळीतला सगळ्यात म्हातारा माणूस टोळीप्रमुख आणि भगत दोन्हीही होता. मला त्याने वाचवलं आणि बरंही केलं, त्यामुळे माझा त्याच्यावर विश्वास बसला. मात्र त्याच्याकडून काही चमत्काराची अपेक्षा केली असती तर मात्र मी निराश झालो असतो. मी आलो त्या दिवशी त्याने जखमांवर औषध म्हणून जे मिश्रण वापरलं ते यथातथाच होतं. आणि 'निर्जंतुक' म्हणून वापरलेले द्रावण म्हणजे बहुधा लघवी असावी. (आफ्रिका आणि जगभरचे इतरही अनेक आदिवासी लघवीचा त्यासाठी उपयोग करतात) पट्टी म्हणून हाताने विणलेले कापड वापरले होते. मुख्य म्हणज त्या मुखियाला खूप वर्षांपासून चालत आलेली पारंपारिक उपचारपद्धती माहीत होती. ती म्हणजे जादू-मंतर करण्याबरोबरच व्यवस्थित चित्र काढणे. हाही उपचार पद्धतीचाच एक भाग होता. जनावराच्या दोन फूट लांबीच्या कातड्यावर मत्स्याकृती तांबडा आकार काढून त्यावर तपकिरी ठिपके दिले होते. तो भगत एकदा माझ्याकडे, जखमेकडे, मग चित्राकडे आणि परत जखमेकडे पहात होता. माझी जखम त्या आकृतीसारखी असल्याचे तो सांगत होता. मग आपले दोन्ही हात चित्रासमोर धरून त्याने हलवले. काही वेळाने मलाही चित्र हलल्यासारखे वाटू लागले. थोड्या थोड्या वेळाने चित्राच्या किनारीची उघडझाप होतीय असं वाटू लागलं. माझी जखम ठणकायला लागली आणि मी झोपी गेलो.

दुसऱ्या दिवशी तरतरीत जाग आली तेव्हा चित्राच्या कडेने काढलेल्या पांढऱ्या रेषा पुसल्या होत्या. मला प्रत्येक वेळी जाग यायची तेव्हा चित्राचा काही भाग पुसलेला असे. तिसऱ्या दिवशी जागा झालो तेव्हा चित्राचा मध्य आक्रसलेला होता आणि तपकिरी रंगवलेला होता. पहिल्यांदा माझी मलमपट्टी काढली आणि मला आश्चर्याचा धक्काच बसला. माझी जखम अगदी चित्रासारखीच दिसत होती, नुसती आकाराने नाही तर रंगानेसुद्धा. जखम चिघळायची थांबली आणि बरीसुद्धा झाली. पहिल्यांदाच मी पाय मोकळ करायला झोपडीबाहेर पडू शकलो.

मी ज्या जमातीत रहात होतो, ती फार लहान होती. चौदा मोठी माणसं आणि पाच मुलं. त्यांचे आपसातले नाते-संबंध मला समजले नाहीत, की कोण कुठल्य झोपडीत रहातो हेही नाही. मात्र ती चार कुटुंब असावीत. सगळ्यांनाच हिवतापाची लक्षण दिसत होती. आणि त्यांच्या कातडीवर जागोजाग जखमांचे व्रण होते. पुरुषांच्या अस्वच्छ केसांना, दाढीमिशांना गाठीगाठी होत्या. बहुसंख्य लोकांनी कमरेला हरीणाच्या

कातड्याचे नेसू बांधले होते. त्यांच्या हातात चाकू किंवा भाला असायचाच. बायांनी कमरेला धडुतं नेसलं होतं. मी बघितलेल्या आदिवासी बायकांपैकी अजिबात माळा न घातलेल्या ह्या पहिल्याच ! तथापि त्यांचा बराचसा वेळ घरगुती कामातच जायचा या लोकांना ना शेती–भाती होती ना गुरं ढोरं. त्यांच्याकडे फक्त दोन खेचरं आणि अर्धा डझन गावठी कुत्रे होते.

केवळ शिकारीवर हे लोक जगत असावेत, शिकार अथवा आणखी कशाच्या तरी बदल्यात शेजारच्या जमातीकडून धान्य घेत असावेत. झोपड्याही तात्पुरत्या बांधल्या-सारख्या. त्या इतक्या साध्या होत्या की त्यांना झोपड्या म्हणणंही कठीण. दहाफुटी बांबू जमिनीत वर्तुळाकार रोवले होते आणि वर त्यांची टोके एकत्र बांधली होती. मधली जागा गवता–झावळ्यांनी भरून टाकली होती. चार मोठ्या आणि दोन छोट्या झोपड्या होत्या. छोट्यांपैकी एकात मी रहात होतो. कदाचित ही जागा ते उन्हाळ्यासाठी (इथिओपियातले हवामान लक्षात घेता, खरं म्हणजे हिवाळ्यासाठी) वापरत असावेत. पावसाळ्यात इथे रहाणं अशक्य होत असेल. उन्हाळ्यातही ते सोपं नव्हतंच. उन्हाने आसमंत पार कोरडा रखरखीत झाला होता. थोड्या, शुष्क धुळ-भरल्या झुडपांच्या आडोशाने या झोपड्या उभ्या होत्या. चिखलवजा जागेतल्या विहिरीतून ते पाणी आणत होते. झोपड्यांच्या सभोवार काट्याकुट्यांचे साधारण पाच फुटी कुंपण होते. मी सुसंस्कृत जगातील अनेक गलिच्छ झोपडपट्ट्या बघितल्या आहेत, त्याहीपेक्षा खराब अशा या झोपड्यात वर्षानुवर्षे राहुनही हे लोक सुखी कसे, मी अचंब्यात पडलो होतो.

मी थोडा हिंडू फिरू लागलो तरी माझी सतत काळजी घेतली जायची. माझ्यावर सतत नजर असायची. प्रथम एक म्हातारी आणि नंतर दोन तरुण मुली कायम सोबतीला असत. पुढे काय होईल याची तमा न बाळगता मी त्यांना आरसा, सुया, कात्र्या भेट म्हणून दिल्या.

तराफा सोडून सहा दिवस लोटले होते. मी या लोकांबरोबर राहात होतो. खात-पीत होतो. झोपत होतो. दिवस भराभर जात होते. अंधार पडला की, आम्ही झोपायचो, दिवस उजाडला की उठायचो. लोकांना माझी मजा वाटत होती आणि मला लोकांची. आम्ही एकमेकांना बघत सावलीमध्ये तासन्तास पडून रहायचो. बोलणं-चालणं काही नाही. त्यांच्या डोळ्यातील भाव कालातीत होते.

उन्हं तापली होती. वारा अजिबात नव्हता. सावज सापळ्यात अडकलं होतं. त्यामुळे आता उद्यापर्यंत जेवणाची फिकीर नव्हती. जवळपासच्या झुडपातून माकडं उड्या मारत होती. पक्षी ओरडत होते. जसं काही या जगात कशाचीही कमी असूच शकत नाही. मला सगळ्यात मजा वाटायची ती वेळेची. माझी वेळेची संकल्पनाच बदलून गेली होती. दिवस लांबायचा नाही. दिवस म्हणज तरी काय ? किंवा तास, आठवडा, वर्ष ? या लोकांना महिना काय आणि वर्ष काय ? जगातल्या इतर

लोकांना तरी त्याची एवढी फिकीर का हेच मला कळना. मी जर इथच राहिलो तर असा काय मोठा फरक पडणार आहे ? घरी कोणाला कळणार नाहीं, कीं कुणीं माझी आठवण काढणार नाही... मीं इथेंच राहिलो तर सुखी होईन.

मी कुठून आलो, कशाला आलो, काय करतो हे जाणून घेतल्याशिवाय हे लोक माझ्यावर माया करत होते.

सकाळी एकांतात एका मुलीने माझ्याशी लगट केली होती. संध्याकाळीं त्या लोकांनी जंगी समारंभ केला. आफ्रिकेत मीं इतर जमातीत बघितलेल्या कुठल्याहीं समारंभापेक्षा हा वेगळा होता. खाल्ल्यानंतर पुरुष शेकोटीभोवतीं अर्धवर्तुळाकार बसले आणि त्यांनी मला बोलावून घेतले. एका घड्यात दारू होती आणि तीं पीत अधून मधून ते खालच्या आवाजात गात होते. एकजण छोटं ढोलकं वाजवत होता. बायका जरा मागे बसल्या होत्या. पण त्यांच्याकडेही दारूचा घडा होता. नाच, गाणं, हशा असली काही खास करमणूक नव्हती तरीहीं हा समारंभ होता आणि युरोपातल्या कुठल्याहीं पार्टीपेक्षा मी इथं आरामात होतो.

दोन तासात मी दारूचे अर्धा डझन घोट घेतले असतील नसतील, अशक्तपणा की दारूमुळे कुणास ठाऊक मीं लगेच झोपायला गेलो. मला अर्धवट झोपेत दर्दभऱ्या गाण्याचे सूर ऐकू येत होते. मध्यरात्रींच मला जाग आली आणि मग झोप लागेना. मला जाणवू लागलं कीं आता काहीतरीं निर्णय घेणं भाग आहे. मला एकतर इथे कायम रहायला हवं किंवा लौकर निघायला पाहिजे. पण आता निर्णय लांबणीवर टाकणं शक्य नव्हतं.

हा समारंभ म्हणजे साखरपुड्यासारखं काहीतरीं होतं. दोघींतल्या एकीचीं निवड करायला मुखियाने मला सांगितलं. या लोकांबरोबर काही काळ नुसतं राहून नंतर त्यांना सोडून जाणं योग्य नव्हतं. थोड्याच काळात मी हीं त्यांच्यात गुंतत चाललो होतो. पण काहीं दिवसांनी या जीवनाचा कंटाळा आला तर हे स्वतंत्र आयुष्य कैद ठरणार होतं.

दुसऱ्या दिवशी मी माझं सामान तपासलं आणि बरोबर कोणत्या वस्तू घ्यायच्या ते ठरवलं. जवळ जवळ ५०–६० पौंडाचं ओझं होतं ते. बाकीच्या वस्तू मीं त्या लोकांना वाटल्या. दोन शॉर्टस आणि जीन्सची एक जोडी सोडून इतर कपडे वाटून टाकले. त्यांनी त्या भेटी घेतल्या, उत्सुकतेने कपडे घालूनही बघितले. नंतर मात्र घडीं करून ठेवून दिले. हळू-हळू माझ्या आवराआवरीचा अर्थ त्यांच्या लक्षात आला. पैशाचीं त्यांना अपेक्षा नव्हती. त्यासाठी त्यांनी माझा प्राण वाचवला नव्हता. ते आपसात सल्लामसलत करत, माझ्याकडे पहात होते. त्यांच्याकडे जे काही होतं ते त्यांनी मला दिलं होतं. रहायला स्वतःची झोपडीं दिली होती, मला मदत केली होती. माझी सेवाही केलीं होतीं. बायकोही देऊ केली होतीं. मी तिथंच रहावं अशी त्यांची इच्छा होती.

सरत्या दुपारी मुखियाने मला खाणा-खुणा करून सांगितलं कीं मला ज्या पूर्व दिशेकडे जायचं होतं. तिथे माझ्याबरोबर येण्यासाठी वाटाडे तयार आहेत. आदिस आबाबा ऽ वा डबरा मार्कोस काही त्यांना समजलं नाही. पण रास ! रास हेले सेलासी मात्र समजलं !

मुखियाने मला चांदीत बसवलेला सिंहाचा पंजा भेट म्हणून दिला. तो काय म्हणाला ते समजलं नाहीं. मीं संध्याकाळी लौकर झोपलो.

सूर्योदयापूर्वीच त्यांनी मला उठवलं आणि लवकर तयार व्हायला सांगितलं. माझी सामानाची पोतडी अगोदरच बाहेर नेलीं होती. खेचरांवर अगोदरच खोगीर घातले होते. एक माझ्यासाठी आणि दुसरं माझं सामान-सुमान, पाणी नेण्यासाठी. माझं सगळं सामान चार कातडी बॅगसमध्ये व्यवस्थित बांधलेलं होतं. एकदा वाटलं की, पोतडी उघडून बघावं सोनं, कॅमेरा, फिल्म, डायरी वगैरे आहे ना ! पण माझ्या भोवती उभ्या असलेल्या सगळ्यांकड बघितलं आणि माझी मलाच लाज वाटायला लागली. त्यांनीं माझ्यासाठी इतकं केलं होतं आणि मी त्यांच्यावरच संशय घेत होतो; ते माझं सामान चोरणं शक्यच नव्हतं. फक्त माझी बंदूक, काडतूसं आणि चाकू त्यांनी सामानात बांधला नव्हता. हाती असावा म्हणून.

मी निघायच्या वेळी ते जमले. माझ्याबरोबर येणारे दोघे खचराचा लगाम धरून उभे राहिले. बाकीचे बसून मातीत रेघोट्या ओढत होते. कोणी लाकूड तासत होते, तर कुणी भाल्याला टोक करत होते. ते माझ्याकडं बघायचं टाळत होते. बायकाही आता काहीशा लाजत बुजत होत्या, पण हळूच माझ्याकडे कटाक्ष टाकत होत्या. त्या उगाचंच नखांकड वा झोपडीच्या भिंतीकडे लक्ष दिल्यासारखं करत होत्या. प्रत्येकजण आपली उत्सुकता लपविण्याचा प्रयत्न करत होता. मला सहज आठवलं, खरं म्हणजे अशी तुलना करणं बरोबर नाही, पण तरीही त्यात साम्य आहे. माझा एक कुत्रा असंच करायचा. मी बाहेर निघालो की अंदाज घ्यायचा. मी त्याला माझ्याबरोबर नेणार आहे, असं त्याला वाटलं की भुंकून भुंकून गोंधळ घालायचा. आधीच दरवाज्यापाशी जाऊन उभा रहायचा. पण मी नेणार नाही असं लक्षात आलं, तर कोपऱ्यात किंवा पलंगाखाली जाऊन बसायचा. किंवा तोंड फिरवायचा. हे लोक तसंच करत होते. दोघंजण आले आणि माझ्याशी काहीतरी बोलले. त्यांची भाषा मला समजणार नाही हेही त्यांना माहीत होते. दोन टोपल्या भरून त्यांनी मला खाद्यपदार्थ दिले. मुखिया आला आणि परत माझ्याशी बोलला. निघताना हस्तांदोलन करण्याची पद्धत त्यांच्यात नसेल, पण उजव्या हाताने त्याने माझ्या खांद्याला स्पर्श केला. मग मुखिया वळला आणि सर्वांच्या मागून जाऊ लागला. बायका आधीच दिसेनाशा झाल्या होत्या.

हा निरोप इतका लक्षणीय, तरी झटपट होता की प्रत्यक्ष जाण्यापूर्वीच मी त्यांना परका झालो होतो. ते माझ्यापासून सर्वस्वी दूर गेले होते. आपल्या आयुष्यातून

त्यांनी मला सहज दूर केलं होतं, अगदी सहज, जसं त्यांनी मला स्वीकारलं होतं. 'मी परत येईन' असं सांगितलं. पण मी परतणार नाही हे त्यांना पक्कं ठाऊक होतं. माझं येणं, राहणं–जाणं जणू काही घडलंच नव्हतं. मी खेचरावर स्वार झालो आणि वाटाड्यांबरोबर उतारावरून उगवतीकडे जाऊ लागलो–

◆

---

## नऊ

---

परततानाच्या अगदी अंधूक आठवणी मनात आहेत. दोन गोष्टी मात्र पक्क्या आठवतात. एक म्हणजे आम्ही प्रवास करत असलेल्या भागाचा एकसुरीपणा. प्रत्येक वेळेला एक दरी ओलांडून दुसऱ्या बाजूला गेलं की वाटायचं आतातरी बदल होईल. पण त्या बाजूच्या दुसऱ्या टोकाला गेलं की, तशीच दरी दिसायची. एकामागून एक कंटाळवाणे दिवस जात होते. दुसरी गोष्ट म्हणजे स्वतःच्या अस्तित्वाच्या निरर्थकपणाची प्रखर जाणीव. माझं शरीर केवळ यंत्रवत चालत होतं. मन पार बधीर झालं होतं.

□ □ □

पहिल्या दिवशी आम्ही दुपारची विश्रांती सोडून बाकी दिवसभर चालत होतो. संध्याकाळी एका वस्तीवर पोहोचलो तेव्हा मला धड खेचरावरून उतरताही येईना. मला कुणीतरी हात धरूनच झोपडीत नेल्याचं आठवतंय. दुसऱ्या दिवशी मी उठेपर्यंत माझे वाटाडे माघारी फिरले होते. त्यांना काहीतरी चांगली बक्षिसी द्यावी आणि दिवसभर आपल्याबरोबर ठेऊन घ्यावं असं मी ठरवलं होतं, पण मला पुढच्या गावच्या लोकांवर सोपवून त्यांनी आपली कामगिरी संपविली होती. आता पुढच्या प्रवास नव्या वाटाड्यांबरोबर. एक दिवस विश्रांती घेऊन आम्ही पुढच्या प्रवासाला निघालो. मात्र यावेळेला खेचरं नव्हती. पाच माणसंच आलटून पालटून मी आणि माझं सामान घेत होती.

आठ वा नऊ गावं पार झाली असावीत मात्र दर वेळी वाटाडे बदलायचे. कितीही सांगितलं तरी ते एक गाव सोडून पुढे यायचे नाहीत. सुदैवाने एक दोनदा सोडून प्रत्येक वेळी खेचर नाहीतर घोडे मिळत गेले. वाटाड्यांनी कधीही बक्षिसाची अपेक्षा

केली नाहीं. मीच त्यांना सामानातले काहीतरी गळ, नाणी वगैरे भेट म्हणून देत असे 'पैसे' ही चीजच त्यांना माहीत नव्हती. त्यांचे चलन म्हणजे मीठ. परतीच्या प्रवासाच्या दुसऱ्या टप्प्यात त्यांच्या दृष्टीने बहुमोल गोष्ट कोणती ते समजलं. इथिओपियन नाणी नाही तर ऑस्ट्रियन मारिया थेरेसाची चांदीची नाणी अरबांकडून गेल्या काही शतकात ती इथे आली असावीत आणि या लोकांना ती जमविण्याचे अतोनात वेड असावे. कदाचित राणीसाहेबांचा आखूड पोशाख हे त्याचे कारण असावे. पण दुर्दैवाने माझ्याकडे तशी नाणी नव्हती.

प्रदेशाच्या चढउतारानुसार आम्ही साधारण १०–२० मैल अंतर दिवसाला पार करायचो. गॉडजॅमच्या पठाराची उंची सर्व साधारणत: ६००० ते १०,००० फूट आहे आणि अधेमध्ये असंख्य घळी आहेत. माझा नकाशा काही कामाचा नव्हता. दिवसचे दिवस आम्ही कुठ चाललो आहोत काही थांगपत्ता लागेना. मी वाटाड्यावर पूर्णपणे विसंबून होतो. प्रथम आम्ही देब्रा मार्कोस च्या दिशेने चाललो होतो. ती बदलून दक्षिणेला का जायला लागलो समजेना. एकदा एका ओहळातून उतरताना अनपेक्षितपणे आम्ही ब्ल्यू नाईलच्या घळीत आलो. आणि उताराची जागा पाहून नदी पार केली. माझी खात्री नाही. पण माझ्यावर जिथे हल्ला झाला ती जागा इथून जवळपासच असावी. हल्लेखोर आणि हे वाटाडे यांचे काही लागेबांधे तर नसावेत ना असा संशय आल्याविना राहिला नाही. तसं असेल तर हे मला सरळ हल्लेखोरांच्या तावडीत देतील. हे वाटाडे त्या हल्लेखोरांसारखेच दिसत होते. सगळेच जण काळ्या कातडीचे 'गाला' होते. त्यांच्यासारखेच भाला, बंदूक वागवीत होते. झगाही 'लुटारू' सारखाच होता. पण मला त्या वाटाड्यांचा कधी अविश्वास वाटला नाही. खरं तर प्रचंड थकव्याने मी काळजीच्याही पलीकडे गेलो होतो.

घळीच्या दुसऱ्या बाजूला पोहोचल्यावर आम्ही वाटेत मिळणाऱ्या उपनदींच्या खोऱ्यातून वर न चढता पूर्वेकडेच जात राहिलो, कारण मला समजलं नाही. (खरं तर सरळ पठारावर चढून पुढचा रस्ता गाठणं सोपं होतं. पण मी विरोध करून किंवा शंका घेऊन काही उपयोग नव्हता. कारण मी काय म्हणतोय त्यांना समजणार नव्हतंच) मी अर्धवट तंद्रीत त्यांच्याबरोबर जात राह्यलो.

मुक्कामाची जागा केव्हा येणार आणि सर्व झंझट केव्हा एकदाची संपणार याची वाट बघत राहणं हाच एक प्रचंड मानसिक ताण येऊ लागला. माझी प्रकृती ढासळत आली. दोनदा मला खोगीराला बांधून ठेवावे लागले, कारण मला तोल सावरण अशक्य होते. एका छोट्या वस्तीवर सामानाची बांधाबांध करताना माझा कॅमेरा पडला आणि लेन्स तुटली. मी हेही मनावर न घेता उलट कॅमेरा आता कामाचा नाही म्हणून तो सरळ एका आदिवासीला देऊन टाकला. मी आता फोटोही घेत नव्हतो. की डायरीही लिहीत नव्हतो. मला कशातच रस वाटत नव्हता. समजा एखादा दिवस त्या लोकांनी माझे सामान वाहून नेण्यास नकार दिला असता तरी

मी तसाच पुढ गलो असतो आणि त्याची पर्वाही केली नसती. मधल्या काळात मी हवेची गाडी, तंबूचा कॅनव्हासही देऊन टाकला होता. सरते शेवटी माझ्याकडे फक्त ४० पौंड सामान उरले होते.

अनेकदा वाटाडे माझे 'पार्सल' दुसऱ्या दिवशीच्या वाटाड्यांच्या हवाली करायचे आणि लगेच माघारी जायचे जणू काही वैयक्तिक रित्या त्यांना माझ्यात काहीच रस नव्हता. या विशिष्ट जातीचे एकमेकांत काहीतरी व्यवहार होत असावेत, मात्र बाकी जमातींशी ते संबंध टाळत असावेस. दुसऱ्या जमातीची वस्ती आली की दुरून वळसा घालून मला ते पुढे नेत.

सुमारे पंधरवड्यानंतर दुपारी चालता चालता शजारच्या खोऱ्यात जाणाऱ्या रस्त्यावर टायरच्या ताज्या खुणा आढळल्या, तीन चार मैल उतरून निळचा नाईलच्या तीरावर येईपर्यंत मला तो भाग ओळखता आला नाही. नाईलला मिळणाऱ्या मुगेर नदीच्या मुखापासून तो फार लांब नव्हता. याचा अर्थ मी जिथून निघालो ती जागा इथून एक दिवसाच्या पल्ल्यावर होती. त्या लोकांना डेब्रा मार्कोस माहीत होते आणि ते मला तिकडेच नेणार होते. पण आम्ही पुलाच्या इतक्या जवळ आलो होतो की तिथेच घेऊन जाण्याविषयी मी त्यांना सुचवलं. तिथून कार–ट्रक जे काही मिळेल त्याने मी आदिस आबाबा किंवा डब्रा मार्कोसला जाऊ शकत होतो. आम्ही त्या रस्त्याने विरुद्ध दिशेने जात राहिलो. आणि पुलापासून १०–१५ मैलावर एका कुटुंबाच्या 'तुकुल' मध्ये मुक्काम केला. घळीच्या तळापासून सुमारे १००० फूट उंचीवर सपाटीवर ही जागा होती. माझ्या आयुष्यातील अत्यंत आनंदाच्या दिवसांपैकी तो एक दिवस होता.

दुसऱ्या दिवशी सकाळी माझा वाटाड्या आणि यजमान एका अरुंद आणि छुप्या मार्गाने मला पुलाच्या दिशेने घेऊन गेले. रस्ता इतका अरुंद होता की खचर जाणं शक्यच नव्हतं. आम्ही पायीच आलो. दुपारी आम्ही परत नदीकिनारी उतरलो आणि पुलाखालच्या वळणावर आलो. मला दुरून येणाऱ्या गाडीचा आवाज एकू आला. मोटारचा आवाज आयुष्यात इतका सुंदर मंजुळ कधीच वाटला नव्हता, ही जीवनाची निशाणी होती. माझा थकवा पळाला. ते आदिवासी मात्र विश्रांतीसाठी खाली बसले. मी दोन महिन्यापूर्वी प्रवासाच्या पहिल्या दिवशी जिथे मुक्काम केला होता तिथे गेलो. इथेच मी तराफ्यात काही बदल केले होते. दोन पिंप, दोर रिकाम्या बाटल्या, डबडी जे जे मला विशेष लागणार नाही असं वाटत होतं ते सगळं तराफा आणखी हलका व्हावा म्हणून सोडून दिलं होतं, या सर्व गोष्टी जिथे लपवून ठेवल्या होत्या तिथे त्या तशाच होत्या. आदिवासींना काही उपयोग होईल या भावनेने मी त्या त्यांना देऊ केल्या. त्यांनाही आनंद झाला. पण काही वेळाने ते एकदा माझ्याकडे, पुलाकडे आणि सामानाकडून पुन्हा माझ्याकडे बोट दाखवू लागले. ते उठले. वळले. परत पुलाकडे बोट दाखवले आणि माघारी वळून चालू पडले. काही मिनि-

टातच ते पुढच्या वळणावरून खालच्या दिशेने नाहीसे झाले. सूर्यास्ताला सुमारे तासभर होता. मी पुलाच्या दिशेने निघालो. पण अंधार पडण्यापूर्वी त्या घळीतून माझे सर्व सामान घेऊन जायला ते सोजीर घाबरत होते. त्यांच्यापैकी प्रत्येकाला त्यांच्या निम्म्या पगाराइतकी बक्षिसी द्यावी लागली. आता आदिवासींची काहीच निशाणी नव्हती. मी दिलेली पिपेही त्यांनी नेली नव्हती.

पुढचं काम अगदीच सोपं होतं. मी ती रात्र एका सैनिकांच्या खोलीत काढली. दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांनी जाणारी पहिलीच गाडी थांबवली. संयोगाने त्या गाडीचा ड्रायव्हर जर्मन होता. तो बराच वेळ माझ्याकडे रोखून बघत राहिला आणि त्याने विचारले, ' तुझ्याकडे पासपोर्ट आहे ना ?'

मी ओळखलं, मी सुसंस्कृत जगात परत आलो आहे !

गॉडजॅम प्रांताच्या मध्यभागी असलेल्या डेब्रा मार्कोसपर्यंत मला त्याने नेऊन सोडले, तिथल्या गव्हर्नरने माझे स्वागत करून सर्व आवश्यक ती मदत, वैद्यकीय मदत वगैरे दिली. तिथून मी अस्मारामार्गे वाळवंटातून सुदानमधील खार्टुमला गेलो. मी माझ्या शोधाचा अहवाल तयार केला आणि हेले सेलासी महाराजांना पाठवला. मला राजेसाहेबांच्या खाजगी सचिवांचे पत्र आले, त्यानुसार मग मी नंतर मला सापडलेल्या सोन्याचे काही कण नमुना व पृथ्थकरणासाठी पाठवले. या सोन्याचा साठा शोधण्यासाठी पद्धतशीर शास्त्रीय मोहीम काढण्याचे ठरवले. नंतर त्या संबंधात अनेक सरकारी आणि खाजगी योजना पुढे आल्या. पण अजूनपर्यंत काही झालं नाही.

पुढचा उन्हाळा मी ग्रीसमध्ये घालवला. तिथे एक छोटी शिडाची होडी घेऊन एजियन समुद्रात आराम सफर केली. आणखी पुढचे बेत आखण्यासाठी.

पूर्वी असल्या अस्पर्श भूमी वगैरे गोष्टींवर माझा फारसा विश्वास नसे. कारण रुळलेली वाट सोडून जाणारा प्रत्येक जण असंच काहीतरी म्हणत असे. पण मी स्वत: अशी अस्पर्श भूमी अनुभवल्यामुळे अशी जागा असू शकते यावर माझा विश्वास बसला. काही दिवसांनी परत जगाच्या कोपऱ्यातल्या आणखी एखाद्या अशा जागेच्या शोधात मी जाईनही, पण ब्ल्यू नाईलच्या घळीत जाणार नाही. एवढे मात्र नक्की–

◆

' अलोन ऑन दी ब्लू नाईल ' या कूनो स्टॉयबेन आ पुस्तकाचा संक्षिप्त अनुवाद.

( Alone on the Blue Nile : Kuno Steaben )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
प्र.क्र. 1682
२६६६६

REFBK-0026696